
# छात्र प्रबोधन

सौर चैत्र, १९३३
वर्ष ११ अंक ७

मूल्य रुपये वीस



## वासंतिक विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक!

## 'तुम्हीच संपादक व्हा !' हस्तलिखित स्पर्धेतील काही निवडक मुखपृष्ठे

## कुमार गट

१




२



३



४



**१. ज्ञानतरंग**
मुकुल मंदिर, औरंगाबाद
**२. झेप**
छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय, अकोला
**३. प्रतिबिंब**
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे
**४. हितगुज मनीचे...**
दादामहाराज नाटेकर पंचकोशाधारित गुरुकुल, चिखली, पुणे


## किशोर गट

१



२



३



४



**१. ऋतू**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे
**२. स्वरलता**
टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली
**३. फुलोरा**
बाल शिवाजी प्राथमिक विद्यालय, अकोला
**४. पंख स्वप्नांचे**
अंकुर मंदिर, भंडारा

# छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९३३ । वर्ष ११ अंक ७

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २२५ वा अंक, वर्ष १९ अंक ९

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## अंतरंग वासंतिक विशेषांक


२. संवाद - महेन्द्र सेठिया

३. कथा... पाखराची वैखरी - म. वि. कोल्हटकर

९. माहितीपर... क्विडिच आपल्या मैदानात - डॉ. उज्ज्वला बर्वे

१२. कविता पानोपानी... पुस्तक - दत्ता हलसगीकर

१३. ललित... चैत्र - मुबारक शेख

१५. माहितीपर... काळा पैसा - अरविंद परांजपे

१८. बहुगुणी संशोधिका....रोझलिंड फ्रँकलीन - अमेय कुलकर्णी

२१. ललित... काटेझरीचा शिवा - डॉ. राहुल मराठे

२७. माहितीपर... जीवसृष्टीतील स्वसंरक्षण - डॉ. मानसी राजाध्यक्ष

३०. कविता पानोपानी... निसर्ग सांगतो मला... - नीरज पाचपोर

३१. ललित... यास्नया पल्याना - डॉ. अनघा भट-बेहरे

३७. कर्मयोगिनी भगिनी निवेदिता - ६ - डॉ. सुरुचि पांडे

३९. कथा... घोरवडेश्वरावर काय घडलं? - ईशान पुणेकर

४३. माहितीपर... आगीशी दोन हात - प्रशांत रणपिसे

४७. 'तुम्हीच संपादक व्हा !' हस्तलिखित स्पर्धा निर्णय

मलपृष्ठ पद्य - खळखळ धावत.... - विश्वनाथ गुर्जर

**निवेदने -** चला सर्जनशील बनूया (७), प्रकल्प लेखमाला (८), ग्रामीण मेळावे (२०), सृजनाला पंख नवे सादरीकरण स्पर्धा निर्णय, लेखन-संपादन कार्यशाळा (२६), विद्यार्थी विशेषांक आवाहन (३५)

**याशिवाय -** लिबियातील राजकीय भूकंप (८), शास्त्रज्ञ परिचय (११), रेशीम नातं कागदाशी (२०), वासुदेव माझे नाव (३६), हसरे चित्र (४२)


**मुखपृष्ठाविषयी** - स्केचसाठी बॉलपेन हे थोडं वेगळं माध्यम मी निवडलं. बॉलपेनचे स्ट्रोक्स कुठल्या कागदावर चांगले दिसून येतील याचा विचार करून मी आर्ट पेपरची निवड केली. लोककलावंत वासुदेवाचे रेखाचित्र काढताना आधी मी शरीरशास्त्राचा (ॲनाटॉमीचा) अभ्यास केला. स्क्रिबलिंगपेक्षा मी लाईन रेडरिंगच्या साहाय्याने वेगवेगळ्या रंगीत बॉलपेन्सचा वापर करत चित्राला मूर्तरूप दिले.

सचिन पाटील (चाररंगी, प्रथम), कलानिकेतन महाविद्यालय, कोल्हापूर
रवी परांजपे अमृत महोत्सवी समिती आणि 'छात्र प्रबोधन' आयोजित मुखपृष्ठ स्पर्धा - २०१०


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
दत्ता श्री. टोळ

**मुखपृष्ठ/मलपृष्ठ**
सचिन पाटील/अभय पुरंदरे

**मांडणी व सजावट**
गिरीश सहस्रबुद्धे

**आतील चित्रे**
गिरीश सहस्रबुद्धे, अभय पुरंदरे, तेजस्वी भुरके, मंदार मराठे, अमोल भोसले



**संपर्क पत्ता**
**छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**ई-मेल**
jpchhatra@rediffmail.com

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org



**वार्षिक वर्गणी ₹ १८०/-**
**द्वैवार्षिक - ₹ ३४०/-**
**त्रैवार्षिक ₹ ५००/-**
**दशवार्षिक - ₹ १,५००/-**
**या अंकाची किंमत :** ₹ २०
पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० जादा.
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा.



*प्रिय प्रतिसादी प्रबोधकांनो,*

*हा वासंतिक विशेषांक तुमच्या हातात पडेल तेव्हा वार्षिक परीक्षा संपवून सुट्टीचा आनंद लुटायला तुम्ही प्रारंभ केला असेल. या सुट्टीत काय नवीन योजलंय? एरवी वर्षभरात अनेक वेळेला एखादी गोष्ट आवडली, कविता वा लेख आवडला, एखाद्याने केलेला पराक्रम भावला किंवा एखाद्या घटनेचा राग आला, निषेध करावासा वाटला तर कोणाशी तरी बोलून आपण आपली प्रतिक्रिया व्यक्त करतो, त्याबद्दलचं आपलं मत मांडतो. पण पुष्कळ वेळेला ते आपल्या-आपल्यातच राहतं. रोजच्या धावपळीच्या दिनक्रमात संबंधित लेखकांपर्यंत, व्यक्तींपर्यंत आपण ते पोहोचवतो का? या सुट्टीत असा प्रतिसाद संबंधित व्यक्तींपर्यंत थेट पोहोचवता येईल का? अगदी आपल्या नातेवाईक, मित्र - मैत्रिणी यांपासून प्रारंभ करत अनोळखी व्यक्तींनासुद्धा असा प्रतिसाद द्यायला या सुट्टीत सुरुवात करता येईल का? अगदी प्रवासात एखाद्या कंडक्टर / ड्रायव्हरचा स्वभाव, त्यांचे कौशल्य तुम्हाला आवडले तर स्वत:हून त्यांना त्याबद्दल दाद देता येईल ! तोंडी, लेखी, दूरभाषद्वारा, ई-मेलद्वारा पण चांगल्या गोष्टींबद्दल कौतुक/आनंद व्यक्त करणारा प्रतिसाद देणं अन् न आवडलेल्या, चुकीच्या गोष्टींबद्दल नाराजी, निषेध व्यक्त करणारा प्रतिसाद देणं; हे आपल्या उमदेपणाचं, जिवंतपणाचं लक्षण आहे. या सुट्टीत किमान १० ते १५ जणांना तरी असा ठरवून प्रतिसाद देता येईल का? प्रारंभी थोडंसं कृत्रिम वाटेल; पण प्रयत्नपूर्वक, वेळच्यावेळी, मनापासून प्रतिसाद द्यायचं ठरवलंत तर त्यातून निर्माण होत जाणारं नातं, परस्परांना दीर्घकाळ आनंद देणारं होईल. स्पर्धात्मक युगात असा निखळ, निरपेक्ष, मनापासूनचा प्रतिसाद देण्याची सवय आपल्याला अधिक आनंदी अन् समृद्ध करेल यात शंकाच नाही.*

*अजून एक वेगळी गोष्ट तुम्हाला सुचवणार आहे ! या सुट्टीत साहसी, अनपेक्षित प्रसंगांना सामोरे जायला लावणारी, बुद्धीला खाद्य देणारी १० जोडीकार्ये करणार का? फार धमाल येईल. अनुभवातून, चुकत-माकत, प्रसंगी फजितीच्या-भीतीच्या प्रसंगांना सामोरे जात ही जोडीकार्ये तुम्हाला पूर्ण करायची आहेत. यातून स्वत:चं स्वत: खूप शिकायला मिळेल यात शंकाच नाही. मग काय होणार ना सहभागी? मग ठरवा तुमचा जोडीदार (ही जोडीकार्ये करण्यासाठी तुम्हाला कसा जोडीदार हवाय, याचाही विचार करा हं !) आणि जोडी ठरली की मला संध्याकाळी ५ ते ६ या वेळात ९४०४२२४७०५ या भ्रमणभाषवर दूरभाष करा. त्यावेळी तुमची नोंदणी केली जाईल व तुम्हाला पहिले जोडीकार्य दिले जाईल. ते पूर्ण करण्यासाठी ४ ते ५ दिवसांचा अवधी असेल. ते जोडीकार्य पूर्ण झाल्यावर दूरभाषवरून तुम्ही तुमचे अनुभव सांगितले की मग तुम्हाला पुढचे जोडीकार्य दिले जाईल. या प्रकारे ३१ मेपर्यंत जे ७ पेक्षा अधिक जोडीकार्ये पूर्ण करतील त्यांना जूनच्या पहिल्या आठवड्यात ३ दिवसांच्या साहस सहलीत सहभागी होता येईल व ती त्यांच्यासाठी पूर्णत: नि:शुल्क असेल. जोडीकार्यांमध्ये काही जोडीकार्ये साहसी असतील तर काही तुमच्या व्यावहारिक कौशल्यांना, सामाजिक कौशल्यांना वाव देणारी जोडीकार्ये असतील. एखादे जोडीकार्य तुम्हाला जमले नाही तर तुम्ही पुढचे जोडीकार्य मागू शकाल. पण लागोपाठची २ जोडीकार्ये तुम्ही करू शकला नाहीत तर तुम्ही या योजनेतून बाद व्हाल.*

*स्वत: अनोळखी प्रसंगांना/अनुभवांना सामोरे जाण्यातली मजा, साहस, धाडस, आनंद स्वत:चे स्वत:च अनुभवू शकाल. तुमच्या प्रतिसादाची वाट पाहतो.*

*गुढीपाडवा, नवीन संवत्सर आणि दोन महिन्यांची सुट्टी यासाठी खूप खूप शुभेच्छा !*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, येरवडा, पुणे ६**



# पाखराची वैखरी

– म. वि. कोल्हटकर

**एखाद्या माणसाचं वागणं हे त्याच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, वावरणारी माणसं, त्यांचे स्वभाव यावर म्हणजेच आजूबाजूच्या परिस्थितीवर/ वातावरणावर अवलंबून असते. या रूपककथेतला श्रीरंगही त्या राज्यातल्या हवेनुसारच वागतोय; पण मग ही हवा, ही परिस्थिती घडवतं /बदलतं कोण बरं? बघा बरं तुम्हीच विचार करून...**

गोष्ट फार जुनी नाही. गोष्ट फार नवी नाही. एक राजा असतो. राजाचे नाव असते वीरधवल. नावाप्रमाणे तो शूर वीर असतो. नावाप्रमाणे त्याची कीर्ती धवल असते.

एके दिवशी राजाला स्वप्न पडले. स्वप्न विलक्षण होते. स्वप्नात एक कोल्हा राजाच्या मांडीवर बसला. राजाने कोल्ह्याला हाकलले. तेव्हा कोल्हा राजाच्या दुसऱ्या मांडीवर पट्दिशी बसला. तिथून हुसकले. तेव्हा कोल्हा खांद्यावर चढला. अशा रीतीने कोल्हा राजाची पाठ सोडेना.

राजाला तेच स्वप्न पूर्वरात्री, मध्यरात्री आणि उत्तररात्री पडत राहिले. इतकेच नव्हे तर राजाला ते स्वप्न रोज रोज पडू लागले. स्वप्न पाठ सोडेना. तेव्हा राजा वीरधवल बेचैन झाला. राजाने अमात्याला हे स्वप्न सांगितले. अमात्यालाही उलगडा होईना.

तेव्हा राजाने राज्यात दवंडी पिटवली. दवंडीत राजाला पडणारे स्वप्न सांगण्यात आले. या स्वप्नाचा अर्थ काय, हे जो अचूक सांगेल त्याला १०० सोन्याच्या मोहरा देण्यात येतील, असे जाहीर करण्यात आले.

राज्यामध्ये एक खेडे होते. खेड्यात एक गरीब शेतकरी राहात होता. त्याचे नाव श्रीरंग. शेतात कष्ट करून भाकरतुकडा खाऊन दुपारच्या वेळी तो विश्रांती घेत होता.

श्रीरंगाने दवंडी ऐकली. श्रीरंगाच्या मनात आले, 'जर आपण स्वप्नाचा बिनचूक अर्थ सांगितला तर मोठी बहार होईल. आपल्याला शंभर सोन्याच्या मोहरा मिळतील. आपले दारिद्र्य मिटून जाईल. पण आपण काय अर्थ सांगणार? आपण थोडेच जाणकार?' नशिबाला दोष देत श्रीरंग झाडाखाली बसून राहिला. तेव्हा झाडावर एका चिमणीने चिवचिवाट केला. चिवचिवाटाची अक्षरे झाली. अक्षरांचे चिमणे शब्द झाले. चिमण्या मुलांसारखी थेट झाडावरील चिमणी बोलू लागली. चिमणी म्हणाली,


ऐका-'प्रबोधन गीते' ₹५० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

''ओळखलं रे ओळखलं, मनातलं गुपित ओळखलं.''

श्रीरंग चकित झाला. त्याने वर पाहिले, एक चिमणी थेट मानवी वाणीने बोलत होती. श्रीरंग उभा राहिला. तो चिमणीला म्हणाला,

''कसं काय माझं मन ओळखलं म्हणतेस?''

चिमणी म्हणाली, ''आम्हा पाखरांना माणसांची मनं ओळखता येतात. माणसांना मात्र पाखरांची मनं ओळखता येत नाहीत. ''

''मग सांग बरं माझ्या मनात काय घोळत आहे?'' श्रीरंगने चिमणीला विचारले.

चिमणी म्हणाली, ''तुझ्या मनात एक प्रश्न घोळत आहे, मला तो माहीत आहे. मला त्या प्रश्नाचं उत्तरही ठाऊक आहे.''

''तर मग सांग बरं तो प्रश्न आणि सांग बरं उत्तर,'' श्रीरंग चिमणीला म्हणाला.

''राजाला विचित्र स्वप्न पडत आहे. स्वप्नात एक कोल्हा पुन:पुन: राजाच्या अंगावर चढत आहे. स्वप्नाचा अर्थ जो सांगेल त्याला १०० सुवर्ण मोहरा बक्षीस मिळतील. आपल्याला ते बक्षीस मिळावं असं तुला फार फार वाटतं. खरं ना?'' चिमणी म्हणाली.

चिमणीचे हे वाक्य ऐकून श्रीरंग चेंडूसारखा उडाला. आपण स्वप्न पाहत आहोत का सत्य हे श्रीरंगाला समजेना. तो चिमणीला म्हणाला,

''स्वप्नाचा अर्थ तुला ठाऊक आहे? मग सांग बरं मला.''



''अर्थ सांगेन. अचूक सांगेन. पण माझी एक अट आहे,'' चिमणी म्हणाली.

''कोणती अट?'' श्रीरंगाने विचारले.

''अट अशी की, बक्षीस मिळताच तू बक्षिसाची निम्मी रक्कम म्हणजे ५० मोहरा तात्काळ मला द्यायला हव्यास.''

''हो देईन की !''

''नक्की?''

''अगदी नक्की. प्रॉमिस.''

''मग ऐक तर... कोल्हा हे लबाडीचे प्रतीक आहे. मागून, पुढून, खालून, वरून कोल्हा अंगाशी येतो आहे; याचा अर्थ राज्यामध्ये लबाडी बेसुमार वाढली आहे. दुकानदार ग्राहकाला ठकवतो आहे. ग्राहक दुकानदाराला गंडवतो आहे. गवळी दुधात नाना पदार्थ मिसळत आहे... भेसळीला ऊत आला आहे. ढोंग, फसवणूक यांचे सर्वत्र अधिराज्य आहे.''

श्रीरंगाला आनंद झाला. तो धावतपळत राजाकडे गेला. त्याने राजाला स्वप्नाचा अर्थ सांगितला. राजाने मग हेरांकरवी पाहणी केली, तेव्हा राजाला कळले की खरोखरच लबाडीला सर्वत्र ऊत आला आहे. लहान पोरेसुद्धा मास्तरांना, आईवडिलांना फसवीत आहेत, मास्तर विद्यार्थ्यांना ठकवीत आहेत. कॉपीचा धुमाकूळ माजला आहे.

राजाने मग रक्षक यंत्रणा मजबूत केली. न्यायसंस्थेला जारीने कामाला लावले. लबाडी, फसवणूक या गुन्ह्यांना सज्जड शिक्षा ठोठावल्या.

राजाने श्रीरंगाला १०० सुवर्ण मोहरा बक्षीस दिल्या. इतके सोने हाती पडताच श्रीरंग हरखून गेला. त्याने मग विचार केला, 'आपले काम झाले. चिमणीला अंगठा दाखवावा. कशाला दयायचे पैसे त्या भुक्कड पाखराला?'

श्रीरंगाने ते पूर्ण बक्षीस लाटले. त्याने झोपडी पाडली, बंगला बांधला. ट्रॅक्टर घेतला, बोअर घेतले, गाई - म्हशी घेतल्या, श्रीरंगाचा रंगाशेट झाला.

असेच दीड वर्ष उलटले. श्रीरंग चिमणीला विसरून गेला.

...पुन्हा मग राजाला एक स्वप्न पडले... धारदार तळपती तलवार आणि तलवारीच्या धारदार पात्यातून अविरत ठिबकणारे रक्त राजाला स्वप्नातून दिसत राहिले. राजाने पुन्हा मग दवंडी पिटवली, 'त्या भयानक स्वप्नाचा जो अर्थ सांगेल त्याला ३०० सुवर्ण मोहरा बक्षीसरूपाने मिळतील,' असे राजाने जाहीर केले.


प्रा. - व्ही. व्ही. आर्किटेक्ट्स, प्रा. लि. पुणे

श्रीरंगाने दवंडी ऐकली. मग त्याला त्या चिमणीची आठवण झाली. पुन्हा ती चिमणी भेटावी, पुन्हा तिने नव्या स्वप्नाचा अर्थ सांगावा, मग पुन्हा अधिक मोठे बक्षीस मिळावे, असे श्रीरंगाला फार फार वाटले. आपण मागच्या खेपेला चिमणीला ठकवले आहे, त्यामुळे आता पुन्हा चिमणीकडे कोणत्या तोंडाने जायचे, असेही श्रीरंगाला एकदा वाटले. मग लगेच श्रीरंगाचे दुसरे मन म्हणाले, 'जनावरे, पाखरे यांना काय जुमानायचे? त्यानी तर माणसांची सेवाच करायची असते.'

श्रीरंगाला कसलीच खंत वाटेना. तो चिमणीचा शोध घेत घेत रानात हिंडू लागला. पण ती चिमणी श्रीरंगाला सापडणे शक्य नव्हते. कारण सगळ्या चिमण्या एकसारख्या दिसत होत्या.

श्रीरंगाने चिमणीला ओळखले नाही. पण चिमणीने श्रीरंगाला अचूक ओळखले. ती चिमणी मानवी वाणीने श्रीरंगाला म्हणाली,

''आलास ना तू? तू येणार हे मी ओळखून होते.''

चिमणीची वाणी ऐकून श्रीरंग चमकला. त्याला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला.


''मला ठाऊक आहे तू का आलास ते. राजाला नवे स्वप्न पडले, होय ना? नव्या स्वप्नाचा अर्थ उलगडेल त्याला ३०० सुवर्णमोहरा मिळणार, होय ना? पण मी आता तोंड उघडणार नाही. मी तुला स्वप्नाचा अर्थ सांगणार नाही; कारण गेल्या खेपेला तू मला दिलेला शब्द पाळला नाहीस. निम्मे बक्षीस मला दिले नाहीस. तू अशी लबाडी केलीस. तेव्हा टाटा. निघते मी,'' असे म्हणून ती अद्‌भुत चिमणी उडून जाऊ लागली.

तेव्हा वेडापिसा होऊन गयावया करीत श्रीरंग चिमणीमागे धावत सुटला आणि म्हणू लागला,

''चुकलो मी. मला माफ कर. पुन्हा मी अशी फसवणूक करणार नाही. माझ्यावर विश्वास ठेव. या खेपेला मी तू सांगशील तेवढा बक्षिसाचा हिस्सा तुला देईन.''

चिमणीला श्रीरंगाची दया आली. ती श्रीरंगाला म्हणाली,

''फार नको, मला निम्मे बक्षीस दे. देशील?''



''हो, हो देईन.''

''तर मग ऐक राजाच्या नव्या स्वप्नाचा अर्थ... तळपती तलवार आणि निथळणारे रक्त हे हिंसा, खून, अपहरण यांचे चिन्ह आहे. राज्यात हिंसा, खून, अपहरण, दहशतवाद या गोष्टी थैमान घालीत आहेत. जा आणि सांग तुझ्या राजाला या स्वप्नाचा अर्थ आणि हो, वचन दिले आहेस, निम्मे बक्षीस माझ्या स्वाधीन करण्याचे. तो शब्द मोडू नकोस.''

''होय होय. मी शब्द नक्कीच पाळीन,'' श्रीरंग छातीला हात लावून म्हणाला.

श्रीरंग मग तात्काळ राजाकडे गेला. त्याने राजाला नव्या स्वप्नाचा अर्थ उलगडून सांगितला. मग परत राजाने राज्यात सर्वत्र हेर पाठवले. हेरांकरवी बातमी आली; तेव्हा राजाला धक्काच बसला. खून, अपहरण, दंगली, जाळपोळ याचा राज्यात धिंगाणा चालू होता. राजाने आणीबाणी जाहीर केली. हिंसक प्रवृत्ती निपटून काढण्याची तो शर्थ करू लागला.

श्रीरंगाला आता ३०० सुवर्णमोहरा मिळाल्या... चमचमणाऱ्या सोन्याच्या त्या प्रकाशात श्रीरंगाचे डोळे दिपले. त्याचे भान हरपले. निम्म्या मोहरा चिमणीला देण्याची तर त्याला इच्छाच होईना. उलट त्याच्या नजरेत रक्त उतरले. त्याने हातात बंदूक घेतली. 'आपले काम उरकले, विषय संपला. आता त्या चटोर चिमणीलाही संपवून टाकूया,' असा विचार करून श्रीरंग रानात गेला. तो सैरभैर होऊन गोळ्या झाडत सुटला. एक, दोन, तीन, चार...

एकेका झाडाखाली चिमण्या पटपट मरून पडू लागल्या. या सरबत्तीमध्ये ती अद्‌भुत चिमणीही मरून पडलेली असणार, अशी श्रीरंगाला खात्री वाटली. मग त्याच्या डोळ्यात चढलेला खून खाली उतरला.

तीनशे सोन्याच्या मोहरा



ऐका-'बोलका दिवाळी अंक' ₹ ६० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

मिळाल्या आणि श्रीरंगाच्या घरावर सोन्याची कौले चढू लागली...

असाच मग आणखी पुढे दोन वर्षांचा काळ लोटला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आता राजाला एक नवे स्वप्न पडले.

नवे स्वप्न पाहून राजाला आनंद झाला. एक इवले, पांढरेशुभ्र कबुतर राजाच्या अंगाखांद्यावर पुन्हा पुन्हा बसत राहिले.

स्वप्न गोड होते. पण ते पुन्हा पुन्हा पडत राहिले. ते कबुतर तर राजाच्या अंगचटीस येत राहिले. त्याची इतकी सलगी, इतक्या गुदगुल्या राजाला नकोशा झाल्या. राजा हैराण झाला.

पुन्हा राजाने राज्यात दवंडी पिटवली. नवे स्वप्न लोकांना कथन केले. त्याचा अर्थ सांगेल त्याला ५०० सुवर्णमोहरा बक्षीस मिळतील, असे घोषित करण्यात आले.

श्रीरंगाने दवंडी ऐकली. त्याच्या तोंडाला पाणी सुटले. ५०० मोहरा म्हणजे जन्माची ददात मिटणार होती. तो नगरशेट होणार होता. पण आता जाणार कुणाकडे? स्वप्नाचा अर्थ सांगणार कोण? त्याने तर चिमण्यांचा पार सफाया केला होता. त्याला मग वाईट वाटले.

अशांत चित्ताने श्रीरंग वनात भटकू लागला. अचानक दुरून आवाज आला,

''छान, आलास, ये. धन्य आहे तुझी.''

श्रीरंगाने चमकून बघितले. जवळ झाडाच्या डहाळीवर ती अद्‌भुत चिमणी बसली होती. ती चिमणी म्हणाली,

''तू तर माझ्या जमातीचा संहार केलास. काय मिळाले तुला? नशीब बलवत्तर म्हणून मी तुझ्या गोळ्यांच्या फेरीतून निसटले.''

''मी तर राक्षसासारखा वागलो. मला क्षमा कर. मी निम्मे बक्षीस तर तुला दिले नाहीच उलट वेडापिसा होऊन तुला ठार करण्यास सरसावलो. हे पाप मी कुठे फेडू?'' असे म्हणत श्रीरंग जमिनीवर गडबडा लोळू लागला.

''ताई, नवे स्वप्न तुला ठाऊक असणारच. त्याचा तुला अर्थ ज्ञात असणारच. या खेपेला बक्षीस खूप मोठे आहे. मी निम्मे बक्षीस तुला तात्काळ देईन. नाही म्हणू नकोस,'' श्रीरंग म्हणाला.

चिमणी परम दयाळू होती. तिने पाहिले या माणसाला पश्चात्ताप



झाला आहे. चिमणी म्हणाली, ''तर मग ऐक या नव्या स्वप्नाचा अर्थ. कबुतर हे सुखशांतीचे, न्यायनीतीचे प्रतीक आहे. येणारे दिवस आनंदाचे, समृद्धीचे, सुखाचे आहेत. जा आणि खुशाल सांग राजाला तसे. आणि तू दोन वेळा माझा विश्वासघात केलास. तरीपण मी तुझ्यावर अजूनही विश्वास ठेवते. तुला झालेला पश्चात्ताप खरा मानते. तू निम्मे बक्षीस मला देशील असे मी मानते. जा तुझे कल्याण होवो.''

श्रीरंग मग राजाकडे जातो. तो राजाला स्वप्नाचा अर्थ सांगतो. आगामी काळ सुखशांतीचा, न्याय-नीतीचा असल्याचे सांगतो.

राजा पुन्हा हेरांकरवी राज्याची हालहवाल तपासून पाहतो. राजाला आढळते की, देवळादेवळांमधील घंटा सतत मंजूळ नाद करीत आहेत. साधु-संत ईश्वराचे गुणगान करीत भावविभोर होत आहेत. लोक साधुसंतांचे चार शब्द ऐकण्यासाठी गर्दी करीत आहेत. देवळाच्या गाभाऱ्यात नंदादीप मंदपणे तेवत आहे. रस्त्यात भिकाऱ्यांचा मागमूस नाही. दानशूरांची तर पेठ फुलली आहे. प्रत्येकाच्या माथ्यावर छप्पर आहे, प्रत्येकाच्या शरीरावर आच्छादन आहे, कुठलेच पोट रिकामे नाही. चोर लुटारू यांचा मागमूसही आढळत नाही.

राजा श्रीरंगाला ५०० सुवर्णमोहरा देतो; पण यावेळी श्रीरंग घरी जात नाही. तो धावत-पळत रानात जातो. अद्‌भुत चिमणीला शोधतो. श्रीरंग चिमणीच्या पाया पडतो. तिच्या इवल्याशा पायांजवळ श्रीरंग २५० मोहरांची रास रचतो.

चिमणी हसते. ती त्या मोहरांना स्पर्शही करीत नाही. ती हसून म्हणते,

''आलास ना? तू नक्कीच येणार हे मला ठाऊक होते. तू प्रामाणिकपणे



प्रा. - श्री. अजित भिडे (इव्हेंट मॅनेजर) पुणे



निम्मे बक्षीस मला देणार याचीही मला खात्री होती. घे, उचल त्या मोहरा. आम्हा पाखरांना काय उपयोग त्या मोहोरांचा? अरे आम्ही कसलाच संचय करीत नाही. ना धान्याचा, ना फळांचा ! ईश्वर परम दयाळू आहे. तो आमची सर्व काही काळजी वाहतो. सगळे जंगल आमचे प्रत्येकाचे आहे. कुठेही हिंडायचे आम्हाला आयुष्यभर स्वातंत्र्य आहे. प्रत्येक देश आमचा देश आहे. प्रत्येक झाड हा आमचा बगीचा आहे. वारे आमचे शिक्षक आहेत. तुझ्या या नाण्यांना चव नाही, गंध नाही. ती आम्हाला काय कामाची?''

श्रीरंगाचे भान हरपले. तो चिमणीला म्हणाला, ''आत्ता तू म्हणालीस की, मी नक्कीच तुझ्याकडे येईन, तुला अर्धे बक्षीस देईन. हे तू कसे ओळखलेस? कोणती अद्‌भुत शक्ती तुझ्याजवळ आहे, सांग मला''.

चिमणी हसली आणि म्हणाली, ''अद्‌भुत शक्ती वगैरे काही नाही. आम्हा पक्ष्यांजवळ दुसऱ्याचे मन ओळखण्याची शक्ती उपजतच असते. आमची हृदये कोमल, कोवळी असतात.

असे पाहा की, माणूस विचाराने, कृतीने वातावरण घडवतो. हवाच बिघडते; माणूसच हवा बिघडवतो. म्हणूनच माणसाने नेहमी चांगले विचार, चांगली कृती केली पाहिजे. बघता बघता साथीचे रोग दूरवर पसरतात, त्याप्रमाणे मानवाची वृत्ती, करणी याची सूक्ष्म स्पंदने - चांगली वा वाईट दूरवर आपोआप, शांतपणे, निश्चितपणे पसरतात.

असे पाहा चार वर्षांपूर्वी वातावरणात लबाडीची भावस्पंदने प्रबल होती. म्हणून तू मला फसवलेस. दोन वर्षांपूर्वी हिंसा, क्रौर्य, अपहरण यांची हवा सुटली होती. म्हणून तू हातात बंदूक घेऊन आम्हा चिमण्यांचा वंशविच्छेद करीत सुटलास. वास्तविक या पाखरांनी तुझे काय वाकडे केले होते? काही नाही. तेव्हा ती हवाच तशी होती. आता बघ धर्म - नीती - दया यांची हवा सर्वत्र आहे. त्यामुळे दिलेला शब्द तुला पाळावासा वाटला. तू निम्मे बक्षीस घेऊन इथे आलास. उचल त्या मोहरा. आम्हाला त्या काय कामाच्या? जा, सुखी हो.''

असे म्हणून ते इवले पाखरू अस्मानात उडून गेले. ते परत आलेच नाही. जे कळावे असे खोल काही श्रीरंगाला वाटत होते ते त्याला कळले होते.

***

**म. वि. कोल्हटकर**
''वैष्णव'', १६ जीवनछाया सोसा.,
सिव्हिल हॉस्पिटलसमोर
सातारा 415001

## चला सर्जनशील बनूया

मासिक वाचताना काही वेगळेपणा जाणवतोय का? कशी वाटतेय अंकाची नवीन मांडणी? तुमच्या प्रतिक्रियांची आम्ही फार उत्सुकतेने वाट पाहात आहोत. पत्राद्‌वारे, ई-मेलद्‌वारे, दूरभाषद्‌वारे संपर्क साधून तुमचं मत आमच्यापर्यंत जरूर पोचवा.

या वासंतिक अंकासाठी तुम्ही कुठल्या पानाखालच्या ओळी सुचवाल आणि प्रायोजक ओळींसाठी काय स्वरूपाचा मजकूर सुचवाल? एखादा विषय/आशय घेऊन त्यावरच्या पानांखालच्या ४८ ओळी जमा करता येतील का? सुट्टी, उन्हाळा किंवा असा कुठलाही विषय घेऊन अशा ओळी शोधून (किंवा स्वतः नव्याने लिहूनसुद्धा) पाठवाल का? परीक्षा संपली रे संपली की असा एखादा छोटासा सर्जनशील उपक्रम करायला सुरुवात करणार ना?


वाचा - 'मृद्‌गंध' ₹ ६० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

छात्र प्रबोधनच्या अंकातून

## प्रकल्प लेखमाला आणि प्रकल्प विशेषांक

### लवकरच प्रकाशित होणार

(तुमच्या बक्षिसपात्र प्रकल्पांचे वृत्त पाठवा! प्रकल्पविषयक प्रश्न पाठवा !!)

'प्रकल्प म्हणजे काय, कशाला करायचे प्रकल्प, मला प्रश्नच पडत नाहीत मग मी कशाचा प्रकल्प करायचा?...' तुमच्या मनातल्या अशा असंख्य प्रश्नांना उत्तरे मिळणार...

मग जरूर पाठवा प्रकल्पांच्या संदर्भातले तुमच्या मनातले प्रश्न...

प्रकल्प विशेषांकातून किंवा लेखमालेतून उत्तरं द्यायला आम्हाला नक्कीच आवडेल.

शिवाय तुम्ही आतापर्यंत वेगवेगळ्या प्रकल्प स्पर्धांमध्ये भाग घेतला असेल. त्यापैकी कुठल्याही जिल्हास्तरीय स्पर्धेत बक्षीस मिळवलेले प्रकल्प (प्रकल्प वृत्त) आमच्याकडे जरूर पाठवा. (संग्रहात्मक, संशोधनात्मक, प्रतिकृती, सर्वेक्षणात्मक इ. कुठल्याही प्रकारचे) तुम्ही पाठवलेल्या प्रकल्प वृत्तांवरून आम्ही तुमच्याशी नक्की संपर्क करू. त्यातल्या काही प्रकल्पांना अंकात निश्चित प्रसिद्धी दिली जाईल.



...एक नजर...

## लिबियातील राजकीय भूकंप !

गेल्या तीन आठवड्यांपासून लिबिया या उत्तर आफ्रिकेत असणाऱ्या देशातील अस्थिरता आता उग्र रूप धारण करू लागली आहे. राष्ट्राध्यक्ष मुअम्मद गदाफी यांच्यावर चहू बाजूंनी राजीनामा देण्यासाठी दबाव येऊ लागला आहे. देशांतर्गत अस्थिरतेबरोबरच आंतरराष्ट्रीय दबावही गदाफींसाठी अडचणीचा ठरू लागला आहे. आणि कदाचित हा लेख छापून होईपर्यंत गदाफी पाय उतारही झाले असतील!

लिबियामध्ये गदाफी समर्थक आणि आंदोलक यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात आजवर शेकडो लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. राजधानी त्रिपोली आणि आसपासचा काही भाग सोडला तर लिबियाच्या बहुतांश भागावर आंदोलकांचा अंमल प्रस्थापित झाला आहे. काही ठिकाणी तर गदाफींच्या सैन्यातीलच अनेक सैनिक आंदोलकांना सामील झाले आहेत. त्यामुळे आंदोलकांची ताकद कमी होण्याऐवजी वाढतच आहे. लोकशाही व्यवस्थेची ओढ बंडखोरांना स्वस्थ बसू देत नाही. तर गेल्या ३१ वर्षांचा लिबियावरील आपला अंमल गदाफींना सोडवत नाही.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात लिबियातील परिस्थितीचे परिणाम इतर राष्ट्रांवर दिसले नसते तरच नवल! लिबिया हा तेल उत्पादक देश असल्यामुळे जागतिक पातळीवर तेलाच्या किंमती वाढू लागल्या आहेत. अनेक देशांनी अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेकडे विशेष लक्ष पुरविले आहे. चीनच्या इतिहासात प्रथमच आपल्या वार्षिक अर्थसंकल्पात चीनने लष्करापेक्षा अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेवर अधिक खर्चाची तरतूद केली आहे. जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊ नये व तो असल्यास वाढू नये यासाठी जगभरातील राष्ट्रे सतर्क झालेली आहेत. त्यामुळे लिबियाचं भविष्य काय असेल, हे जरी अद्याप स्पष्ट होत नसले, तरी जागतिक स्तरावर मात्र व्यापक जनहिताचा संदेश पोहोचला आहे हे नक्की !

***

**प्रवीण वडनेरे,** pravinwadnere22@gmail.com



**प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

# हॅरी पॉटरच्या विश्वातील क्विडिच आपल्या मैदानात

**डॉ. उज्ज्वला बर्वे**

हॅरी पॉटर मालिकेतील आणखी एक चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. ज्यांनी हॅरी पॉटरची पुस्तके वाचली आहेत किंवा चित्रपट पाहिले आहेत त्यांना क्विडिच म्हणजे काय हे सांगण्याची गरज नाही. चित्रपट पाहायच्या आधी ज्यांनी पुस्तके वाचली त्यांच्या मनात या खेळाविषयी विविध प्रतिमा उभ्या राहिल्या असणार. चित्रपट पाहिल्यावर त्या प्रतिमांना अधिक नेमके रूप मिळाले असेल.

लांब दांड्याच्या, जादूच्या झाडूवर बसून आकाशात उडत उडत जादूगार आणि चेटकिणींनी त्यांची जादुई शक्ती वापरून खेळण्याचा हा काल्पनिक खेळ. त्यातले ते आकाशात उडणारे चेंडू, झपकन् इकडून तिकडे जाणारे खेळाडू आणि सामन्यात सगळ्यात महत्त्वाचा असलेला नाजूक, पारदर्शी पंख असलेला तो भिरभिरता सोनेरी स्निच. लेखिका जे. के. रॉलिंगच्या कल्पनेची भरारी केवढी उत्तुंग आहे; याचे हा खेळ म्हणजे आणखी एक उत्तम उदाहरण आहे. असा खेळ आपल्यालाही खेळायला मिळावा, असे त्याचे वर्णन वाचणाऱ्या प्रत्येक वाचकाला कधी ना कधी वाटले असणार. काही उद्योगी मुलांनी झाडू घेऊन खेळण्याचा प्रयत्नही केला असणार.

अमेरिकेतही असे अनेक प्रयत्न झाले आणि त्या प्रयत्नांना आता मूर्त रूप मिळाले आहे. अमेरिकेतील साऊथ कॅरोलाइना राज्यातील चार्ल्स्टन या गावात हा खेळ प्रत्यक्ष बघण्याची संधी मला मिळाली. या गावात या खेळाला अलीकडेच सुरुवात झाली असल्याने त्याविषयी लोकांना फार उत्सुकता आहे. चार्ल्सटन कॉलेजचे खेळाडू दर बुधवारी एका मैदानावर हा खेळ खेळतात. कुणालाही तो बघण्याची किंवा त्यात सहभागी होण्याची परवानगी आहे. मात्र त्यासाठी स्वतःचा लांब दांड्याचा झाडू घेऊन जावा लागतो !


मी हा खेळ पाहायला गेले तेव्हा कॉलेजची पंधरा-वीस मुले मैदानावर खेळत होती, काही प्रेक्षक होते. हा संघ स्थापन करणाऱ्यांत लॉरिन ग'बोवस्की या मुलीचा महत्त्वाचा वाटा आहे. तिच्याशी आणि संघातल्या इतर खेळाडूंशी बोलायला-




गप्पा मारायला, त्या खेळाविषयी जाणून घ्यायला मी सुरुवात केली. त्यांच्या संघासाठी आर्थिक मदत गोळा करण्यासाठी ते एक डॉलरला एक मफिन (एक प्रकारचा केक) विकून पैसे जमवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे सांगितले. संघातील सहभागी खेळाडू इथल्या कॉलेजात शिकतात. कुठेतरी असा खेळ खेळला जातो असे कानांवर आल्यावर त्यांनी सुरुवातीला हॅरी पॉटरभक्त म्हणून आणि गंमत म्हणून हा खेळ खेळायला सुरुवात केली. पण मग त्यांच्या लक्षात आले की, एक मैदानी खेळ म्हणूनही तो फार छान आहे. तो खेळण्यासाठी खूप कौशल्य लागते, डावपेच आखावे लागतात आणि चांगला व्यायामही होतो. त्यामुळे आता त्यांनी त्यात अधिक रस घ्यायला सुरुवात केली आहे.

२००५ साली अमेरिकेतील व्हर्माँट राज्यातील मिडलबरी कॉलेजातील काही मुलांनी हा खेळ विकसित करून तो नियमितपणे खेळायला सुरुवात केली. बघता बघता तो लोकप्रिय झाला आणि २००७ साली आंतरराष्ट्रीय क्विडिच संघटना स्थापन झाली. सध्या अमेरिकेतील ४५ राज्यांमधील ४०० विविध विद्यापीठे आणि महाविद्यालये यांमध्ये हा


वाचा- 'हट्टी व्हा हट्टी' ₹ ५० (व्यक्तिविकसनपर)

**चार्लस्टन महाविद्यालयातील खेळाडू क्विडिचच्या मैदानावर**

खेळ खेळला जातो. युरोपात इंग्लंड आणि इतर देशांतही त्याचे लोण पसरले आहे. नुकतीच न्यूयॉर्कमध्ये चौथी क्विडिच विश्वकरंडक स्पर्धासुद्धा झाली. मला भेटलेला चार्ल्स्टनचा संघही त्यात सहभागी झाला होता.

या खेळाचे सर्व बारीकसारीक नियम आंतरराष्ट्रीय क्विडिच संघटनेने बनवले आहेत. नियमांमध्ये वरचेवर सुधारणाही करण्यात येतात. सध्या नियमपुस्तिका ४.० नुसार सामने घेण्यात येतात. क्विडिच हा खेळ म्हणजे रग्बी, सॉकर आणि डॉजबॉल या खेळांचे मिश्रण आहे. (रोलबॉल नावाचा रोलर स्केटिंग, हँडबॉल आणि बास्केटबॉल यांचे मिश्रण असलेला एक खेळ पुण्यात सुरू करण्यात आला आणि आता तोदेखील आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचला आहे, हे अनेकांना माहीत असेल.)

क्विडिचमध्ये प्रत्येक खेळाडू दोन पायांमध्ये लांब दांडीचा झाडू ठेवून एका हाताने तो झाडू धरून पळतो. प्रत्येक संघात सात खेळाडू असतात. एक सीकर, एक कीपर, तीन चेजर्स आणि दोन बीटर्स.

कीपर गोलचे रक्षण करतो. मात्र या खेळातला गोल म्हणजे मैदानावर उभी केलेली तीन कडी असतात. त्यांपैकी एकातून चेजरने त्याच्या हातातील पांढरा चेंडू टाकला की त्या संघाला दहा गुण मिळतात. त्याच वेळी बीटर्सचे काम असते त्यांच्या

खेळाचे नियम, चित्र, इतिहास
यांच्या अधिक माहितीसाठी
www.internationalquidditch.org

हातातील लाल चेंडू दुसऱ्या संघातील खेळाडूंना, विशेषतः चेजर्सना डॉजबॉलप्रमाणे मारणे. एखाद्या खेळाडूला लाल चेंडू लागला की त्याने असेल त्याच जागेवर झाडू टाकून देऊन गोलपोस्टला फेरी मारून येऊन मग झाडू उचलून पुन्हा खेळायला सुरुवात करायची असते. पुस्तकातील काल्पनिक क्विडिचधील स्निचची जागा या खऱ्या खेळात एका खेळाडूला देण्यात आली आहे. मात्र हा खेळाडू कोणत्याही संघातील नसतो, तर स्वतंत्र असतो. तो हातात एक झेंडा घेऊन सर्वत्र पळत असतो. त्याला पकडून त्याच्या हातातील झेंडा ज्या संघाचा सीकर आधी मिळवतो, त्या संघाला ३० गुण मिळतात आणि खेळ संपतो. मात्र ज्या संघाला जास्त गुण मिळतात तो संघ जिंकतो. सामन्याला वेळाचे ठरलेलं बंधन नाही. दोन्ही संघांना सामना सुरू होण्याआधी पंचांच्या संमतीने हवे तर बंधन घालून घेता येते. चेजर, बीटर वगैरे ओळखता यावे यासाठी त्यांनी ठरलेल्या रंगांच्या पट्ट्या कपाळावर बांधण्याचा नियमही करण्यात आला आहे.

खेळाचे वर्णन वाचताना तो थोडा क्लिष्ट वाटतो खरा; पण खेळ प्रत्यक्ष बघताना फार मजा येते. एका हाताने चेंडू उचलणे, तो धरून पळणे आणि एका हाताने तो गोलमध्ये टाकणे ही तशी सोपी गोष्ट नाही. त्याच वेळी प्रतिस्पर्धी संघाचे लाल चेंडू चुकवण्याची कसरतही करावी लागते. नाहीतर लाल चेंडू लागला की हातातला झाडू टाकून गोलाला


प्रायो. - श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

हात लावून येण्यात फार वेळ जातो. शिवाय एकमेकांकडून चेंडू घेण्यासाठी  रग्बीप्रमाणे कसाही धसमुसळेपणा केला तरीही चालतो. पण गंमत म्हणजे पुस्तकातल्याप्रमाणे प्रत्यक्षातही मुलगे आणि मुली यांचा संमिश्र संघ सामने खेळतो.

कलाकृतींमध्ये वास्तवाचे प्रतिबिंब पडते असे आपण नेहमी म्हणतो. पण कलाकृती विलक्षण प्रभावी असतील तर त्यांचे प्रतिबिंब वास्तवात उमटलेले दिसते. तसेच काहीसे क्विडिच या खेळाबाबत म्हणता येईल. फक्त सुदैवाने किशोरवयीन आणि तरुण मुलांना एका मैदानी खेळाकडे आकृष्ट करणारा हा प्रभाव असल्याने त्याविषयी आपण फारशी चिंता करण्याचे कारण नाही. खेळ खरोखरीच रंजक, उत्कंठावर्धक असेल तर तो अधिकाधिक लोकप्रिय होत जाईल. आणि तसा तो खेळाडूंना आणि प्रेक्षकांना वाटला नाही, तर काळाच्या ओघात नामशेष होईल. पण आजच्या घडीला त्याची दखल घेण्यासारखा आणि मराठी वाचकांपर्यंत पोचवण्यासारखा तो नक्कीच आहे. कारण या खेळाला फक्त ४० × ३३ मीटरचे मैदान, चार चेंडू, प्रत्येकी एक लांब दांड्याचा झाडू, उभी केलेली सहा कडी (बाजारात मिळणारे हूलाहूप त्यासाठी वापरता येतात.) लागतात. थोडक्यात काय, फारशी महागडी साधनसामग्री न वापरता, कोणत्याही मैदानावर, दहा-पंधरा जणांना मजेत वेळ घालवता येईल, व्यायाम होईल असा हा खेळ आहे.

काय सांगावे, महाराष्ट्रातही हा खेळ लोकप्रिय होईल आणि झाडू बनवण्याचा कुटीरोद्योग एकदम तेजीत येईल. या खेळाचा तसाही एक फायदा.

***

**डॉ. उज्ज्वला बर्वे**
बी १००४, काकडे सिटी, वारजे, पुणे 411058
ujjwalabarve@gmail.com

---

**सौर माघाच्या अंकात (फेब्रुवारी २०११) मुखपृष्ठाच्या आतल्या पानावर पाच शास्त्रज्ञांची प्रकाशचित्र आणि नावं दिली होती. हे पाचही शास्त्रज्ञ भटनागर पुरस्कार प्राप्त आहेत. त्यांची व्यक्तिगत आणि संशोधन विषयक माहिती थोडक्यात करून देत आहोत.**



**डॉ. संदीप वर्मा –** बनारस हिंदू विद्यापीठाचे पदवीधर. रसायनशास्त्रात विद्यापीठाचे सुवर्णपदक. HIV  विरोधी लस तयार करण्याच्या विषयात Ph.D. १९९७ पासून कानपूर IIT मध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी. जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी (अमेरिका) आणि मॅल्स-प्लॅन्क-इन्स्टिट्यूट (जर्मनी) इथेही काम. हाडं तयार होण्याच्या प्रक्रियेची खनिजे आणि जैविक तंतू वापरून कृत्रिम प्रतिकृती (Biomimicry) तयार केली. 'सजीवांच्या उत्पत्तीमध्ये रसायनांचा सहभाग' ह्या विषयावर अभ्यास.



**डॉ. जे. एन्. मूर्ती –** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स (IISc), बंगळुरु इथून Ph.D. मिळवली. त्यानंतर होस्टन, वुर्झबर्ग (जर्मनी) आणि व्हिक्टोरिया (कॅनडा) इथल्या विश्वविद्यालयांमधून विविध विषयांवर संशोधन. १९९८ पासून कानपूरच्या IIT मध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी.

प्रकाश रसायनशास्त्र (Photochemistry) ह्या विषयात, जैविक प्रकाश-रासायनिक हालचालींवर नियंत्रण मिळवता येईल अशी सेंद्रीय द्रव्य तयार करण्याचा प्रयत्न.



**डॉ. चारुसीता चक्रवर्ती –** केंब्रिज विद्यापीठातून Ph.D. त्यासाठी  आरगॉन हायड्रॉक्साईड (ArOH) च्या गुणधर्मांचा अभ्यास. सध्या दिल्लीच्या IIT मध्ये प्राध्यापिका. पाण्याच्या विविध गुणधर्मांचा अभ्यास,  त्यासाठी Quantum Simulation  ह्या तंत्राची निर्मिती आणि उपयोजन.

**(पान क्र. २९ वर पुढे सुरू)**


वाचा- 'आयुष्यातील वादळलाटा' ₹ ६० (प्रेरणादायी)

# पुस्तक

बोलायला कुणी जवळ नसलं कीं
मी पुस्तक वाचायला घेतो
पुस्तक माझ्याशी बोलतं त्याच्या माझ्या मनातलं

कधी उदास वाटतं... रडावंसं होतं
मी पुस्तक वाचायला घेतो
पुस्तक माझ्यात डोकावून पाहतं-डोळे पुसतं
आणि हसरा सूर्यप्रकाश देतं.

वादळवाऱ्यात सापडतो मी कधी
मी पुस्तक वाचायला घेतो
पुस्तक मला घरात नेतं... पाठीवरून हात फिरवतं.

सापडत नाही कधी मला माझी वाट
मी पुस्तक वाचायला घेतो
पुस्तक मला अक्षरांच्या वाटेवर नेतं
म्हणतं : या सुंदर वाटेनं जा
दिसेल तिथे समाधानाचा गाव.

मी स्वत:ला मोठा समजतो; कधी क्षुद्र
मी पुस्तक वाचायला घेतो
माझी खरी उंची-खोली मला कळते.

मी एकांती भ्यालो-गोंधळलो कीं
पुस्तक वाचायला घेतो
दिसतो मला सूर्योदय-टवटवीत फुलं
दूरवर पसरलेला समुद्र
रिमझिमणारा कृपाघन पाऊस...
आणि ऐकू येतो ओंकाराचा नाद
पुस्तकाच्या ओळीओळींतून.



**– दत्ता हलसगीकर**
२० अ, जवान नगर,
विजापूर रस्ता, सोलापूर 413004


**पान प्रायोजक - अमर परांजपे, सांगली**

# चैत्र

मुबारक शेख


चैत्र म्हणजे शुभकार्याचा आरंभ. चैत्र म्हणजे नुसता आनंद. चैत्र म्हणजे आयुष्याच्या वेलीला फुटणारी सुखाची पालवी. शिशिरात पानझडीची सुरुवात होते अन् चैत्रात पालवीची. आपली दुखरी पानं गाळून झाडं उभी असतात; तोवरच चैत्राचे वारे वाहू लागतात. थंडी  हळूहळू ओसरू लागते अन् चैत्रलहरींचे उबदार वारे अंगाला स्पर्शू लागतात.

चैत्राची पहाट विविध रंगांच्या उधळणीत न्हाऊन निघते. शरीराला सुखावणारा मस्त वारा हलके-हलके वाहात असतो. आपल्याच मस्तीत वाहणारा हा वारा गोड चिटुकल्या कळ्यांना चुंबन घेऊन जागं करतो. मन फुलावं तशी कळी हळूच पाकळी उघडते. वारा झाडा-झुडपांना, सृष्टीला चिरतरुण आनंद वाटत राहतो. चैत्राचा हा अलबेला वारा सर्वांना प्रसन्न ठेवतो. वेलींवर, झाडांच्या वठलेल्या फांद्यांवर, पानझडीच्या जुन्या खुणांवरच नव्या पालवीची सुरुवात होते. नवी जाणीव होऊन झाडं आता नखशिखान्त बहरू लागतात. इवली-इवली, तांबूस पिवळी, मुलायम - कोवळी पानं आता डोळ्यांना खूप-खूप पाहावीशी वाटतात. झाडांना चैत्रपालवी येणं म्हणजे जादूच्या प्रयोगासारखंच असतं नाही?

गुलाबी-तांबूस-पिवळ्या रंगाच्या अनेक छटा घेऊन पानं बदलत जातात. पानांची हिरवी-पोपटी आभा, माया डोळ्यांत साठवून ठेवावीशी वाटते. अन् मग बाह्यसृष्टी बहरली की मनही कसं बहरतं आतून.... अगदी आतून ! उदासीच्या गर्द छाया कुठल्या कुठं गळून पडतात... पानझडीसारख्या ! अन् पुन्हा मनाच्या फांदीला इवल्या इवल्या  सुंदर जाणिवेनं पालवी फुटते...!  ही जाणीव असते आपलं म्हणवणाऱ्या व्यक्तीवर जीव उधळून देण्याची... ही जाणीव असते परोपकाराची... ही जाणीव असते वेदनेत पोळून निघालेल्यांच्या पायाखाली आनंदफुलं पसरण्याची... ही जाणीव असते निर्लोभाची... ही जाणीव असते संसारातल्या परस्परांवरच्या विश्वासाची...!! बाहेरची सृष्टी आणि आतलं मन अशावेळी चैत्राचं होऊन जातं... चैत्राची इथंच खरी सुरुवात असते !

*'थंडीत गुलाबी झडली सारी पाने*
*हर एक डहाळी गाते उदास गाणे*
*चाहूल चावरी देता जो चैत्राची*
*डोळ्यात डहाळी पाही तांबूस -स्वप्ने !'* (राजा महाजन)

झाडांना पालवी फुटल्याची चाहूल सर्वात प्रथम लागते ती पक्ष्यांना. पोपटी पालवीत राघू-मैनेचा रंग अधिकच खुलून येतो. अशावेळी एक मन दुसऱ्या मनाला आयुष्याची सोबत करण्यासाठी बोलावतं... पानझडीच्या दिवसात उद्‌ध्वस्त झालेल्या घरट्याला पुन्हा




वाचा- 'हरित संदेश' ₹ १५ (छात्र प्रबोधन प्रकाशन)

सावरण्यासाठी साद घालतं आपल्या सोबतीला... साथीला... जिवलगाला ! त्यांच्या आनंदाची, सुखांची ही प्रसन्न वेळ असते... चैत्रपालवी !

*हिरवी-तांबूस पिवळी-कवळी, फुटे चैत्रपालवी*
*राघू मैनेला बोलवी...!* (कुंतिनाथ करके)

चैत्राची दुपार थोडीशी उष्ण असते; पण वैशाखासारखी दग्ध नसतेच. दुपारी वाहणारा वाराही शीतल असतो. नुकत्याच तापू लागलेल्या उन्हात शरीरावर घाम येण्यापूर्वीच वाऱ्याची शीत लहर येऊन भिडते. आपल्यालाही आकळत नाही इतक्या हलकेपणाने घामाचे बिंदू टिपून काढते. सृष्टीतली उरलीसुरली थंडी चैत्राची दुपार पळवून लावते. चैत्राचं आभाळ पूर्णपणे मोकळं स्वच्छ असतं. इतकं की, क्षितिजावर डोकं काढलेलं कोणतंही हिरवंगार झाड स्पष्टपणे दिसतं. झाडावरची प्रत्येक हालचाल ठळकपणे जाणवते. झाडावरून उडणारा पक्षीही स्वच्छ, नितळ आभाळामुळं उठून दिसतो. बंगल्यातून, मोठमोठ्या शासकीय कार्यालयांच्या प्रशस्त आवारातले गुलमोहोर नुकतेच लाल-तांबूस होऊ लागतात. चैत्रमासात गुलमोहरांचे गुच्छ फांद्या-फांद्यांवर खूप डवरलेले असतात. गुलमोहोर उन्हावर रागावतोय की हसतोय हेच जणू कळत नाही !

चैत्राचं ऊन म्हणजे जणू चांदणंच असतं. या दिवसात आपण हे चांदणं पिऊन घ्यावं.

*चैत्रदुपारशा देही । पिके चांदणे चोखिले।।*
*मन मोगरीचे कळे । खोल खुडून घेतले।।* (शंकर रामाणी)

चैत्राची रात्र ओंजळीत नक्षत्रफुलांना घेऊन उभी असते. एखाद्या तहानलेल्या वाटसरूला अमृतासारखं गोड पाणी मिळावं; त्यानंही ते पिऊन तृप्त व्हावं; इतकी सुंदर असते चैत्राची रात्र! इकडं झाडांना पानं फुटतात तर तिकडं आभाळावर नक्षत्रं फुलून येतात. या दिवसात आपल्यातून नवं काहीतरी सुख जन्म घेतंय याची जाणीव झाडं, वेली, पक्षी, आभाळ या साऱ्यांनाच होते की काय! वर्ष-वर्ष न दिसणाऱ्या असंख्य तारका चैत्रात अचानकपणे हाताशी सुख लागावं त्याप्रमाणं गवसतात! रात्रीच्या वेळी आभाळ झगमगून उठतं. चैत्राचं आभाळ मनाला, डोळ्यांना अन् आपल्या आत आतल्या संगीताला सुरेल साथ करतं... स्वर आपल्याभोवती जमा होतात. आपण चांदण्यांच्या बिछान्यावर मुक्तपणे लोळत पडतो. चांदणं जे मुग्ध असतं, स्निग्ध असतं, आपल्याला प्रफुल्लित करतं. आपण चैत्रात चांदणंच अंथरतो, चांदणंच पांघरतो.

चैत्रातलं नक्षत्र आभाळ आपल्या मनाच्या कोपऱ्यात जाऊन बसतं. आपण त्याला प्रेमानं जपतो आणि पुन्हा पुन्हा आठवतो... तोच चैत्राचा वारा अन् तीच चैत्राची रात्र...!

खरंतर झाल्यागेल्या जखमांना, दु:खाला पुन्हा पुन्हा उगाळण्यात काहीच अर्थ नसतो. पण हे मन असं की काय सांगावं? एकांतवासात आपल्यातच झुरणारं हे मन! यानं जपल्यात खोलखोल अंतरीच्या वेदना आणि मनाच्या दग्ध यातना. मग दारी कोकिळेचं कूजन सुरू झालं तरी मन आपलं तिथंच...!

*दारी सादते कोकिळा । तरी फुलेनाच चाफा।।*
*खोल जपते आकाश। चैत्र-वैशाखाच्या वाफा।।* (शंकर रामाणी)

चैत्रात माणसानं सारं दु:ख विसरावं. चैत्राचा आरंभ हा अत्यंत शुभ असतो. कारण ही वेळ, हा मुहूर्त म्हणजेच आनंदाचा, सुखाचा अन् शुभकार्याचा असतो. त्या दिवसातला आनंद हा वर्षातल्या कोणत्याही दिवसातल्या आनंदापेक्षा उच्च प्रतीचा असतो म्हणूनच-

हे चैत्रा, तू ये ! तू ये आणि आमच्या वठलेल्या मनांना सुखाची कोवळी पालवी फुटू दे... आमची मनं या झाडा-वेलींसारखी चैतन्यात, बहरात न्हाऊ दे... तू ये, तुझ्या ओंजळीत फलदायी नक्षत्रांची फुलं घेऊन... तू ये आमच्या शरीराला स्पर्शणारा जाणिवेचा शीतल वारा घेऊन...!

हे चैत्रमासा, तू ये आणि आमच्या न फुललेल्या स्वप्नांवर तुझा जादुई हात फिरवून जा... अन् ही अखंड सृष्टी बहरू दे, प्रसन्न होऊ दे तुझ्या आगमनानं ! तुझ्या येण्यानं आमच्यातले ऐक्य, सादाचार आणि अवघे सद्‌गुण उमलून येऊ देत... हे गुण देऊन आम्हा सर्वांना दंगलीपासून, हिंसेपासून वाचव...! या समाजाला वाचव... आणि सर्वात मुख्य म्हणजे माणसातल्या माणुसकीला वाचव... हे चैत्रा तू ये आणि आमच्या चांगल्या संकल्पांना या दिवसानं नव्या वर्षात साकार होऊ दे !!

***

**मुबारक शेख**
१६२/८ ब, आळंदकर चाळ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१


**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

# काळा पैसा

**अरविंद पराजपे**

तसं बघायला गेलं तर पाण्याला जसा रंग नसतो, तसा पैशालाही नसतो. आपण आपल्या संकल्पनांचा रंग देतो आणि विभागणी करतो. जे 'समाजमान्य' नाही, त्याचे 'काळी कृत्ये'असे वर्णन केले जाते. 'काळा रंग' हा दुर्वर्तनाचं प्रतीक मानला गेला आहे. चित्रांमध्येही, चोर-दरोडेखोर हे काळा चष्मा घातलेले आणि काळ्या पट्ट्यांचे टीशर्ट घातलेले दाखवले जातात. एकूणच 'काळा' या रगांविषयी तिटकाऱ्याची भावना दिसून येते. त्यामुळे पैशाचे वर्णन जेव्हा 'काळा पैसा' असे केले जाते तेव्हा अशाच प्रकारच्या तिटकाऱ्याच्या भावनेने केले जाते. पण अर्थातच काळा पैसा म्हणजे ती नाणी किंवा नोटा ही काही काळ्या रंगांची नसतात बरं का ! मग 'काळा पैसा' कशाला म्हणतात? काळा पैसा म्हणजे ज्यावर कुठलाही कर भरला जात नाही असा पैसा. तो पैसा वैध किंवा अवैध मार्गाने मिळवलेला असतो. मुख्यत: रोख चलनामध्ये याचे व्यवहार होतात. पण अनेकदा चेकने, बँक खात्यातूनही याची उलाढाल होते किंवा वस्तूरूपानेही होताना दिसते.

**काळा पैसा म्हणजे काय?**

प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर गोळा करून केंद्र सरकार व राज्य सरकार विकास कामे करतात. आपल्या देशात सर्वच प्रकारच्या पायाभूत सोयींसाठी म्हणजे रस्ते, वीज, वाहतूक, दळणवळण या सर्वांचीच उभारणी करायला आणि नागरिकांसाठी कल्याणकारी योजना (वैद्यकीय सेवा, शिक्षण इ.) राबवायला आवश्यक असणारा निधी या करांमधून सरकारकडे जमा होतो. त्यामुळे सरकारला जर सर्व उत्पादनांवर आणि सेवांवर कर मिळाला नाही तर या विकास कामांसाठी आणि कल्याणकारी योजनांसाठी पैशाचा तुटवडा पडून नागरिकांचे म्हणजे आपलेच नुकसान होते. त्यामुळेच ज्या पैशावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कर भरला जात नाही तो पैसा 'काळा पैसा' असं म्हटलं जातं आणि त्याचे प्रमाण वाढत जाणे हा चिंतेचा विषय होतो.



**काळा पैसा निर्माण होण्याची कारणे -**

जे लोक पैसा हे उपजीविकेचे साधन न मानता त्यातून त्यांच्या गैरवाजवी इच्छा पुऱ्या करायला बघतात तेव्हा त्यांना कितीही पैसा मिळाला तरी तो कमीच पडतो. जेव्हा तुम्ही पैशाचे गुलाम होता तेव्हा पैसे मिळवायचे अनुचित मार्गही शोधता. पैसे मिळवून गरजा भागवणे, थोडीफार चैन करणे याला कोणाचा आक्षेप नाही. पण जेव्हा पैशाचा उपयोग सत्तासंपादन, प्रसिद्धी, दहशत आणि कुठल्याही पद्धतीने उद्दिष्टे साध्य करण्याकरता केला जातो तेव्हा योग्य - अयोग्यतेचा विसर पडतो.

भ्रष्टाचार हे काळा पैसा तयार होण्याचे सर्वात मोठे कारण आहे. जेव्हा एखाद्या वस्तूच्या विक्रीची पावती दिली जात नाही किंवा त्या पावतीवर लिहिलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम घेतली जाते तेव्हा काळा पैसा तयार होतो. किंवा ज्या गोष्टीकरता पैसा देण्याची अजिबात गरज नसते; पण काम लवकर करण्यासाठी किंवा पाहिजे त्या पद्धतीने करण्यासाठी पावतीशिवाय पैसे दिले जातात; तेव्हा काळा पैसे तयार होतो.



वाचा- 'स्वीकारशील स्वदेशी' ₹ ५० (कृतिप्रवर्तक)

**आपल्या देशात दोन प्रकारचे कर आकारले जातात. एक आहे प्रत्यक्ष कर (Direct Tax) आणि दुसरा आहे अप्रत्यक्ष कर (Indirect Tax). जो करदाता 'कर' म्हणून ज्याचा भरणा स्वत: सरकारी तिजोरीत करतो त्याला 'प्रत्यक्ष कर' म्हणतात. म्हणजे प्राप्तिकर हा व्यक्तीच्या (कंपनी, भागीदारी संस्था हे पण यात आले) उत्पन्नावर आकारला जातो आणि व्यक्तीने स्वत:च हा कर भरणे प्राप्तीकर कायद्यानुसार बंधनकारक आहे. अप्रत्यक्ष करपद्धतीमध्ये व्यक्तीकडून कर वसूल केला जातो. कर भरणारी व्यक्ती व वसुली करणारी व्यक्ती वेगळ्या असतात. उदा. अबकारी कर (Excise Duty) विक्री कर (VAT), सेवा कर (Service Tax) इ.**

**जेव्हा तुम्ही एखादी वस्तू विकत घेता, तेव्हा त्या वस्तूचा उत्पादक त्यावरचा अबकारी कर आणि विक्री कर वस्तूच्या विक्री किंमतीवर आकारून तो तुमच्याकडून वसूल करतो. त्यानंतर सरकारच्या तिजोरीत भरतो. तसंच तुम्ही एखादी सेवा घेता, म्हणजे उदा. दूरध्वनी. तेव्हा ती सेवा पुरवणारी संस्था (बीएसएनएल) तुमच्या मासिक बिलावरती सेवा कर आकारून तुमच्याकडून कर वसूल करून सरकारी तिजोरीत भरते.**

पूर्वी वाहनांना विशिष्ट क्रमांक हवे असतील तेव्हा लोक पावतीशिवाय पैसे देऊन असे क्रमांक मिळवत असत. आता मात्र ज्यांना असे क्रमांक हवे असतील (उदा. २२२२) त्यांना पैसे भरून पावती मिळते व तो क्रमांक मिळतो.

स्थावर मालमत्तेच्या व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणावर काळ्या पैशाची उलाढाल होत असते. जमिनीचे, घरांचे व्यवहार होताना करारपत्रात लिहिलेल्या रकमेवरची काही रक्कम ही रोख स्वरूपात दिली जाते. या रकमेवर अर्थातच मुद्रांक शुल्क भरले जात नाही व सरकारचा महसूल बुडतो. त्याशिवाय अशा रोख रकमेवर प्राप्तिकर कायद्यानुसार भांडवली नफा करही वसूल होत नाही व तोही कर सरकारला मिळत नाही. त्याबरोबरीने व्हॅट किंवा सेवाकर यांचीही आकारणी या रोख रकमेवर न झाल्याने तेही कर सरकारी तिजोरीत जमा होत नाहीत.

अशा पद्धतीने जेव्हा जेव्हा काळ्या पैशात उलाढाल होते तेव्हा तेव्हा सरकारचा महसूल बुडतो. याचा परिणाम म्हणजे जे प्रामाणिक करदाते आहेत त्यांच्याकडूनच या 'अप्रामाणिक' पणाची किंमत कळत-नकळत वसूल केली जाते. त्यामुळे जेव्हा सरकारी महसूल वाढवण्याकरता कराचे दर वाढवले जातात, तेव्हा त्याचा अधिक भार प्रामाणिक करदात्यांवर पडतो. जेवढा कराचा दर अधिक तेवढी ही करचुकवेगिरी म्हणजे काळा पैसा निर्माण व्हायची शक्यता वाढत जेते. त्यामुळे सर्व प्रकारच्या करांचे दर (म्हणजे प्राप्तिकर, विक्रीकर, अबकारी कर, आयात कर, सेवा कर, भांडवली नफा कर, जकात कर, करमणूक कर आणि केंद्र, राज्य सरकार आणि ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हापरिषद, महानगरपालिका यांच्याकडून होणारी कर आकारणी) हे वाजवी असणे आवश्यक आहे. समाजवादी समाजरचनेत फक्त श्रीमंतांकडूनच कर आकरणी व्हायला पाहिजे असे म्हटले जात होते. त्या विचारसरणीचा परिणाम म्हणून आपल्या देशात काही वर्षांपूर्वी कमाल ९०% पेक्षाही जास्त दराने त्या प्रकारची आकारणी होत असे. तो दर आता कमाल ३०% एवढा कमी केला गेला आहे. त्यामुळे कर बुडवणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे; पण त्यातही अजून सुधारणेला मोठा वाव आहे.

आपल्या देशात होणाऱ्या सर्व प्रकारच्या निवडणुका हे काळा पैसा निर्माण करण्याचे आणि खर्च व्हायचे मोठे कारण आहे. पंचायत समिती, जिल्हापरिषद, नगरपालिका, विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, साखरकारखाने, पतपेढ्या, विकास सोसायट्या अशा अनेक निवडणुकांमध्ये मते मिळवण्याकरता 'काळा पैसा' वापरला जातो. निवडणुकीच्या आचारसंहितेनुसार काही ठरावीक रक्कमच निवडणुकीसाठी खर्च करण्याची परवानगी असते; पण आचारसंहितेपेक्षा कितीतरी अधिक रक्कम निवडणुकांवर खर्च केली जाते. त्याची कुठल्याही प्रकारे नोंद ठेवली जात नाही. निवडून आलेले सदस्य तो पैसा वसुल करण्यात आणि पुढच्या निवडणुकीसाठी तो उभा करण्याच्या मागे लागतात. सरकारनेच निवडणुकांचा खर्च करावा आणि राजकीय पक्षांनी पारदर्शीपणे देणग्या घ्याव्यात अशा अनेक निवडणूक


**प्रायोजक - श्री. विद्याधर सहसबुद्धे, अंधेरी**

सुधारणांची चर्चा होते, पण अंमलबजावणी होत नाही. ती झाल्यास ही समस्या कमी होऊ शकेल.

अगदी लहान पातळीवरही काळा पैसा तयार होत असतो. बसच्या वाहकाने सुटे पैसे न देणे, टोल नाक्यावर पावती न घेता (कमी) पैसे देणे, टीसीला रेल्वे तिकिटांकरता वर पैसे देणे, अनधिकृत (पायरेटेड) सीडी/पुस्तके खरेदी करणे, अशाप्रकारे कळत-नकळत आपणही 'काळा पैसा' तयार करायला हातभार लावत असतो. अनेक वेळा पावती या नावाखाली 'एस्टीमेट, कोटेशन' असे काहीतरी लिहिलेला कागद दिला जातो. जी एक धूळफेक असते. ज्या पावतीवर क्रमांक नाही, किंवा विक्रेत्याचे नाव, पत्ता, त्यांचे नोंदणीक्रमांक (विक्री कराचे) नाहीत त्या पावत्यांना काही अर्थ नाही. तेव्हा प्रत्येक ग्राहकाने अशा अधिकृत पावतीचा आग्रह धरला पाहिजे. सायकल स्टँडवरही अनधिकृतरित्या पावत्या दिल्या जातात. आपणही कळत-नकळत या सर्व उलाढालीचे घटक बनतो. वस्तू किंवा सेवा घेताना पावती हवी असेल तर १०% जास्त असे सांगितले जाते. जेव्हा ते १०% वाचवण्याकरता पावती न घेता व्यवहार होतो; तेव्हा ही काळ्या पैशाची निर्मिती होत असते.

परदेशी बँकामधला काळा पैसा भारतात आणावा व तेथे तो ठेवणाऱ्यांची नावे जाहीर करावीत; याकरता सुप्रीम कोर्टात खटला चालू आहे. असा पैसा किती आहे याचा निश्चित आकडा माहीत नसला तरी तो प्रचंड प्रमाणात आहे हे निश्चित. हा पैसा जर आपल्या देशातील विकास कामांना उपलब्ध झाला; तर या देशातील भांडवलाची गरज भागू शकेल असे तज्ज्ञांचे मत आहे. सार्वजनिक जीवनात पारदर्शीपण आणणे हा 'काळा पैसा' कमी करण्याचा महत्त्वाचा उपाय आहे. सर्व नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्री, न्यायाधीश, अधिकारी यांनी आली संपत्ती जाहीर करावी. सरकारी कायदेकानून जर कमी किचकट केले तरीही भ्रष्टाचार कमी होऊन काळा पैसा निर्माण होण्याला आळा बसू शकतो. शिवाय जास्तीत जास्त व्यवहार धनादेशाद्‌वारे करावेत.

सध्या e-governance हा शब्द रूढ होतो आहे. जर सरकारी व्यवहार त्या पद्धतीने होऊ लागले तर अधिकाऱ्यांची किंवा मंत्र्यांची मनमानी कमी होईल. तंत्रज्ञानाचा अधिक उपयोग करून व्यवहार सोपे आणि सामान्यांच्या हितासाठी करता येतील. माहितीच्या अधिकाराचाही आता वापर सुरू झाला आहे. त्यामुळे पारदर्शी व्यवहारांना चालना मिळते.

भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीला आल्याने निराशाजनक चित्र निर्माण होऊन आपल्या देशाची प्रतिमा काळवंडून गेली आहे. ती उजळ करण्याचे सामर्थ्य हे आपल्या देशातल्या सर्वसामान्य नागरिकांमध्ये म्हणजे तुमच्या-आमच्यातच आहे.

वैयक्तिक आयुष्यात चारित्र्य जपून काळ्या पैशाच्या या समस्येवर आपण मात करू शकू.

***

**– अरविंद परांजपे**
२ गीता सहनिवास, ५/१० एरंडवणे, पुणे 411004
aspa@vsnl.com

*** काळा पैसा निर्माण होऊ नये/त्याला आळा बसावा म्हणून काय काय करता येईल, असे तुम्हाला वाटते आहे? तुम्ही स्वत: विचार करा. मित्र-मंडळीत चर्चा करा. तुम्हाला जे उपाय सुचतील ते नक्की आम्हाला लिहून कळवा.**

*** घरातल्या गड्यांना, मोलकरणींना दिला जाणारा पगार काळा पैसा आहे का? चर्चा करा. या किंवा तुमच्या मनात या विषयासंदर्भातले जे प्रश्न असतील ते पोस्ट कार्डवर लिहून जरूर पाठवा. तुमच्या प्रश्नांना उत्तर नक्की पाठवलं जाईल.**

**सामूहिक विद्याव्रत–संस्कार**

१३ ते १६ वयोगटातील सर्व मुला–मुलींसाठी
सामूहिक विद्याव्रत संस्कार आणि व्याख्यानमाला
**दिनांक –** १८ ते २३ एप्रिल २०११
**शुल्क –** ₹ १०००/–
**नावनोंदणी –** १५ एप्रिल २०११ पूर्वी.
**संपर्क –** संस्कृत संस्कृति संशोधिका (संत्रिका), ज्ञानप्रबोधिनी, पुणे
**दूरभाष क्रमांक –** (०२०) २४२०७ ०००/१४६, ९४२२०५९७९५, ९८५०३९४५९८


वाचा- 'जिद्दीची लोभस रूपे' (छात्र प्रबोधन प्रकाशन)

बहुगुणी संशोधिका

# रोझलिंड फ्रँकलीन



सन १९६२ - डीएनए रेणूच्या रचनेचा शोध लावल्याबद्दल वॉट्सन-क्रिक -विल्किन्स ह्या त्रयीला नोबेल पारितोषिक मिळालं!

अपेक्षितच होतं ते. ज्या रेणूमुळे अनुवंशिकता पुढच्या पिढीत जाते; त्या रेणूची रचना ह्या तिघांनी उकलून दाखवली होती. जीवशास्त्रातला प्रचंड महत्त्वाचा शोध होता तो !

या त्रयीनं डीएनएच्या रचनेचं त्रिमितीय प्रतिमान (3-D Model) तयार केलं ते विल्किन्सनं मिळवलेल्या एका विशिष्ट प्रकारच्या प्रकाशचित्रावरून. कुठून मिळवलं त्यानं हे प्रकाशचित्र?

ते प्रकाशचित्र होतं - प्रकाशचित्र क्र. ५१ आणि ते काढलं होतं रोझलिंड फ्रँकलीन नावाच्या एका ३३ वर्षीय शास्त्रज्ञानं; एक्स-रे-डिफ्रॅक्शन ह्या तंत्राचा वापर करून ! पण डीएनएच्या संदर्भात 'रोझलिंड फ्रँकलीन' हे नाव कुठंच आलं नाही. का बरं?

लंडनच्या सुखवस्तू फ्रँकलीन कुटुंबात २५ जुलै १९२० रोजी रोझलिंडचा जन्म झाला. फ्रँकलीन कुटुंबात स्त्री-पुरुष भेदभाव सुदैवानं नव्हता. त्यामुळे रोझलिंडचं शिक्षण चांगल्या शाळा-महाविद्यालयांत झालं. महाविद्यालयाच्या अंतिम परीक्षेत भौतिक-रसायनशास्त्रात तिनं सर्वोत्तम गुण मिळवले. कालांतरानं बी-क्युरा (B-CURA) ह्या सरकारी प्रयोगशाळेत कोळशावर संशोधन करण्यासाठी ती रुजू झाली. १९४५ साली म्हणजे वयाच्या पंचविसाव्या वर्षी केंब्रिज विद्यापीठानं तिला पीएच.डी. ही पदवी दिली. १९४७ साली ती पॅरिसला फ्रेंच संरक्षण मंत्रालयाच्या संशोधनशाळेत दाखल झाली. पुढच्या तीन वर्षांत तिनं लिहिलेले कार्बन वरच्या संशोधनाचे पाच शोधनिबंध त्या क्षेत्रातले मैलाचे दगड ठरले.

पॅरिसमध्ये कितीही महत्त्वाचं संशोधन करत असली, तरी रोझलिंड मायदेशी परतण्याची संधी शोधत होती. सुदैवानं लंडनच्या किंग्ज कॉलेजमध्ये तिला तशी संधी मिळाली. डी. एन. ए. रेणूंवर क्रिस्टलो-ग्राफीच्या तंत्रानं संशोधन करण्यासाठी प्रा. रॅन्डॉल ह्यांनी तिला बोलावून घेतलं.

रोझलिंड मायदेशी परत आली खरी, पण इथलं वातावरण पॅरिसच्या अगदी विरुद्ध होतं. इंग्लंडमध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर वागवलं जात नव्हतं. त्यांना प्रगत अशा संशोधन क्षेत्रातही सहज स्वीकारलं जात नव्हतं.

हाताखाली काम (संशोधन) करणाऱ्या गॉस्लिंगला बरोबर घेऊन रोझलिंडनं डीएनएवरचं काम सुरू केलं. तिला एका प्रयोगात डीएनएचे दोन प्रकारचे तंतू आढळले. ह्यापूर्वी तसे कुणालाच आढळले नव्हते.

रोझलिंड किंग्जमध्ये येण्यापूर्वी विल्किन्स हा डीएनए रेणूंच्या रचनेवर काम करत होता. प्रा. रॅन्डॉल ह्यांनी रोझलिंडच्या हाती संपूर्ण संशोधन (डीएनएच्या बाबतीतलं) सोपवलं आहे, हे त्याला सांगितलंच गेलं नाही. त्यामुळे रोझलिंड आणि विल्किन्स ह्यांच्यातली गैरसमजूत आणि तेढ वाढतच गेली. त्यामुळे विल्किन्स आपल्या दोन मित्रांच्या - वॉटसन आणि क्रीक - जाळ्यात ओढला गेला. विल्किन्सकडून त्यांनी डीएनएच्या रचनेविषयी संभाव्य आराखडे मिळवले.


प्रा.- श्री. सागर सुभाष सुराणा, चिंचवड, पुणे


रोझलिंडविषयी मनात आकस असल्यामुळे विल्किन्सनं ह्या दोघांना संशोधनातली अगदी बारीकसारीक माहिती दिली. वॉटसन-क्रीक ह्यांनी आठवड्याभरात त्या ऐकीव माहितीवरून एक प्रतिमान (Model) तयार केलं. रोझलिंडच्या प्रकाश-चित्रांवरून मिळणाऱ्या निष्कर्षांपेक्षा खूपच वेगळं असं हे प्रतिमान होतं.

प्रतिमान उभारण्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे प्रसिद्धी आणि ते घाईगडबडीत उभारण्याचं कारण म्हणजे अमेरिकेत समांतरपणे हाच विचार करून प्रतिमान उभारणारे डॉ. पाऊलिंग !

३० जानेवारी १९५३ ह्या ऐतिहासिक दिवशी रोझलिंडनं काढलेले 'प्रकाशचित्र क्र. ५१' विल्किन्सनं वॉटसन-क्रीक ह्यांना दिले. हे प्रकाशचित्र अत्यंत सुस्पष्ट होतं. डीएनएची मळसूत्रासारखी (Helical) रचना स्पष्टपणे दाखवणारं जगातलं पहिलं चित्र होतं ते ! त्या प्रकाशचित्राच्या आधारे पाऊलिंगवर मात करत वॉटसन-क्रीक ह्यांनी २८ फेब्रुवारीला डीएनएचं प्रतिमान उभं केलं.

पण हे प्रतिमान आपणच काढलेल्या फोटो क्र. ५१ वरून उभारलं आहे, हे रोझलिंडला कळलंच नाही. 'नेचर' ह्या जगप्रसिद्ध शास्त्रीय नियतकालिकाकडे पाठवलेल्या लेखात तिनं 'आम्ही काढलेल्या प्रकाशचित्रांचे निष्कर्षही प्रतिमानाशी मिळतेजुळते आहेत,' असं लिहून स्वत:वर अन्याय ओढवून घेतला.

आपल्या 'संशोधना'विषयी छापून येताना रोझलिंडचं नाव कुठेच येणार नाही, ह्याची वॉटसन-क्रीक ह्यांनी पुरेपूर काळजी घेतली. (विल्किन्सलाही त्यांनी अलगद बाजूला काढलं; त्यामुळं डीएनएचं हे प्रतिमान 'वॉटसन-क्रीक-मॉडेल' म्हणूनच आज ओळखलं जातं.) अर्थातच नोबेल निवड समितीच्या समोर ही दोनच नावं आली. पण नंतर त्यांनी विल्किन्सलासुद्धा ह्या दोघांच्या बरोबरीनं निवडलं.



**DNA चं**
**त्रिमितीय प्रतिमान**

किंग्जमध्ये घुसमट होत असल्यामुळे रोझलिंड तिथून बाहेर पडायची संधी शोधत होती. सुदैवानं तिला बर्कबेक कॉलेजमध्ये टिएमव्ही (तंबाखूच्या पानावरील एक विषाणू) वर काम करण्याची संधी मिळाली. किंग्ज कॉलेज सोडताना तिला आपल्या सर्व संशोधनाचे तपशील विल्किन्सकडे सुपूर्त करावे लागले. एका संशोधक स्त्रीवरचा हा अजून एक अन्याय!

सतत क्ष-किरणांच्या साहाय्यानं काम करत असताना योग्य ती काळजी न घेतल्यामुळे रोजलिंडला कर्करोग झाला. दोन शस्त्रक्रिया करूनही तो आटोक्यात आला नाही. आपलं मरण स्पष्टपणे समोर दिसत असतानाही रोझलिंड प्रयोगशाळेतच असायची. त्या काळात तिनं पोलिओच्या विषाणूवर संशोधन केलं. हे तिचं संशोधन पुढच्या काळातल्या संशोधनासाठी अतिशय मोलाचं ठरलं.

१६ एप्रिल १९५८ रोजी, रोझलिंडचं निधन झालं, त्यावेळी, तिचा एक लेख फॅराडे सोसायटीमध्ये जाहीरपणे वाचला जात होता. तिचे बर्कबेक कॉलेजमधले गुरू डॉ. बर्नाल ह्यांनी तिच्यावर लिहिलेला मृत्युलेख १९ एप्रिलला 'द. टाईम्स' मध्ये प्रसिद्ध झाला आणि त्याच अंकात तिनं बनवलेल्या टिएमव्हीच्या प्रतिमानाचं प्रकाशचित्रही प्रसिद्ध झालं होतं !

क्रीकनं काही वर्षांनी आपण चोरून माहिती वापरल्याची कबुली दिली. नंतर वॉटसनलाही आपण रोझलिंडच्या प्रकाशचित्रावरून मॉडेल बनवल्याचं कबूल करावं लागलं !

रोझलिंड ही एक संशोधिका असली, तरीही ती एक स्त्री होती. त्यामुळे वेळोवेळी तिचे हक्क डावलले गेले. पण तिनं त्याही परिस्थितीत जे संशोधन केलं ते अनेकांनी संदर्भ म्हणून वापरलं. अनेक विषयांमधल्या संशोधनाचा पायाच रोझलिंडनं घालून ठेवला होता. क्रीकनंच नंतर एका मुलाखतीत सांगितलं, 'अजून तीन महिने जर रोझलिंड डीएनएवरचं संशोधन चालू ठेवती, तर तिनं डीएनएचं प्रतिमान नक्कीच उभं केलं असतं!'

अशा ह्या बहुगुणी संशोधिकेचं नावही आज माहिती नसावं, हे केवळ दुर्दैवच.

**– अमेय कुलकर्णी**
amaydilip@gmail.com



वाचा- 'त्रिमितीची किमया' (छात्र प्रबोधन प्रकाशन)




पावस येथील ग्रामीण मेळाव्यात
विज्ञान प्रयोग करताना विद्यार्थी


# ग्रामीण मेळावे

छात्र प्रबोधनच्या ग्रामीण दिवाळी अंकांवर आधारित 'ग्रामीण मेळावे' याही वर्षी उत्साहात पार पडले. महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांतील १९ शाळांमधील सुमारे १२०० विद्यार्थ्यांपर्यंत या निमित्ताने आपण पोहचू शकलो. सातारा, कल्याण, बोरिवली, डोंबिवली, पावस, इचलकरंजी येथील कार्यकर्त्यांच्या पुढाकारामुळेच हे शक्य झाले. विशेष म्हणजे 'छात्र प्रबोधन'च्या पुण्यातील सर्व सदस्यांनी मिळून एकूण ८ मेळावे घेतले. सर्व ठिकाणी शाळेच्या वेळातच इ. ६वी ते ९वी पर्यंतच्या एका वर्गावर सुमारे ४ ते ५ तासांचे हे मेळावे झाले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, उत्तम साहित्याचा त्यांना परिचय व्हावा, त्यांचा सभाधीटपणा वाढावा, यादृष्टीने मेळाव्यांची आखणी केली होती. गोष्टी, गाणी, विज्ञान प्रयोग, हस्तकौशल्य, साहित्यिकांशी दूरभाषवर गप्पा, वाचनवेगाच्या संकल्पनेचा परिचय, अंकातील साहित्यावर आधारित सादरीकरण असा मेळाव्याचा भरगच्च कार्यक्रम होता. त्यामुळे कमी कालावधीत खूप काही गोष्टी विद्यार्थ्यांना शिकता आल्या, अनुभवता आल्या. विशेष म्हणजे 'सर्व मुलांसमोर काही सादर करण्याचा अनुभव आम्ही प्रथमच घेतला' अशी प्रतिक्रिया बहुतांश विद्यार्थ्यांची होती.


मेळाव्याच्या समारोपात सर्व मुलांना 'धम्माल सुट्टी' नावाची एक छोटेखानी पुस्तिका भेट देण्यात आली. या पुस्तिकेच्या आधारे त्यांनी मे महिन्याच्या सुट्टीत त्यांच्यापेक्षा लहान वयोगटातील मुलांचे 'आनंद मेळावे' घ्यावेत अशी अपेक्षा आहे. गतवर्षी प्रमाणेच 'नातू ट्रस्ट'ने या मेळाव्यांसाठी भरीव अर्थ साहाय्य दिले. त्यांचेही आम्ही मन:पूर्वक आभारी आहोत.

---









# रेशीम नातं कागदाशी

हॅडमेड पेपर, आयव्हरी पेपर, मिररकोट पेपर यापैकी आवडतील त्या पेपरवर आपल्याला आवडतील तसे साधे आणि सोपे आकार प्रथम चित्रित करावे. बारीक सुई घेऊन साधारण एकाच अंतरावर काढलेल्या चित्रावर छिद्रे पाडून घ्यावीत. त्यानंतर कागदाच्या मागील बाजूस दोऱ्याची गाठ येईल अशा प्रकाराने सुई दोरा ओवावा व कापडावर भरतकाम केले जाते तसेच जवळजवळ पण सरळ सरळ अशा पद्धतीने धागे घालण्याचा सराव करावा. (धागे घालताना ज्या छिद्रातून सुई वर आली आहे; त्याच्या समोरच्या छिद्रात सुई घालावी व लगतच्याच छिद्रातून वर आणावी.) सोपी रचना करण्याचा सराव झाल्यावर अवघड रचनांकडे वळावे. यातून शुभेच्छापत्र, भिंतीवरचे सुशोभन तयार होऊ शकतात.

**– शुभा रुद्र**
'गोपिका', प्लॉट नं. ७, एल.आय.सी. कॉलनी,
पुणे–सातारा रस्ता, पुणे 411009


**प्रायोजक - स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे**

# काटेझरीचा शिवा

डॉ. राहुल मराठे

**महाराष्ट्राच्या पूर्वेला चंद्रपूर जिल्ह्यातल्या चिमूर डोंगररांगांमध्ये ताडोबा अभयारण्य आहे. वृक्ष, पशू-पक्षी यांनी संपन्न अशा या अभयारण्यात प्रामुख्याने वाघ, बिबट्या, तरस, सांबर, नीलगाय, रानडुक्कर इ. प्राणी विशेष करून आढळतात. भारत सरकारने राबवलेल्या डॉ. मिलिंद वाटवे यांच्या एका प्रकल्पात या ताडोबा अरण्यात जाऊन तेथील वन्य प्राण्यांचा अभ्यास १९९९ ते २००१ मध्ये लेखकाने केला. या प्रकल्पात जंगलाशी मैत्री करण्याची संधीच लेखकाला मिळाली. या जंगलातला असाच एक उत्कंठावर्धक आणि तितकाच अनुभवसंपन्न करणारा एक प्रसंग वाचूया लेखकाच्याच शब्दात...**

३ डिसेंबर २००० ची हकीकत. पहाटे पाच-साडेपाचचा सुमार. थंडी मी म्हणत होती. ब्लँकेट गुरफटून घेऊन मी गाढ झोपेच्या आधीन झालो होतो. अचानक दारावर टकटक झाली. दार वाजले म्हणून मी जागा होऊन विचारले, ''कोण आहे?''

''सर ! मी दिलीप. आपल्याला काटेझरीला जायचे आहे. लवकर चला.''

मी ताडकन उठून अंथरुणातून बाहेर आलो. इतक्या पहाटे दिलीप असा निरोप घेऊन आला आहे म्हणजे नक्कीच काहीतरी वेगळे घडले असणार. दिलीप हा माझा वाटाड्या व आमच्या प्रकल्पातील फिल्ड असिस्टंट, आष्ट्याला राहाणारा. थंडीत कुडकुडत मी आवरू लागलो. माझी एक कप चहाची तीव्र इच्छा दिलीपने ओळखली. चहाचा कप माझ्यापुढे धरत दिलीप 'बातमी' सांगायला लागला,

''सर ! शिवाने गवा मारला. रस्त्याच्या कडेला चिंचेच्या झाडाखाली त्याला ओढत नेल्याच्या खुणा दिसत आहेत.''

''डडमल व एसांबरे कुठे आहेत?''

''ते दोघे तयार आहेत व वाघनाल्यापाशी आपली वाट बघत आहेत,'' दिलीप म्हणाला.

आम्ही दोघे निघालो. बाहेर काळोखच होता. अंतर बरेच होते. मी व दिलीप झपाझप पावले टाकत वाघनाल्यापर्यंत पोहोचलो. ठरल्याप्रमाणे डडमल व एसांबरे तेथे भेटले. हे दोघे वन कर्मचारी. वाघाचा माग काढणे व त्यांची नोंद ठेवणे हेच यांचे नित्याचे काम ! एसांबरे व डडमल जंगलातच लहानाचे मोठे झाले होते. त्यामुळे त्यांना जंगल नीट वाचता यायचे, नीट उलगडायचेही. त्यांनी सांगितले की काटेझरीच्या नाल्याच्या वळणावर शिवाचे ठसे त्यांना दिसले. ते ठसे नाल्यातून प्रवेशद्वाराच्या दिशेने गेलेले दिसले. मग थोड्या अंतरापर्यंत जाऊन ते रस्ता सोडून गवतात गेलेले दिसले. वाघनाला ते काटेझरी हे अंतर दीड कि. मी. आहे. बोलत बोलत आम्ही काटेझरी नाल्याच्या वळणावर पोहोचलो.

काटेझरी हा भाग मुख्य ताडोबा तलावापासून साधारण ४ कि. मी. अंतरावर आहे. घनदाट वृक्ष व त्यामधून वाहणारे झरे यामुळे हा भाग शोभून दिसतो. काटेझरीच्या एका बाजूस लहान टेकडी आहे तर दुसऱ्या बाजूला वाढलेले गवत व घनदाट वृक्ष आहेत. काटेझरीजवळ प्रवेशद्वार आहे. जवळच आष्टा, विलोडा, चंदनखेडा अशी लहान लहान गावे आहेत. माझे सहकारी याच गावामधले होते.



वाचा- 'कहाणी दोन भावांची' ₹ ३० (कथासंग्रह)

वळणावर थांबून आम्ही अंदाज घेत होतो. कारण ज्या भागात शिकार केलेली असते; त्याच्या जवळपासच वाघ असतो. जवळपासच्या खाणाखुणा बघत होतो. आता बऱ्यापैकी उजाडले होते. पक्ष्यांचा किलबिलाट कानी येत होता. हवा थंड होती. आणि अचानक गुरगुरणे ऐकू आले. क्षणभरात आम्ही गप्प झालो. निसर्गाच्या या वाद्यवृंदात शिवाचा आवाज आला होता. सभोवताली धुके पसरले होते. पहाटेचा मंदवारा वाहात होता. आणि त्यामध्ये शिवाचा आवाज ! आम्ही चौघे पटकन खाली बसलो. माना उंच करून बघायचा प्रयत्न केला. आम्हाला काही दिसले नाही. आवाज मात्र शांत झाला. तरीही आम्ही थोडा वेळ तसेच बसून राहिलो. पण फार वेळ असे बसणेसुद्धा योग्य नव्हते. परत उठून उभे राहून रस्त्याने चालायला लागलो. शिकार जिथे होती तिथे पोहोचलो. चालता चालता लक्षात आले की आमची चाहूल लागून शिवा शिकारीपासशी आपली जागा सोडून लांब गेला आहे. आता बऱ्याच गोष्टी करायच्या होत्या. शिकार कोठे व कशी झाली, नक्की काय घडले हे जाणून घ्यायचे होते.

आता पी. एम. करायचे होते. पी एम म्हणजे पोस्टमार्टेम. शवविच्छेदन; पण प्राण्याचे. यामध्ये प्राणी कशाने मृत झाला, किती वेळापूर्वी मरण पावला इत्यादी गोष्टी जाणून घेणे व काही सॅम्पल गोळा करणे हे येते. घटनास्थळाची आम्ही पाहाणी केली. रस्त्यालगतचे गवत वेडेवाकडे चेपले होते. एका गव्याची (अंदाजे वजन ८०० किलो) शिकार झाली होती. अनेक प्रश्न पडले होते. एकाच वाघाने शिकार केली की अजून एखादा वाघ बरोबर आहे? की पिल्लवाल्या वाघिणीने शिकार केली आहे? एकीकडे भीती वाटत होती. पिल्लवाली वाघीण असेल तर आपण चारी बाजूने वेढले गेलो असल्याची शक्यता ! मनातली भीती बाजूला सारून नीट पाहाणी केल्यावर असे लक्षात आले गव्याची शिकार एकाच वाघाने केली आहे. पण ती कशी केली असेल? पाहाणी केल्यावर लक्षात आले की गव्याच्या पुढच्या पायांच्या गुडघ्याच्या कुर्चा दातानी तोडल्या आहेत. ही गोष्ट फारच महत्त्वाची होती. कारण वाघांना ज्यावेळी मोठ्या वजनदार सावजाची शिकार करायची असते; तेव्हा वाघ सावजावर हल्ला करून त्याच्या पुढच्या पायांचे गुडघे दाताने तोडून


| बालविकास शिबिर | क्षमता संवर्धन शिबिर |
|---|---|
| **वयोगट** : ७ ते १२ वर्षे<br>**कालावधी** : ७ दिवस<br>**वेळ** : दुपारी १२ ते ५<br>**शुल्क** : ₹ ११००/- (सर्व करांसहीत)<br>**स्थळ** : ज्ञान प्रबोधिनी, सहकार नगर, कर्वेनगर<br>**शिबिरांच्या तारखा :**<br>♦२५ एप्रिल ते १ मे ११, ♦२३ मे ते २९ मे २०११ | **वयोगट** : १२ पूर्ण ते १६ वर्षे<br>(८वी, ९वी, १० वीत गेलेले विद्यार्थी)<br>**कालावधी** : एकूण ६ दिवस<br>**वेळ** : सकाळी ९ ते दुपारी २<br>**शुल्क** : ₹ ११००/- (सर्व करांसहीत)<br>**स्थळ** : ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०<br>**शिबिराची तारीख :** दि. ३० मे ते ४ जून २०११ |

मुलांमधल्या वेगवेगळ्या बौद्धिक क्षमतांचा विकास, अभ्यास कौशल्यांचा परिचय
विविध खेळ, प्रकल्प, वैयक्तिक मार्गदर्शन इ.द्वारा

**चौकशी साठी संपर्क –** सौ. सुजाता होनप– ९४२०१७८०२०, सौ. योगिता मणियार– २४२०७२०४




**प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे**

काढतो. म्हणजे सावज आपोआपच गुडघ्यावर खाली बसते व ह्यामुळे वाघ सावजाची मान/गळा तोंडात पकडू शकतो. पण हा शिकरीचा प्रकार सर्वच वाघांमध्ये दिसतो असे नाही. मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये अशा प्रकारची शिकारीची पद्धत फार थोड्या वाघांमध्ये दिसून येते. दक्षिणेकडील काही वाघांमध्ये ही पद्धत आढळून येते. पण भारतातील सर्वच वाघ ही पद्धत वापरतात असे नाही. मग शिवानेच ही पद्धत कशी आत्मसात केली? यावर विचार करतच आम्ही शवविच्छेदनाचे काम करत हातो.

शिकार कोणत्या वाघाने केली, हे पाहण्यासाठी वाघ बघणे जरुरीचे होते. शिकार चिंचेच्या झाडाखाली होती म्हणून त्याच झाडावर बसण्याचा निर्णय आम्ही घेतला. निर्णय तसा चुकीचाच होता. पण जवळ असे दुसरे (सुरक्षित) झाडच नव्हते. असे झाड की ज्यावर बसलो असता आम्ही सुरक्षित राहू किंवा वाघाला दिसणार नाही. दिलीप, डडमल आणि एसांबरे हे तिघे भराभर झाडावर चढून उंचावर जाऊन बसले. मी मात्र खालीच राहिलो. झाडावर चढणे ही एक कला आहे. ती प्रत्येकाला जमतेच असे नाही. लहानपणी झाडावर चढता यायचे; पण आता ते शक्य नव्हते. प्रयत्न केला तरी फार वर चढता येईना, कारण झाड थोडे घसरडे झाले होते. जमिनीनासून जेमतेम दहा फूट अंतरावर मुख्य बुंध्याला चिकटून मी बसलो होतो. प्रतीक्षा सुरू झाली होती. त्या तिघांचेही असे म्हणणे होते की, मी फारच खाली आहे अजून जास्त उंचावर यायला पाहिजे. कारण तेथून वाघाला मी दिसू शकेन. प्रयत्न करून अजून थोडा वर जाऊन बसलो. दिवसभर अशा अवस्थेत बसणे अवघडच होते; पण जिद्द होती वाघ बघायचा म्हणजे बघायचाच. आणि हा शिवाच आहे, का अजून दुसरा कोणी तेही बघायचे होते.

शिवा हा नर वाघ काटेझरीच्या परिसरात वास्तव्य करून होता. वाघांचे बारसे करून त्यांना नाव देणे तसे कठीणच. कारण सर्व वाघ वरवर सारखेच असतात. परंतु सोईसाठी त्यांची काही वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांना नाव दिले जाते. तुटके - आखूड शेपूट, धुसर पट्टे, इतर वाघांपेक्षा आडदांड शरीरयष्टी इ. शिवाच्या उजव्या पायाच्या बोटांमधले अंतर जास्त होते. म्हणून त्याला ओळखणं सहज शक्य होतं.

दिवस चांगलाच वर आला होता. बसून बसून पाठ व पाय दुखायला लागले होते. आतापर्यंत गव्याला चांगलीच दुर्गंधी येऊ लागली होती. तेथे बसणे मुश्किल झाले होते. शिवाने शिकार केल्याकेल्याच गव्याला खायला सुरुवात केली होती. वाघाची सवयच असते की आपली शिकार स्वच्छ करून मग खायला सुरुवात करायची. त्याप्रमाणे शिवाने पूर्ण कोथळा बाहेर काढून तो व्यवस्थित साफ करून बाजूला ठेवला होता. हळूहळू त्यावर माशा बसायला लागल्या होत्या; भणभणायला लागल्या होत्या. दिवसभरात वाघ साधारण २० ते ३० किलो मांस खातो. म्हणजे १ आठवडा पुरेल अशी शिकार शिवाने केली होती.

आता दुपार झाली होती.



**जंगल भटकंती करताना...**

*

**निसर्गाने त्यांना घालून दिलेल्या क्रमानेच वन्यप्राणी जात असतात. वन्य प्राण्यांच्यामध्ये आपण आलो तर ते स्वसंरक्षणाकरता आपल्यावर हल्ला करतात.**

*

**निसर्गात चुकीला क्षमा नसते, त्यामुळे या वन्य प्राण्यांचे निरीक्षण करायला जाताना माहीतगार व्यक्तींचे असणे गरजेचे आहे. वेळ-प्रसंग आला तर आपण गोंधळून जाऊ शकतो; पण माहीतगार व्यक्ती असतील तर निभावून जाऊ शकतो.**


वाचा - 'व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत' ₹ ७०



माकडांचे धोक्याचे संकेत वाढू लागले. वाटायला लागले शिवाच आला. साधारण अंदाज होताच की वाघ जेथे शिकर करतो त्या परिसरातच जवळपास शिकारीचे रक्षण करण्याकरता थांबलेला असतो. उजाडेपर्यंत खाऊन झाले की दिवसा कुठल्याशा झाडाखाली आरामात पहुडतो. आणि यावेळी जर एखादा प्राणी शिकारीच्या जवळ आला तर त्या प्राण्याची काही खैर नसते. आता माकडांचे आवाज जवळ येऊ लागले होते. तसे आम्हीपण कान टवकारून वाट बघू लागलो. साधारण दुपारचे ४ वाजून गेले होते. थंडीत लवकर अंधार पडतो. खरं म्हणजे आम्हाला दिवसा उजेडीच परत जायचे होते. पण आता मात्र अडकल्यासारखे झाले होते. जर आम्ही खाली उतरलो असतो आणि शिवा आमच्यासमोर आला असता तर ! बापरे !! आताही अंगावर काटे उभे राहिले. झाडावर बसून राहाण्याशिवाय आम्हाला काही पर्यायच नव्हता. आवाज आता अगदी जवळ येऊ लागला होता. मनात थोडी भीती होती. कारण मीच त्यातल्या त्यात जमिनीपासून जवळ होतो. ते तिघे खूप उंचावर होते. ते वरून शिवाच्या मागावर लक्ष ठेऊन होते. हवेत गारवा वाढू लागला होता. उजेड कमी कमी होऊ लागला होता. संध्याकाळ व्हायला आली होती...

...आमचे लक्ष रस्त्याकडे गेले; तो काय ! शिवा रस्त्याने सरळ आमच्याचकडे येताना दिसत होता. आपल्याच नादात तो येत होता. त्याला पाहून आमची खात्री पटली की हा शिवाच आहे. शिवा अगदी जवळ आला होता. आम्ही अगदी स्तब्ध झालो होतो. पुढे काय घडेल हे कळत नव्हते. शिवा शिकारीजवळ आला मग थोडे थांबून अंदाज घेऊन शिकारीपाशी बसला. शिकार चाटून स्वच्छ केली व जवळच पडलेले हाड तोंडात घेऊन चघळू लागला, चावू लागला ! अडकित्त्याने सुपारी फोडावी तसे तो हाड फोडत होता. मध्येच कान टवकारून इकडे तिकडे बघत होता. मग परत खाणे चालू असे चालले होते.

आता अंधार पसरला... आणि शिवा काही तेथून हलेना. आमची


प्रायोजक - शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका



मात्र चांगलीच फजिती झाली. दिवसभर बसून अंग अवघडलेले. त्यातच भूक लागलेली. काय करावे कळेना. मान वर करता येईना की माझ्या सहकाऱ्यांना हाक मारून त्यांच्याशी बोलताही येईना. की समोरचे, खालचे काही दिसेना. मुळात अंधारल्यामुळे हतबलता आली होती. पण शांत राहाणे गरजेचे होते. बॅटरीसुद्धा लावता येईना. कान उघडे ठेऊन 'ऐकणे' एवढेच आमच्या हातात होते. खाली शिवाची हालचाल जाणवत होती. मधेच तो काही तरी विचित्र आवाज काढत होता. वेगळ्याच आवाजात गुरगुरत होता. या शांततेत हे सर्व अनुभवणे हा विलक्षण अनुभव होता.

बहुधा रात्रीचे आठ वाजले असावे. अचानक काय झाले कळलेच नाही; पण शिवाचा गुरगुण्याचा आवाज आला. तो कोणाच्या चाहुलीने तेथून निघून गेला ते कळलेच नाही. तो लांब निघून गेला याची खात्री झाल्यावर आम्ही चौघे खाली उतरलो. पायाला मुंग्या आल्या होत्या. पाय अवघडले होते. चालणे कठीण झाले होते. पण 'थांबला तो संपला', हे माहीत असल्यामुळे आम्ही भरभर पावले उचलली !

***

**डॉ. राहुल मराठे**
२/२१, लक्ष्मीनारायण नगर,
एरंडवणे, पुणे 411004



वाचा - 'आपला पाऊस' ₹ ३० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

# सृजनाला पंख नवे

## सादरीकरण स्पर्धा निर्णय

**अभिनंदन ! अभिनंदन ! अभिनंदन !**
**प्रथम : एस्. पी. एम्. शाळा, चिपळूण**
**द्वितीय : पंचकोशाधारित गुरुकुल, अंबरनाथ**
**तृतीय : विवेकानंद विद्यालय, चोपडा.**

'छात्र प्रबोधन' दिवाळी अंकातील साहित्यावर आधारित 'सृजनाला पंख नवे' ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली. मुलांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी, त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांना गटकार्याचा अनुभव मिळण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

पुण्यासहित ५ ठिकाणचे (अंबरनाथ, चिखली, चोपडा, चिपळूण येथील) विद्यार्थी गट या स्पर्धेत सहभागी झाले होते. सर्वप्रथम सहभागी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शकांचे मनापासून कौतुक !

सर्वच सहभागी गटांचा उत्साह, धडपड, आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता. मागील वर्षीच्या पुरस्कारप्राप्त गटांनी केलेली धडपड अधिक नेमकी आहे असे जाणवले. या गटांचा आत्मविश्वास, संवादफेक, पार्श्वसंगीताचा वापर खूपच परिणामकारक होता.

त्या दृष्टीने एस. पी. एम., चिपळूण येथील गटाने केलेले कथाकथन, नाट्यरूपांतर प्रभावी होते. 'पाण्याची शाळा' ही कविता सादर करताना या गटातील मुलांनी कवितेला अनुरूप काढलेले जलरंगातील चित्र मनाला भावून गेले. कवितेला पाश्चात्य ढंगाची चाल लावून त्यात सादर केलेला नृत्याविष्कार परिणामकारक होता.

पंचकोशाधारित गुरुकुल, अंबरनाथ येथील गटाने 'अन् लाइटी लागली' ही एकांकिका सादर केली. सहजसुंदर अभिनय, उच्चारातून, देहबोलीतून विनोदी व ग्रामीण ढंग नेमकेपणाने पोहोचवण्यात हा गट यशस्वी झाला. पार्श्वसंगीत म्हणून तबल्याचा खूप छान वापर या गटाने केला.

विवेकानंद विद्यालय, चोपडा येथील गटाने मासिकातील विनोदाचा उपयोग 'फिलर' म्हणून चांगला केला. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे, दादासाहेब नाटेकर पंचकोशाधारित गुरुकुल यांनी पद्याला उत्तम चाल व संगीत दिले. त्यांचे उच्चारही सुस्पष्ट होते.

स्पर्धेचे परीक्षण करताना परीक्षकांना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. निवेदन हे पूर्णपणे विद्यार्थ्यांनी लिहिलेले असते. हे निवेदन जर अजून जास्त खुलविता आले तर स्पर्धकाच्या सादरीकरणात सूसूत्रता येईल. स्पर्धकांना दिलेल्या वेळेचा त्यांनी जास्तीत जास्त वापर केला पाहिजे आणि त्या वेळेत आपल्या कायक्रमात जितके जास्त वैविध्य आणता येईल तितके आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याकरिता साहित्याची निवड करतानाच वेळेचादेखील विचार केला पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाचा दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून आपण अंकात साहित्य प्रकाशित करतो. तो दृष्टिकोन व ती साहित्यमूल्यं मुलांच्या मनात रुजताहेत, हे सादरीकरण पाहिल्यावर जाणवले. तुम्हा सर्वांना सादरीकरणाच्या तयारीसाठी अधिक वेळ व साहित्य निवडीला वाव मिळावा यासाठी दिवाळी अंकाबरोबरच नित्य अंकातील साहित्याची देखील निवड सादरीकरणासाठी यापुढे तुम्ही करू शकाल. तसेच पुढील वर्षाच्या स्पर्धेसाठीचे निवेदन सौर अश्विनच्या (दिवाळी )अंकाऐवजी सौर आषाढच्या (जुलै) अंकात सविस्तर येईल. म्हणजे मग सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पण शाळेच्या व्यग्र वेळापत्रकामुळे भाग घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना तयारीला भरपूर अवधी मिळेल. मग परत पुढच्या वर्षी ताज्या दमाने आणि नव्या जोमाने होणार नं स्पर्धेत सहभागी?

पुढच्या वर्षी यापेक्षा जास्त गट स्पर्धेत सहभागी होतील या अपेक्षेत! पुन:श्च पारितोषिक विजेत्या गटांचे अभिनंदन व इतर सहभागी गटांनी केलेल्या प्रयत्नांचे खूप कौतुक!

**परीक्षक - आश्लेषा महाजन, आदित्य शिंदे, अनघा देशपांडे**

### लेखन - संपादन कार्यशाळा

छात्र प्रबोधन' तर्फे ८ वी ते १०वीतील विद्यार्थ्यांसाठी लेखन-संपादन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात ३ दिवसाच्या या कार्यशाळेत कथा, कविता, ललित या साहित्यप्रकारांचे तंत्र, लेखकांशी गप्पा, संपादकीय कामकाजाचा अनुभव इ. गोष्टींचा समावेश असेल. सौर वैशाखच्या 'इतिहास विशेषांका'त (मे २०११) याबद्दलचे सविस्तर निवेदन देण्यात येईल.इच्छुक विद्यार्थ्यांनी जूनमधले ३ दिवस राखून ठेवावेत.



प्रा.-डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, इंग्लंड

# जीवसृष्टीतील अद्भुत स्वसंरक्षण !

डॉ. मानसी राजाध्यक्ष

**गेलं वर्ष म्हणजे २०१० हे वर्ष आंतरराष्ट्रीय जैवविविधता वर्ष तर त्या आधीचं म्हणजे २००९ हे वर्ष खगोलशास्त्र वर्ष म्हणून साजरं केलं गेलं. त्या त्या वर्षांच्या निमित्ताने, त्या त्या विषयाचं आपल्या आयुष्याशी असलेलं नातं समजण्याचा प्रयत्न केला गेला. आता पाळी आहे रसायनशास्त्राची ! २०११ हे वर्ष आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्रवर्ष म्हणनू घोषित झालंय. त्यानिमित्ताने रसायनशास्त्राचं महत्त्व जाणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. जीवसृष्टीतल्या अद्भुत स्वसंरक्षण रचनांमध्ये रसायनं महत्त्वाची भूमिका बजावतात. चला तर रसायनशास्त्रवर्षाच्या निमित्ताने आता आपण याच रसायनांची थोडीफार तोंडओळख करून घेऊया.**

खरंतर रसायनशास्त्र किंवा रसायनं म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर रंगीबेरंगी रसायनांनी नटलेली शाळा-कॉलेजमध्ये पाहिलेली प्रयोगशाळा उभी राहते. एरवी दिसायला देखण्या असणाऱ्या या रसायनांच्या अभ्यासाचा विषय मात्र तेव्हा नकोसा वाटतो. रसायनं ही काही आपण रोज हाताळत नाही, असा आपला उगाचच गैरसमज झालेला असतो. पण खरंच का हो ही रसायनं फक्त प्रयोगशाळेतच असतात? आपल्या रोजच्या आयुष्याशी रसायनांचा काय सबंध आहे?

कोणी म्हणेल नाही कसा हो, आपलं स्वयंपाकघर तर रसायनांचा खजिनाच आहे. तर कोणी म्हणेल अरे, आपण ज्याच्यामुळे या ग्रहावर सुखाने जीवन जगतो आहोत ते पाणी, हेही एक रसायनच नाही का? आपलं रोजचं अन्न, आपण वापरत असलेली इंधनं, अत्तरासारखी सुवासिक द्रव्यं, आजार बरे करणारी कडूजार औषधं, नटा-मुरडायला लागणारी सौंदर्यप्रसाधनं, अनेक प्रकारची तलम वस्त्रं, स्वच्छता करण्यासाठी वापरले जाणारे साबण, बांधकामासाठी वापरले जाणारे सिमेंट क्रॉंक्रीटसारखे पदार्थ, अशी एक ना दोन अक्षरश: हजारो रसायनं रोज आपल्या दिमतीला हजर असतात. पण या सर्वांच्याही पलीकडे जाऊन आपण आज काही वेगळ्याच संदर्भातल्या रसायनांची माहिती करून घेणार आहोत. ही रसायनं ना कुठल्या प्रयोगशाळेत आढळतात, ना कुठल्याही स्वयंपाकघरात ! तर ह्या रसायनांना तयार करण्याचे कारखाने म्हणजे चक्क प्राणी आणि वनस्पतींची शरीरं आहेत.

आपल्यापैकी जवळजवळ सर्वांनाच आयुष्यात एकदा तरी मुंगी चावली असेल. तिने जिथे कुठे आपल्या शरीराचा चावा घेतला असेल, तिथे आपल्याला जळजळल्याचा अनुभव आला असेल. जरा विचार करा. आपल्याला मुंगी का चावते आणि ती चावलेल्या जागी आपल्याला जी त्रासदायक जाणीव होते, ती कशामुळे? बहुतेक वेळा मुंगी स्वसंरक्षणासाठी आपल्याला किंवा इतर कोणत्याही प्राण्याला चावते. ज्यावेळी असुरक्षित वाटल्याक्षणी जेव्हा मुंगी समोरच्या प्राण्याला चावते किंवा डंख मारते; तेव्हा ती तिच्या शरीरातलं फॉर्मिक आम्ल हे रसायन बाहेर फेकते. या रसायनाचा स्पर्श, तिच्या शत्रूला त्रासदायक ठरतो. मुंग्या स्वसंरक्षणाबरोबरच, स्वत:च्या वसाहतींचं म्हणजे वारुळांचं संरक्षण करण्यातही तत्पर असतात. वारुळात मरणाऱ्या मुंग्यांचं शरीर कुजून तिथे सूक्ष्म जिवाणूंचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून काही कामकरी मुंग्या स्वत:च्या


वाचा - 'कथा इस्रो'ची' ₹ ६० (प्रेरणादायी पुस्तक)



स्पिटींग कोब्रा



ऑक्टोपस

शरीरातून काही रसायनांचा फवारा वारुळात सोडतात. एवढंच नव्हे तर मेलेल्या मुंग्यांच्या शरीरातूनही ओलिक आम्लाचा अंश असलेलं रसायन बाहेर सोडलं जातं, ज्याने वारुळाचं जंतूंपासून संरक्षण होतं. मुंग्यांच्या डंखांमध्ये असलेलं फॉर्मिक आम्ल हे रसायन, मधमाशीच्या डंखामध्येही असतं. पण त्याचबरोबर मधमाशी आपल्या डंखामध्ये मेलिटीन या तीव्र अल्कधर्मी रसायनाचा वापर करते. त्यामुळे मधमाशीच्या डंखाची तीव्रता जास्त असते आणि कधी कधी तर मधमाशीच्या डंखामुळे शरीरावर ॲलर्जीही उठते.

अनेक प्राणी स्वसंरक्षणार्थ आपल्या शरीरातल्या रसायनांचा सढळपणे वापर करत असतात. काही छोटे कीटक तर शत्रूवर चढाई करून जाण्यासाठी आपल्या शरीरातून एक वायुरूपी रसायन सोडतात. हे रसायन थोडंसं जाडसर आणि चिकट असतं. त्यामुळे शत्रुकीटकाचे तोंड किंवा हातपाय चिकटले जातात आणि तो जायबंदी होतो. आफ्रिकेत आढळणारी स्पिटींग कोब्रा नावाची सापाची एक जात आहे. स्पिटींग म्हणजे थुंकणे. स्पिटींग कोब्रा त्याच्यापासून जवळजवळ अडीच ते तीन मीटर अंतरावर असलेल्या शत्रूच्या डोळ्यात थुंकीचा नेमका फवारा मारू शकतो. हा थुंकणारा साप, आपल्या थुंकीद्‌वारा फॉस्फोलिपेसेस ए-२ हे रसायन शत्रूच्या डोळ्यात थुंकतो. या रसायनामुळे पेशींच्या आवरणावर परिणाम होतो, डोळ्यांची विलक्षण जळजळ होते आणि कधी कधी प्राणी आंधळाही होतो.

सापाशी जन्मजात शत्रुत्व असलेला प्राणी मुंगूस. काही ठरावीक जातीची मुंगसं आपल्या शेपटीजवळ असलेल्या पिशवीतून काळ्या-पांढऱ्या रंगाच्या रसायनाचा फवारा सोडतात. हे रसायन म्हणजे मिथाईल किंवा ब्युटाईल थायोलसारखं गंधकाचा अंश असलेलं रसायन असतं. या रसायनाला कुजकं अंडं, कुजकं लसूण आणि जळणारं रबर अशा मिश्रणासारखा दुर्गंध येतो. हे रसायन शरीरातून सोडण्याआधी मुंगुस आपल्या शत्रूला तशी सूचना देतं. पाय आपटून किवा गुरगुरून, आपण तो भयानक वास सोडत असल्याची सूचना देऊनही शत्रू पक्ष बधला नाही, तर मुंगूस स्वसंरक्षणाचं आपलं हत्यार बाहेर काढतं. स्पिटींग कोब्राप्रमाणेच, मुंगूस त्याच्यापासून चार मीटर अंतरावर असलेल्या प्राण्यावर या रसायनाचा अचूक मारा करू शकतं. ज्या वाटेवर हे रसायन मारलं असेल, तिथला तो विशिष्ट वास पुढे कित्येक दिवस तसाच राहतो.

आकाराने अतिशय छोट्या असलेल्या, सोनेरी रंगाच्या बेडकाची एक जात आहे. त्याच्या त्वचेतून एक विषारी रसायन पाझरत असतं. ज्या मार्गाने हा बेडूक गेला असेल, त्या मार्गाला स्पर्श जरी झाला तरी कोंबड्या किंवा कुत्री मरतात. बेडकासारखाच पाण्याशी संबंधित असलेला आणखी एक प्राणी म्हणजे ऑक्टोपस ! स्वत:चा जीव वाचवण्याची ऑक्टोपसची तऱ्हा काही वेगळीच असते. शत्रू आपल्यावर चाल करून येतो आहे, असं लक्षात आल्याबरोबर ऑक्टोपस आपल्या शरीरातून शाईसारखं रसायन सोडतो. पाण्यात तयार झालेल्या त्या काळ्या शाईच्या ढगामुळे मग तो शत्रूला दिसेनासा होतो. ऑक्टोपसच्या शरीरातलं हे काळं शाईसारखं रसायन म्हणजे दुसरं तिसरं काही नसून मेलॅनिन असतं. (माणसाच्या शरीरात असलेल्या मेलॅनिन या रसायनामुळेच माणसाच्या त्वचेला किंवा केसांना रंग प्राप्त होतो.)

प्राण्यांप्रमाणे वनस्पतीसुद्धा त्यांना खायला येणाऱ्या


प्रायोजक - मिनीलेक (इंडिया) पिरंगुट, पुणे

प्राणी-पक्ष्यांपासून स्वत:चं संरक्षण करण्यासाठी अनेक प्रकारची रसायनं वापरत असतात. कधी या रसायनांमुळे वनस्पतींना स्पर्श करणाऱ्या प्राण्यांना खाज सुटते, तर कधी काही वनस्पती खाल्ल्यावर प्राण्यांना अपचन होतं. कधी काही वनस्पतींतून पाझरणाऱ्या रसायनांमुळे पक्ष्यांच्या चोची किंवा पाय चिकटतात आणि पुन्हा त्या वनस्पतींच्या वाट्याला जाण्याची हिंमत ते पक्षी करत नाहीत. काही वनस्पती तर त्यांना खाणाऱ्या कीटकांना वेगळ्याच प्रकारे अद्दल घडवतात. या वनस्पती साधारणपणे कडधान्यांच्या वर्गात मोडतात. कीटकांच्या किंवा प्राण्यांच्या शरीरात प्रथिनं असतात. प्रथिनांमध्ये आरगॅनाईन नावाची अमिनो आम्ल असतात. कीटकांना अद्दल घडवणाऱ्या कडधान्याच्या वर्गातल्या या वनस्पती, प्राण्यांच्या शरीरात आढळणाऱ्या आरगॅनाईनसारखीच रचना असणारं कॅनाव्हॅनाईन नावाचं प्रथिनं नसलेलं रसायन तयार करतात. जेव्हा कोणताही कीटक, पक्षी, प्राणी ही वनस्पती खातो तेव्हा प्राण्याच्या शरीरातली प्रथिनं हे रसायन, आरगॅनाईन आहे असं समजून स्वीकारतात. पण कॅनाव्हॅनाईनमध्ये मुळातच प्रथिनं नसल्यामुळे, ते प्राण्याच्या शरीरातल्या प्रथिनांना नष्ट करायला लागतं; परिणामी तो प्राणी मरतो. काही वनस्पतींच्या पेशींमध्ये सायनोजेनिक ग्लायकोसाईड नावाचं रसायन असतं. जेव्हा एखादा पक्षी ही वनस्पती चावतो, तेव्हा त्यातल्या पेशी फुटतात. पेशी फुटल्याबरोबर त्यातल्या सायनोजेनिक ग्लायकोसाईडमधून हायड्रोजन सायनाईड बाहेर पडतं. हायड्रोजन सायनाईड हे विषारी द्रव्य असून ते श्वासोच्छ्वासाच्या क्रियेत अडथळा आणतं आणि पक्ष्याला आपले प्राण गमवावे लागतात.

प्राणी, पक्षी, कीटक, वनस्पती सर्वांमध्ये निसर्गत:च कोणत्या ना कोणत्या प्रकारची स्वसंरक्षण रचना केलेली असते. ही सर्व स्वसंरक्षण रचना बऱ्याचदा वेगवेगळ्या रसायनांच्याच मदतीने होत असते. ज्याप्रमाणे आजूबाजूच्या शत्रूंपासून स्वत:चा जीव वाचवण्यासाठी प्राणी आपल्या शरीरातल्या रसायनांचा उपयोग करतात, त्याचप्रमाणे शरीरात शिरकाव करणाऱ्या असंख्य रोगजंतूंशी सामना करण्यासाठी शरीरांतर्गतही सुरक्षायंत्रणा असतात. त्यासाठी सर्व जीवांच्या शरीरात अनेक प्रकारची रसायनं कार्य करत असतात. त्यांची माहिती मिळवणं हा ही एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

थोडक्यात काय तर आपलं सारं जीवनच रसायनांनी व्यापून टाकलं आहे. या सर्व मनोरंजक आणि चित्रविचित्र रसायनांची माहिती आपण यावर्षी, आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्रवर्षानिमित्त करून घेऊया.

***

**डॉ. मानसी राजाध्यक्ष**
३०३- मातोश्री हाईटस्, डी. एल वैद्य मार्ग,
दादर, मुंबई 400028
manasi.milind@gmail.com

---

**(पान क्र. ११ वरून पुढे सुरू)**



**डॉ. प्रदीप थालाप्पी –**


IISc बंगळुरु मधून Ph.D. त्यानंतर कॅलिफोर्निया विद्यापीठ, पर्ड्यू विद्यापीठ ह्या ठिकाणी संशोधन सध्या मद्रास IIT (चेन्नई) येथे प्राध्यापक. परदेशांतल्या अनेक विद्यापीठांमध्येही अतिथी प्राध्यापक. रेण्वीय पदार्थ (जे पदार्थ रेणूंनी बनलेले असतात) आणि त्यांचे पृष्ठभाग या विषयात संशोधन. सध्या नॅनोकण आणि बर्फाचा पृष्ठभाग यांवर संशोधन सुरू.



**डॉ. स्वपन पती –**

बंगालमधल्या कल्याणी विद्यापीठातून M.Sc. त्यानंतर IISc - बंगळुरु मधून Ph.D. कॅलिफोर्निया आणि नॉर्थ-वेस्टर्न विद्यापीठ येथे संशोधन. सध्या JNCASR (जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स सायंटिफिक रीसर्च), बंगळुरु येथे प्राध्यापक. आण्विक रचनांवर व त्यांच्या गतीवर तापमानाचा आणि दिलेल्या चालनेचा (exitation) होणारा परिणाम या विषयावर संशोधन.

# निसर्ग सांगतो मला



पाण्याचे तरंग सांगतात मला
एकाच जागी राहून
पसरव तू स्वत:ला...

गाण्याचे बोल सांगतात मला
प्रत्येकाच्या मुखातून
वदवून घे स्वत:ला...

रात्रीचा काळोख सांगतो मला
अंधारामध्ये राहून
प्रकाश बनव तू स्वत:ला...

नदीतील खडक सांगतो मला
या वाहत्या जगामध्ये
स्थिर ठेव तू स्वत:ला...

रंगीत फुलपाखरे सांगतात मला
रसास्वाद घे
तू प्रत्येक चांगल्या गोष्टीतला...


निसर्ग सांगतो मला
हसवून सर्वांना
आनंदी ठेव तू स्वत:ला...

**नीरज पाचपोर**
'पाकळ्या' रचनानगर, परभणी ४३१४०१


प्रायोजक - श्री. अच्युत श्रीपाद दामले, सांगली

# यास्नया पल्याना

**अनुवाद - अनघा भट-बेहेरे**



ल्येव निकलायेविच तलस्तोय (लिओ टॉलस्टॉय) हे रशियन वाङ्मयातीलच नव्हे तर जागतिक वाङ्मयातील एक सुविख्यात नाव आहे. तलस्तोय यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त (२०११) त्यांच्या लेखनातील हे निवडक वेचे... लहान वयात असतानाच तलस्तोय यांच्या नशिबी मातृपितृवियोग आला. आई-वडिलांच्या मृत्युपश्चात् त्यांची आजी व अविवाहित आत्या यांनी त्यांना वाढवले. आईवडील, यास्नया पल्यानावरचे भलेमोठे घर, कुटुंब ह्या साऱ्यांना तलस्तोय यांच्या भावजीवनात फार महत्त्वाचे स्थान मिळाले. प्रस्तुत उताऱ्यात आईवडील व शिक्षक यांना सोडून शहरात शिकायला जाताना तलस्तोय यांच्या मनात काय उलथा-पालथी झाल्या त्याचे हृद्य चित्रण आले आहे.

## ...ममा...

आई दिवाणखान्यात बसली होती आणि सर्वांना चहा ओतून देत होती. एका हातात तिने किटली धरली होती तर दुसरा हात समवारच्या* नळावर होता. समवारमधलं पाणी किटलीभरून खालच्या ट्रेमध्ये वाहायला लागलं होतं. आणि जरी ती तिकडेच एकटक पाहत असली तरी तिच्या ते लक्षात आलेलं नव्हतं, आम्ही खोलीत आल्याचंही तिच्या लक्षात आलं नाही.

आपल्या आवडत्या व्यक्तीचा चेहरा आठवण्याचा प्रयत्न केला, की भूतकाळाच्या इतक्या आठवणी येतात की डोळ्यांतल्या आसवांमधून जसं धूसर दिसतं तसं ह्या आठवणींमधून सगळं धूसर दिसायला लागतं. ही आसवं कल्पनाशक्तीची असतात. त्या वेळी आई जशी होती तशी आठवण्याचा मी प्रयत्न करू लागलो की, मला फक्त तिचे सतत प्रेमळ, दयाळू वाटणारे तपकिरी डोळे आठवतात. मानेवर जिथे छोटे छोटे केस कुरळं वळण घेत असतात त्याच्या थोडं खाली असणारा तीळ, पांढरी कॉलर आणि मला सतत कुरवाळणारा आणि मी ज्याचे सतत पापे घ्यायचो तो तिचा लहानसा, नाजूक, कृश हात आठवतो; पण एकंदर चेहरा निसटतो.

सोफ्याच्या डाव्या बाजूला जुना इंग्लिश पियानो आहे. माझी सावळी बहीण ल्यूबच्का पियानोमागे बसून नुकत्याच गार पाण्याने धुतल्यामुळे लालगुलाबी झालेल्या बोटांनी जीव खाऊन पियानोवर क्लेमेंतीचे* स्वर वाजवत आहे. ती अकरा वर्षांची आहे. तिच्या अंगात जाडाभरडा, लांडा फ्रॉक आणि लेस लावलेली, पांढऱ्या रंगाची तुमान आहे. बराचवेळापासून ती एकच एक सुरावट वाजवते आहे. तिच्यापलीकडे अर्धवट पाठ वळवून गुलाबी रिबन लावलेली टोपी आणि निळं ब्लाऊज घातलेल्या, रागाने लाल झालेल्या मार्या इवानव्ना (आमच्या संगीत शिक्षिका) बसल्या आहेत. कार्ल इवान्‌विच, आमचे शिक्षक, आत आल्यावर तर त्यांचा चेहरा आणखीनच रागीट बनला. त्यांनी रागाने कार्ल इवान्‌विचकडे पाहिलं आणि त्यांच्या अभिवादनाला प्रतिसादही न देता पायाचा ठेका देत ''वन-टू- थ्री, वन्‌,-टू-थ्री'' मोजणं चालूच ठेवलं; आधीपेक्षा जास्तच जोरात.

सवयीप्रमाणे ह्या सगळ्या प्रकाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून कार्ल इवान्‌विच जर्मन पद्धतीच्या अभिवादनासाठी तडक आईजवळ गेले. त्यामुळे ती दचकून



वाचा-'मृदुभाव जागे होता' (छात्र प्रबोधन प्रकाशन)



यास्नया पल्याना

**तलस्तोय यांचा जन्म रशियाच्या मध्य प्रांतातील 'तूला' या गावाजवळ 'यास्नया पल्याना' येथील एका धनाढ्य जमीनदार कुटुंबात झाला. त्या काळातल्या जमिनदारांच्या जहागिरींमध्ये अनेक गावे, शेते, वाड्या, जंगले अशा साऱ्याचा समावेश असे. त्यांच्या लहानपणी सुरवातीला खासगी शिक्षक ठेवून त्यांचे घरीच शिक्षण झाले. नंतर मात्र त्यांना व त्यांच्या भावाला राजधानीच्या शहरात शिक्षणासाठी पाठवण्यात आले.**

भानावर आली. जणू मनातले दु:खद विचार झटकून टाकायला म्हणून तिने मान हलवली. कार्ल इवान्‌विचचा हात तिने हातात घेतला.

''थँक यू डीयर कार्ल इवान्‌विच, '' ती जर्मनमध्ये बोलू लागली, ''मुलं नीट झोपली होती ना?''

कार्ल इवान्‌विचला एका कानाने कमी ऐकू येत असे आणि आत्ता तर पियानोच्या चाललेल्या गोंगाटामुळे त्यांना काहीच ऐकू आले नाही. ते सोफ्याच्या दिशेने वाकले. एक हात आधारासाठी टेबलावर ठेवला. एका पायावर भार देत त्यांनी हलकेच स्मित केलं- हे स्मित म्हणजे मला अदबशीरपणाची पराकोटीच वाटत असे- आपली टोपी किंचित उचचल्यासारखं करून त्यांनी विचारलं,

''नताल्या निकलएव्‌ना, तुमची परवानगी आहे ना?''

आपल्या टकलाला थंडी बाधू नये म्हणून कार्ल इवान्‌विच आपली लाल टोपी कधीही काढत नसत. परंतु प्रत्येक वेळी दिवाणखान्यात येताना ती तशीच ठेवण्याची परवानगी मागत असत.

''राहू दे कार्ल इवान्‌विच... मी तुम्हाला विचारलं, की मुलं नीट झोपली होती ना?'' त्यांच्याकडे वळून चांगल्या मोठ्या आवाजात ममाने विचारलं.

तरीही त्यांना काही ऐकू आलं नाही. त्यांनी डोक्यावर टोपी दाबून बसवली आणि अधिकच गोड स्मित केलं.

मार्या इवानव्‌नांकडे हसून बघत ममा म्हणाली,

''मिमी, जरा एक मिनिट थांब. काहीही ऐकू येत नाहीये.''

आई हसली की तिच्या चेहऱ्यातलं जे काही चांगलं होतं ते अधिकच चांगलं होत असे. आजूबाजूच्या सगळ्या गोष्टी जणू उल्हसित होत. माझ्या आयुष्यातल्या कठीण प्रसंगांत जर ते हसू माझ्या ओझरतं जरी नजरेस पडतं, तरी दु:खं म्हणजे काय ते मला जाणवलंही नसतं. मला असं वाटतं, की ज्याला चेहऱ्याचं सौंदर्य म्हणतात ते एका हास्यात सामावलेलं असतं. जर हास्याने चेहऱ्याच्या आकर्षणात भर घातली तर चेहरा सुंदर; जर चेहऱ्यात काहीच फरक पडत नसेल, तर तो सामान्य आणि जर हास्यामुळे चेहरा बिघडत असेल तर तो कुरूप.

ममाने माझे डोके आपल्या दोन्ही हातात घेऊन मागे वळवले. मग माझ्याकडे एकटक बघत ती म्हणाली, ''तू रडलास का?''

मी उत्तर दिलं नाही. तिने माझ्या डोळ्यांचे पापे घेतले आणि जर्मनमध्ये विचारलं, ''का रडलास तू?''

आमच्याशी लाडाने बोलताना ती नेहमीच जर्मनमध्ये बोलायची.

''मी झोपेत रडलो ममा,'' मी म्हणालो. अगदी बारीकसारीक तपशिलांसह ते स्वप्न आठवून माझ्या अंगावर शहारा आला.

कार्ल इवान्‌चविने माझ्या म्हणण्याला दुजोरा दिला. परंतु स्वप्नाबद्दल ते


वाचा-'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' (छात्र प्रबोधन प्रकाशन)

काही बोलले नाहीत. मग हवा-पाण्याविषयी बोलणं झालं. मिमीनेसुद्धा त्यात भाग घेतला. मग ममाने खडीसाखरेचे पाचसहा खडे नोकरांसाठी ट्रेवर ठेवले* आणि ती उठून खिडकीजवळ ठेवलेल्या भरतकामाच्या फ्रेमपाशी गेली.

''मुलांनो, आता पपांकडे जा. त्यांना म्हणावं बाहेर कोठारांकडे जाण्याअगोदर मला भेटून जा.''

पियानो वादन, तालाचा ठेका मोजणे, रागीट नजर सगळं पुन्हा सुरू झालं. आम्ही पपांकडे गेलो; आजोबांच्या काळापासून 'ऑफिस' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अभ्यासिकेकडे...

## ...पपा...

...रायटिंग टेबलापाशी उभे राहून, पाकिटं, कागद आणि पैशाच्या ढिगाकडे बोट दाखवत पपा रागारागाने काहीतरी बोलत होते. याकव मिखाइलव आमचे दिवाणजी. दरवाजा आणि बॅरोमीटर ह्या दोन्हीच्या मधोमध त्यांच्या नेहमीच्या जागेवर हात पाठीशी बांधून बोटांची भराभर चाळवाचाळव करत ते उभे होते.

पपांचा पारा जसा चढत होता तशी याकवच्या बोटांची हालचाल वाढत होती. पपा बोलायचे थांबले की बोटांची हालचाल पण थांबत होती. याकव स्वत: बोलायला लागला की मग तर त्याची बोटं वेड्यागत हालचाल करायची. मला असं वाटायचं की, त्यांच्या हालचालींवरून याकवच्या अगदी मनातले, आतले विचार जाणून घेणं शक्य आहे. त्याच्या चेहऱ्यावर कोणतेही भाव नसत. नेहमी शांत, आपला आब राखून आणि तरीही अधिकारदर्शक म्हणजे 'माझं बरोबर आहे, बाकी तुमची मर्जी' असं त्याचं बोलणं असे !

आम्हाला पाहून पपा याकवला 'जरा थांबा' म्हणाले आणि मानेने दार बंद करा अशी खूण केली.

''अरे देवा ! याकव तुला काय झालंय?'' त्यांनी दिवाणजीशी बोलणं सुरू ठेवलं; खांदे उडवत ते (त्यांना ती सवयच होती) म्हणाले, ''ह्या पाकिटात आठशे रुबल* आहेत''

याकवने ॲबॅकसचे मणी हलवून आठशे रूबल काढले आणि पुढे काय म्हणून कुठेतरी शून्यात नजर लावून बसला.


''माझ्या अनुपस्थितीतल्या खर्चासाठी, समजले? गिरणीचे तुला हजार रूबल मिळतील... हो की नाही? आठ हजार कर्जाच्या परतफेडीचे; कडब्याचे तुझ्याच हिशोबाने सात हजार किलोंचे - जर पंचेचाळीस कोपेकच्या* भावाने विकले - तर तीन हजार. म्हणजेच एकूण तुझ्याकडे किती पैसे असतील? बारा हजार, हो की नाही?''

''बरोबर, साहेब,'' याकव म्हणाला.

परंतु बोटांच्या हालचालींवरून मी ओळखलं की त्याला काहीतरी उलट सांगायचं आहे, पण पपांनी त्याला बोलूच दिलं नाही.

**'युद्ध आणि शांती', 'आना कारेनिना', 'पुनरुत्थान' ह्या तलस्तोय यांच्या महाकादंबऱ्या जागतिक वाङ्मयातील मैलाचे दगड मानल्या जातात. समाजसुधारक आणि धर्मसुधारक म्हणून सुद्धा तलस्तोय यांचे योगदान फार मोठे आहे. ख्रिस्ताच्या 'हिंसा करू नका' आणि 'शेजाऱ्यावर प्रेम करा' ह्या शिकवणी पायाभूत मानून तलस्तोय यांनी धर्मसुधारणेला व समाजसुधारणेला प्रारंभ केला. चंगळ व चैन यांकडे पाठ फिरवणाऱ्या, श्रमाला प्राधान्य देणाऱ्या, निसर्गाच्या जवळ जाणाऱ्या जीवनशैलीचा त्यांनी पाठपुरावा केला. 'द किंगडम ऑव्ह गॉड इन विदिन यू' हे यांचे पुस्तक विख्यात आहे.**

ल्येव निकलायेविच तलस्तोय





वाचा-'आम्ही असे घडलो' ₹ ८० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

हिंसा व दडपशाही ह्या मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय सत्तेचाही तलस्तोय यांनी निषेध केला. त्यांना जगभरातून अनुयायी मिळाले. त्यामध्ये महात्मा गांधी, रोमाँ रोलाँ यांसारख्या विसाव्या शतकातील महत्त्वाच्या व्यक्तींचा समावेश आहे. महात्मा गांधींनी तर तलस्तोय यांच्या 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' ह्या संकल्पनेला पुढे सत्याग्रहाचे विलक्षण परिमाण दिले.

**

खूप तपशीलवार लेखन करणे हा तलस्तोय यांच्या लेखनाचा एक महत्त्वाचा गुण ! त्यामुळे प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर उभा राहायला मदत होते. हा उतारा वाचतानाही तुम्हाला या गोष्टीचा प्रत्यय येत असेल, हो ना !

तलस्तोय यांची अभ्यासिका



''मग याच पैशातून दहा हजार तू पित्रोव्स्कच्या समितीला पाठवून दे. आता जे पैसे ऑफिसात उरतील... पपा पुढे बोलतच राहिले (याकवने आधीचे बारा हजार एकत्र करून ॲबॅकसचा एकविसावा मणी पुढे सरकवला.)... ते तू मला आणून दे आणि आजच्याच तारखेच्या हिशोबात ते धर. (याकवने ॲबॅकसचे सगळे मणी हलवले आणि ॲबॅकस उलटा केला जणू असं दाखवायला की ते एकवीस हजार पण असेच जातील!) पैसे असलेलं हे पाकीट तू मला ह्या पत्त्यावर आणून द्यायचंस.''

मी टेबलाच्या जवळ उभा होतो आणि पाकिटावर काय लिहिलंय ते मी वाचलं. 'कार्ल इवानविच माऊयरे'

बहुतेक मी ते वाचलंय आणि ते मी वाचायला नकोय, हे जाणवून पपांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि मला हलकेच मागे ढकललं. हे लाडानं कुरवाळलं आहे, की पुढे न जाण्याचा इशारा आहे, हे न समजून मी त्या माझ्या खांद्यावरच्या थोराड, गाठ्याळ हाताचा पापा घेतला.

''बरं साहेब. खबारवस्कच्या पैशांबाबत काय सूचना आहे?''

खबारवस्क हे माझ्या ममाच्या इस्टेटीचे खेडेगाव.

''ऑफिसातच ठेवा आणि मी सांगितल्याशिवाय कशालाही वापरायचे नाहीत ते.''

याकवच्या चेहऱ्यावरून आणि बोटांवरून असं वाटत होतं की ह्या शेवटच्या सूचनेमुळे त्याला खूपच समाधान वाटलं आहे.

आमच्या अभिवादनाचा स्वीकार करून पपा म्हणाले की, खेड्यात राहून आम्ही रिकामटेकडेपणाशिवाय काही करणार नाही. आम्ही काही आता लहान नाही आणि आता आम्ही शिक्षणाकडे गंभीरपणे बघितलं पाहिजे.

''मला वाटतं, की तुम्हाला माहित्येय, की आज रात्री मी मॉस्कोला जाणार आहे, तुम्हाला बरोबर घेऊन. तुम्ही आजीकडे राहायचं. ममा मुलींना घेऊन इथे राहील. तुम्ही नीट राहताहात आणि चांगलं शिक्षण घेताहात हे तिला समजणं, ही तिच्यासाठी खूप मोठी आनंद देणारी गोष्ट असणार आहे.''

गेले काही दिवस चाललेल्या तयाऱ्यांवरून काहीतरी वेगळं घडणार असं आम्हाला वाटत होतंच; पण तरीही ह्या बातमीने आम्ही अगदी थक्क झालो. वलोद्याचा, माझ्या भावाचा, चेहरा लाल झाला आणि थरथरत्या आवाजात त्याने आईचा निरोप सांगितला.

'माझ्या स्वप्नाचा हा असा अर्थ होता तर ! आता यापेक्षा आणखी काही वाईट होऊ नको दे!' माझ्या मनात विचार आला.

मला आईला सोडून जायचं म्हणून खूप वाईट वाटलं; पण त्याच बरोबर आता आम्ही मोठे झालो ह्या विचाराने आनंद झाला.

'जर आम्ही आज जाणार असू, तर आज शिकवणी नक्की होणार नाही; केवढी मज्जा !' पण बिच्चारे कार्ल इवान्‌विच. त्यांना आता बहुतेक कामावरून


वाचा- 'प्रेरक कथा' ₹ ३० (ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन)

कमी करणार. म्हणूनच त्यांच्यासाठी पाकीट तयार केलं असणार. इथेच असंच कायम राहावं, जाऊच नये दूर. म्हणजे आईला सोडून जायला नको किंवा इवान्‌विचना पण वाईट वाटायला नको. आधीच ते बिचारे किती दु:खी आहेत!'

असे विचार माझ्या डोक्यात भिरभिरत होते. मी जागचा न हलता माझ्या काळ्या बुटांच्या बांधलेल्या नाड्यांकडे एकटक बघत होतो.

कार्ल इवानविचशी आणखी काही बोलून आणि याकवला शिकारी कुत्र्यांना खायला घालायला सांगून पपांनी आम्हाला अभ्यास करायला जा म्हणून सांगितलं. माझा हिरमोडच झाला; पण शिकारीला न्यायचं कबूल केल्यामुळे मला थोडं समाधान वाटलं.

वर जाताना मी गच्चीकडे पळालो. दारापाशी उन्हाकडे डोळे किलकिले करून पपांची आवडती शिकारी कुत्री पडली होती.

तिला कुरवाळत आणि तिच्या नाकाची पापी घेत मी तिला म्हणालो,

''मीलच्का, आम्ही उद्या जाणार, अच्छा! आता आपली भेट परत कधीच होणार नाही!...''

मला भावनावेग अनावर झाला आणि मी एकदम रडायला लागलो.

***

**मूळ लेखक -ल्येव निकलायेविच तलस्तोय**

**अनु. अनघा भट-बेहेरे**

३, बसंत बहार,

११९/ब, प्रभात रोड, पुणे ४११००४

आपल्या या लहानपणच्या आठवणी लेखकाने 'द्येत्स्त्व' (बालपण) ह्या नावाने ग्रथित केल्या आहेत. त्यातील हे निवडक वेचे.

---

✻ **समवार** - चहासाठी पाणी गरम करायचे आपल्याकडच्या पाणी तापवायच्या बंबासारखे मोठे भांडे.

✻ **क्लेमेंती** - प्रसिद्ध युरोपीय संगीतकार

✻ चहामध्ये साखर न घालता, तोंडात खडीसाखर, जाम इ. ठेवून चहा प्यायची युरोपीय देशांतील पद्धत आहे. घरातल्या नोकर-चाकरांनी स्वत:हून हे खडीसाखरेचे खडे घेण्याऐवजी घरच्या मालकीणीने /यजमान बाईने ते त्यांच्यासाठी देणे हे अधिक संयुक्तिक.

✻ **रुबल** - रशियामधील १ चलन, **कोपेक** - १०० रुबल = १ कोपेक

---

**तुम्हा**
**मुला-मुलींचा अंक**

**दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मुला-मुलींचा अंक श्रावण (ऑगस्ट २०११) महिन्यात प्रकाशित होणार आहे. त्यासाठी तुमची परीक्षा संपली रे संपली की या सर्जनशील उपक्रमात सहभागी होण्यासाठी नक्की संपर्क करा...**

**तुमच्यात दडलेले चित्रकार, लेखक, कवी यांना वाव द्या... खालील विषयावरचे तुमचे साहित्य, चित्रे जरूर पाठवा...**

- ✻ **मुखपृष्ठासाठी दर्जेदार छान चित्रे (विषय- स्वातंत्र्य, श्रावण)**
- ✻ **छानदार कथा, शानदार ललित**
- ✻ **व्यक्तिपरिचय - स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक / माझा आवडता खेळाडू**

**याशिवाय इतर साहित्याचेही स्वागत आहे !**

साहित्य आणि चित्रे पाठवण्याचा अंतिम दिनांक १० मे २०११

याशिवाय मासिकाच्या संपादनात ज्यांना रस असेल, सट्टीत रोज २-३ तास येऊन अंकासाठी जे वेळ देऊ शकतील अशांनी आपली नावं 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात १ मे २०११ पर्यंत जरूर नोंदवावीत.



वाचा-'अक्षरबोली' (काव्यसंग्रह, छात्र प्रबोधन प्रकाशन)



# वासुदेव माझे नाव

मुखपृष्ठावर वासुदेवाचं रेखाचित्र आहे. या वासुदेव नावाच्या लोककलाकाराविषयी अधिक जाणून घेऊया.

**डॉ. रामचंद्र देखणे**

वासुदेव ही 'मऱ्हाटी' लोकसंस्कृतीमधील एक सात्त्विक लोकभूमिका. तिचं रूप काही आगळंच. मोर हे सरस्वतीचं वाहन. सरस्वती ही विद्येची देवता. विद्येचं प्रतीक म्हणून भगवान श्रीकृष्णानं मोराचं पिस आपल्या मस्तकी मिरवलं आणि कृष्णाचा सवंगडी असणाऱ्या वासुदेवानं, अविद्येला घालवून देऊन श्रीविद्येचा म्हणजे मोरपिसांचा टोप, मस्तकी धारण केला. ज्ञान हे पूर्ण आहे. ते विश्वाला व्यापून राहिले आहे. या पूर्ण ज्ञानाचा घोळदार अंगरखा त्यानं घातलाय. सात्त्विकतेचं प्रतीक म्हणून गळ्यात माळ, पायात चाळ आणि हातात टाळ आहे. ब्रह्ममायेच्या चिपळ्या त्यानं हाती घेतल्यात. नादब्रह्माचा पावा तो वाजवतो आणि संतांच्या घरचा हा वासुदेव सद्‌विचाराचे, विवेकाचे दान मागतो.

काखेला झोळी लावून हातातल्या चिपळ्या वाजवत 'दान पावलं, दान पावलं' म्हणत वासुदेवाची स्वारी अंगणात उभी राहाते. पायातल्या चाळांबरोबर नाचत नाचत, गिरकी घेत घेत रामनामाची महती गात गात तो लोकांना जागे करतो. या वासुदेवाला पाहायला मोठ्या कुतूहलाने लहान लहान मुलं अंगणात जमू लागतात. कुणीतरी त्याच्या झोळीत ओंजळभर धान्य दान म्हणून घालतात आणि तो खड्या आवाजात नाचत नाचत म्हणू लागतो-

*''दान पावलं दान पावलं।*
*भिमाशंकरी महादेवाला, कोल्हापूरात महालक्ष्मीला*
*पंढरपूरात विठ्ठरायाला, दान पावलं, दान पावलं*
*आळंदीमध्ये ज्ञानदेवाला, देहू गावात तुकारामाला*
*पैठणमधी एकनाथाला, सज्जनगडी रामदासाला*
*दान पावलं दान पावलं, दान पावलं*
*जनता जनार्दनाला दान पावलं सद्‌गुरुरायाला....''*

सर्व देवदेवतांची नावे घेत सर्वांनाच 'दान पावलं, दान पावलं', असं म्हणत गिरकी घेऊन पावा वाजवीत, वासुदेव एका अंगणातून पुढच्या अंगणात निघून जातो. वासुदेव अंगणात उभा राहिला म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णच अंगणात उभा राहिल्याचा आनंद होतो.

वासुदेव ही संस्था हजार-बाराशे वर्षांहून जुनी आहे. वासुदेव हा कृष्णसवंगडी आहे आणि कृष्णभक्तही. कृष्णाच्या भक्तीत रंगलेला हा वासुदेव आपल्या पारंपरिक गीतांमधून कृष्णलीलेची आणि भक्तांची गाणी गातो.

कधी कधी देवभक्तांच्या आख्यानकथा वासुदेव गीतातून मांडतो तर कधी कधी राम, कृष्ण यांसारख्या देवादिकांचे आणि महापुरुषांचे पाळणे गाऊन, त्यांच्या आदर्श जीवनाची आठवण करून देतो.

मराठी संतांनी लोकमानसातील वासुदेवाची लोकप्रियता ओळखली आणि वासुदेवावर अनेक भारुडे लिहून, वासुदेवाच्या रूपकातून भक्तीचे दान मागितले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली, संत एकनाथ, नामदेवराय, तुकाराम महाराज यांची वासुदेवावरील भारुडे लोकप्रिय आहेत. संत एकनाथांनी तर वासुदेवाला भारुडात उभे करून, श्रेष्ठ प्रबोधनकार म्हणून उंची प्राप्त करून दिली आहे. त्याच्या रूपकातून अध्यात्माचे आणि तत्त्वज्ञानाचे विचार दिलेआहेत.

*''दुर्लभ नरदेह जाणा । शतवर्षाची गणना ।*
*त्यामध्ये दुःख यातना । तुम्ही आठवा मधुसूदना ।*
*तुम्ही वासुदेववासुदेव म्हणा।''*

आयुष्याचे गणित मांडून ते आयुष्य सार्थकी लावण्याचा उपदेश यात केला आहे. समाजाने सुखी व्हावे, आनंदी व्हावे, समाधानी व्हावे, बंधुभाव नांदावा, भगवत्‌भाव जागा व्हावा, सदाचाराचा बोध व्हावा, म्हणूनच हा वासुदेव श्रेष्ठ जीवनमूल्यांचे दान मागतो आणि संतांच्या विचारांचे ते दान मला मिळाले आहे, असे समजून आनंदाने गिरकी घेत घेत म्हणू लागतो- 'दान पावलं... दान पावलं...' हा वासुदेव म्हणजे अंगणाअंगणात येऊन प्रबोधन घडविणारा खरा लोकशिक्षकच!

***

**डॉ. रामचंद्र देखणे**
सी ३-४, डी एस् के चिंतामणी, ५१३, शनिवार पेठ, पुणे ३०



वाचा - 'छंद आकाशदर्शनाचा' (छात्र प्रबोधन प्रकाशन)

कर्मयोगिनी
भगिनी निवेदिता
लेखांक – ६



# भगिनी निवेदितांची शाळा

**डॉ. सुरुचि पांडे**

भारतातील स्त्रियांच्या शिक्षणाबद्‌दल निवेदितांनी काही काम करावे, अशी स्वामी विवेकानंदांची इच्छा होतीच. शाळा काढली तर मुलींची नावं दाखल व्हावीत इथपासून कामाला सुरुवात झाली होती. त्याबद्‌दल आपण मागच्या भागात वाचलं. निवेदितांच्या आधी पश्चिम बंगालमध्ये स्त्रियांच्या शिक्षणाबाबत ज्यांनी पुरोगामी पाऊल टाकण्याचं सामर्थ्य दाखवलं होतं, त्यातली महत्त्वाची दोन नावं होती - तपस्विनी माताजी आणि गौरी-मां. या दोघींच्या व्यक्तिमत्त्वाची आपण थोडक्यात का होईना ओळख करून घेणं गरजेचं आहे. त्याशिवाय प. बंगाल मधील त्यावेळच्या स्त्री शिक्षणाचं स्वरूप आपल्याला कळणारच नाही.

१८३५ मध्ये दक्षिण भारतात अर्काट जिल्ह्यातील रायबेलूर नावाच्या गावात तपस्विनी माताजींचा महाराष्ट्रीय आईवडिलांच्या पोटी जन्म झाला होता. त्यांचे वडील त्या लहानशा राज्याचे राज्यकर्ते होते. तपस्विनी माताजींचं नाव होतं गंगाबाई. लहान वयापासूनच गंगाबाईंना धार्मिक, संस्कृत साहित्याची आवड होती. त्याचबरोबर त्या घोडेस्वारी, तलवार चालवणं इ. अनेक खेळांमध्ये प्रवीण होत्या. ईश्वराची आणि मातृभूमीची हाक ऐकून त्यांनी घर सोडलं. अनेक अडथळे पार करत त्या झाशीला पोहोचल्या. राणी लक्ष्मीबाई या आईकडच्या नात्याकडून त्यांच्या दूरच्या नातेवाईक लागत होत्या. राणी लक्ष्मीबाईंच्या विश्वासू सहकारी म्हणून गंगाबाईंनी काम केलं. १८५७ च्या बंडात उडी घेतली. राणी लक्ष्मीबाईंच्या पश्चात त्या नानासाहेब पेशव्यांच्या मदतीनं नेपाळमध्ये निघून गेल्या. अंदाजे १८९० च्या सुमारास त्या कोलकत्यात आल्या आणि १८९३ मध्ये त्यांनी मुलींसाठी 'महाकाली पाठशाळा' काढली. १९०७ साली त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या या पाठशाळेला स्वामी विवेकानंदांनी व भगिनी निवेदितांनीही भेट दिली होती.


आता आपण ओळख करून घेऊ 'गौरी-मा' या तडफदार संन्यासिनीची ! 'गौरी-मां'चं पूर्वीचं नाव होतं मृडानी किंवा रुद्राणी. त्यांचा जन्म होता १८५७ सालातला. लहानपणापासूनच स्वतंत्र वृत्ती आणि बुद्धिमत्ता जपणारी मृडानी संन्यस्त आयुष्याची ओढ असणारी होती. १८७५ सालात ती अठरा वर्षांची झाली तेव्हा नातेवाईकांसमवेत तीर्थयात्रेला जाण्याच्या निमित्तानं ती बाहेर पडली. त्यावेळी योग्य संधी साधून यात्रेकरूंच्या गर्दीत ती जाणून बुजून राहिली.

आपल्याला कुणी ओळखू नये म्हणून गौरी मांनी आपले केस कापून टाकले, तर कधी पुरुषासारखा पोशाख करून त्या हिंडल्या. उपवास, मौनव्रत, ध्यान, शास्त्रग्रंथांचा अभ्यास, मंत्रांचं पुरश्चरण, भिक्षान्नाचं सेवन, थंडीवाऱ्याची पर्वा नाही अशी तीन वर्षं त्यांनी काढली. हे करतानाही तरुण गौरी-मांची सामाजिक जाणीव हरपलेली नव्हती. एका खेड्यात कॉलराची साथ आली, तेव्हा पुढं होऊन त्यांनी रुग्णांची सेवा केली. सेवेसाठी एक समिती स्थापन केली. यानंतर मात्र तिनं आपल्या आजारी आईची भेट घेतली. पुढे श्रीरामकृष्णांशी व त्यांची सहधर्मिणी असलेल्या सारदादेवींशी त्यांचा परिचय झाला. गौरीमां सारदादेवींच्या सहवासात राहू लागल्या. श्री रामकृष्णांनी त्यांना स्त्रियांच्या शिक्षणाबद्‌दल काही भरीव काम करण्यासंबंधी सुचवलं. आधी त्यांना ही कामाची कल्पना अगदी पसंत पडली नाही.

गौरीमांनी गंगोत्री व जमनोत्री इ. तीर्थयात्रा केल्या.



वाचा-'हरिसिंह नलुआ' ₹ ६० (छात्र प्रबोधन प्रकाशन)




**रामकृष्ण बालिका मंदिर, कोलकता (तेव्हाचे आणि आत्ताचे)**

वीस वर्षं एवढा दीर्घ काळ हिंडून-फिरून त्यांनी भारतीय माणसांना निरखलं, ज्ञान घेतलं, स्त्रियांची अवस्था पाहिली. दरम्यानच्या काळात रामकृष्णांनी देहत्याग केला. शेवटी रामकृष्णांनी त्यांना सांगितलेल्या कामाची उर्मी दाटून आली आणि १८९५ सालात त्यांनी बराकपूर येथे महिलांसाठी 'श्री सारदेश्वरी आश्रम' या संस्थेची स्थापना केली. या आश्रमात २५ महिला राहू लागल्या. त्यांचं शिक्षण, सांभाळ यांकडे गौरीमां लक्ष देऊ लागल्या. श्री सारदादेवींनीही या आश्रमाला एकदा भेट दिली. पुढं या मुलींची संख्या ५० झाली. आपल्या कामाला आर्थिक निधी उभारण्यासाठी गौरीमांनी दानशील लोकांना आवाहन केलं, देशात विविध ठिकाणी स्त्रियांच्या शिक्षणाच्या महत्त्वावर व्याख्याने दिली.

आता निवेदितांची शाळा हे आणखी पुढचं पाऊल म्हणायला हरकत नसावी. १३ नोव्हेंबर १८९८ या कालीपूजेच्या दिवशी १६ बोसपाडा याठिकाणी श्रीसारदादेवींच्या शुभहस्ते निवेदितांच्या शाळेला सुरुवात झाली.

या शाळेत मुलींना लेखन, वाचन, चित्रकला, मातीकाम, शिवण असे असंख्य विषय शिकवले जाऊ लागले. या शाळेला त्यांनी नाव दिले 'रामकृष्ण बालिका विद्यालय'. स्वत: निवेदिता उत्तम शिक्षिका होत्या. मुली शाळेत यायच्या वेळी त्या दारात स्वत: उभ्या राहायच्या. कोपऱ्यावरून मुली येताना दिसल्या की त्या आनंदून 'आपल्या मुली आल्या', असं म्हणायच्या. बालविधवा म्हणून माहेरी परत आलेल्या मुलींचे कष्टमय आयुष्य पाहून त्या कळवळून जायच्या. अशा मुलींबद्दल, त्यांच्या कडक उपवास-तापास यांबद्दल लक्षात ठेवून त्यांना फळं, मिठाई, खाऊ घालायच्या. भारताचा इतिहास समजावून सांगताना निवेदिता सारे प्रसंग मुलींच्या डोळ्यांपुढे जिवंत उभे करत. राणी पद्मिनी, झाशीची राणी यांच्या तेजोमय आयुष्याबद्दल सांगताना त्यांचे डोळे भरून येत. परंतु शाळेत शिस्तही नीट राखली गेली पाहिजे, याबद्दलही त्या जागरूक आणि कडक असत. त्यांना शाळेच्या कामात भगिनी ख्रिस्तीन मदत करीत. त्याही स्वामीजींच्याच विदेशी शिष्या होत्या. निवेदितांच्या तुलनेत त्या खूपच सौम्य व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्यामुळे शाळेतल्या मुली मजेनं करारी निवेदितांना 'सन दीदी' तर सौम्य ख्रिस्तीनना 'मून दीदी' म्हणत असत! शाळेतल्या मुलींचा लहान वयात विवाह करून दिला जाई. ही बालविवाहाची प्रथा पाहून निवेदिता बेचैन होत. कारण विवाहानंतर त्या विद्यार्थिनींच्या आयुष्यातून शिक्षणाला पूर्णविरामच मिळत असे.

आपल्या शाळेतील मुलींवर जिवापाड प्रेम करणाऱ्या निवेदितांची, आपल्या गुरुदेवतेची आठवण सांगताना त्यांच्या विद्यार्थिनींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहत असत. या शाळा स्थापनेच्या कार्यानंतर भगिनी निवेदितांचे कार्यक्षेत्र अधिक देशव्यापी होत जाणार होते.

क्रमश:

***

**डॉ. सुरुचि पांडे**
सी/९, भोसले पार्क, सहकारनगर क्र. २, पुणे 411009
suruchipande@gmail.com



वाचा - 'मोहोर' ₹ ६० (कथासंग्रह, छात्र प्रबोधन प्रकाशन)

# घोरवडेश्वरावर काय घडलं?

**ईशान पुणेकर**

**उदय आणि परिमल या दोघा मित्रांना 'त्या दिवशी' एका वेगळ्याच प्रसंगाला सामोरं जावं लागलं. अशावेळी उदयचं डोकं 'अचूक' चाललं... समोर उभ्या ठाकलेल्या प्रसंगातून प्रसंगावधान राखून त्याने त्याची व परिमलची सुटका केली. असे प्रसंग काही कुठल्या पूर्वसूचनेने येत नाहीत समोर; पण घाबरून न जाता, चटचट निर्णय घेणं महत्त्वाचं... अशावेळी तुम्ही काय बरं केलं असतंत?...**

उदय आणि परिमल दोघे बेगडेवाडी स्टेशनवर उतरले तेव्हा सूर्य चांगलाच तळपत होता. तिथे फारशी मंडळी उतरली नव्हती. जी उतरली, ती पटापट पांगली.

''भन्नाट!'' परिमल म्हणाला.

''एकदम भन्नाट! त्यातून आपण एकटेच,'' उदय म्हणाला.

''आणि या हिरव्या गवतामधून कुठकुठले साप या क्षणाला सळसळत असतील, नाही? मी तर कल्पनाच करू शकत नाही,'' उदय भारावल्यासारखा म्हणाला.

''उद्याऽ! परतीची ट्रेन आत्ता लगेच आहे?'' पऱ्या खेकसला.

''ओह पऱ्या... नाही बोलत, बास! पण आत्ताशी तर आपली सहल सुरू झालीये,'' उदय समजावण्याच्या स्वरात म्हणाला.




वाचा - 'कवितेच्या गावा' (काव्यसंग्रह, छात्र प्रबोधन प्रकाशन)

''मग तुझं सर्पपुराण पुरे. ओके?''

''ओके.''

उदय आणि परिमल दोघे एकाच वर्गात होते. त्यांची अगदी घट्ट मैत्री होती. पुणे-लोणावळा रस्त्यावर, एका टेकडीवर घोरवडेश्वराचं देऊळ आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी उदयचे बाबा त्याला तिथे घेऊन येणार होते. पण काही कारणाने ते राहिलं. लगेच शाळेला कसलीशी सुट्टी आली होती. उदयने बाबांना 'आम्ही दोघेच जाऊ का म्हणून विचारलं' तर त्यांनी लगेच परवानगी दिली. त्यांना वाटायचं, मुलं कशी बिनधास्त व्हायला पाहिजेत. ते स्वत:ही तसेच होते. पण त्यांची विशेष ओळख म्हणजे ते एक चांगले सर्पमित्र होते. त्यांच्यामुळे उदयलाही बऱ्याच सापांची माहिती झाली होती. तोही साप हाताळायला शिकला होता. तर परिमलला सापांची भयंकर भीती वाटायची.

उदय आणि परिमल डाव्या हाताच्या रस्त्याला लागले. रस्त्यावर काहीच वर्दळ नव्हती. ते गप्पा मारत चालू लागले. पलीकडे कोकिळ ओरडत होता. वसंतऋतू आल्याचं तो वारंवार सांगत होता. वारं छान होतं. पण मधूनच ढग येत होते.

रस्त्याच्या शेजारी पूर्ण कुंपण होतं. ते संपलं तेव्हा ते एका गेटपाशी आले. तिथे एक गार्ड वाळूच्या पोत्यांमागे मशिनगन घेऊन बसलेला होता. ती जागा सैन्याच्या दारूगोळा कारखान्याच्या अखत्यारीतली होती. बाहेर एक रांजण भरून ठेवलेला होता. पऱ्याला पाण्याची आठवण झाली. त्याने त्याची बाटली संपवली होती.

''क्या मैं पानी ले सकता हूँ?'' पऱ्याने विचारलं.

त्यावर तो कडक युनिफॉर्ममधला, उग्र वाटणारा सैनिक हसून 'हो' म्हणाला.

पऱ्याने बाटली भरून घेतली व त्या सैनिकाचे आभार मानून ते पुढे चालायला लागले.

पुढे महामार्ग ओलांडला की थोडंसं पुढे घोरवडेश्वराचा पायथा होता. तिथे कमानीखाली असलेल्या आजोबांकडून त्यांनी पेरू घेतले. खात खात ते चढू लागले. चांगल्या बांधीव दगडी पायऱ्या होत्या. अजिबातच गर्दी नव्हती.

पायऱ्यांच्या पलीकडे पिवळ्या पडलेल्या गवतामध्ये काहीतरी सळसळलं. उदय लगेच खाली वाकला; पण त्याला काही दिसलं नाही.

''उद्याऽ सरडा होता. तू ते खूळ जरा बाजूला ठेव सापांचं. तुला कंपनी द्यायला मी आहे,'' पऱ्या वैतागून म्हणाला.

यावर उदय खजील झाला. मग ते धावत धावत चढू लागले. वर आले तेव्हा ते घामाघूम झाले होते. पऱ्या तर लाल झाला होता. तिथे दोन बाजूला वाटा फुटत होत्या. ते डाव्या बाजूला गेले. तिथे एक गुहा होती. आतमध्ये कुठला देव आहे ते त्यांना कळलं नाही, तरी त्यांनी हात जोडले.

उदयचं डोकं हुंदडायला लागलं होतं. ''पऱ्या, आपण इथून वर चढूया आणि पलीकडच्या बाजूने खाली उतरूया. तिथेच ते मुख्य मंदिर असेल.''

दोघेही खडकावर चढले. पऱ्यालाही ते छोटंसं साहस आवडलं. ते वर चढले व थांबले. त्यांनी आसपासचा परिसर न्याहाळला. वरून डोंगर, तळेगावचं तळं, हिरवी शेतं, छोटी दिसणारी घरं, वेगात पळणाऱ्या, छोट्या वाटणाऱ्या रस्त्यावरच्या गाड्या असं बरंच काही दिसत होतं. काही ठिकाणी ऊन होतं, तर काही ठिकाणी ढगांची सावली होती. रेल्वेमार्ग, स्टेशन व ते ज्या रस्त्याने आले तो रस्ता पाहिल्यावर तर त्यांना मजाच वाटली.

मग ते दुसऱ्या बाजूने खाली उतरायला लागले. तो पावसाचा एखाद-दुसरा थेंब त्यांच्या अंगावर पडू लागला. मातीचा वास सुटला. त्यामध्ये तिथल्या चाफ्याचाही वास मिसळला होता.

ते घसरून खाली आले. त्यांनी अंगणात उड्या मारल्या. तिथे गुहेमध्ये शंकराची पिंड होती. पलीकडे कोणी दिसत नव्हतं पण माणसांच्या बोलण्याचा आवाज येत होता. दोघे गुहेत गेले. त्यांनी दर्शन घेतलं व डोळे मिटून ते शांत बसले. तिथल्या गारव्यामुळे व प्रसन्नतेने त्यांना शांत वाटलं. पण त्यांची शांतता भंग पावली...

बाहेरचे आवाज जवळ आले होते. एक भरदार आवाज म्हणाला,

''भावड्या, आज काम व्हायलाच पायजेल. तू घाबरू नको. मी हायना.''



वाचा- 'बहर' ₹५० (कथासंग्रह, छात्र प्रबोधन प्रकाशन)

आतमध्ये उद्या-पऱ्यांनी कान टवकारले-काय भानगड असावी?

... त्यांना एक पेट्रोलपंप लुटायचा होता!

पण जो कोणी भावड्या होता तो कच खात होता. त्याला तयार करायला, प्लॅन नक्की करायला ते डोंगरावर आले होते. त्यांना हवा तो निवांतपणा तिथे होता.

दोघांना तिथून निघून जावंसं वाटलं. पण ते लोक बाहेरच होते, ते जाईनात. यांना काय करावं कळेना. शेवटी कंटाळून ते बाहेर आले.

त्यांना बघून बाहेरची चौकडी चपापली. पण लगेच...

भडक रंगाचा टीशर्ट घातलेला एक तरुण म्हणाला, ''ए, ह्यांनाच किडनॅप करू.''

हे ऐकताच पऱ्या व उदय नखशिखांत घाबरले.

उदय ओरडला, ''पळ.''

तोच त्यातल्या कानात बाळी घातलेल्या धटिंगणाने हात पसरून वाट अडवली. तोच त्यांचा म्होरक्या असावा. त्याला कळलं होतं - पोरांनी त्यांचं बोलणं ऐकलंय. ह्यांनाच पळवावं. आयती संधी आलीये. भावड्याची आयडिया चांगली आहे.

''ए, पळायचं नाय,'' त्याने शर्ट वर करून पॅंटला खोचलेलं पिस्तूल बाहेर काढलं. खरं पिस्तूल पाहून पोरं गलितगात्र झाली. पण नाही!... काय करावं ते क्षणभर त्यांना सुचेचना!

''साऽप,'' उदय ओरडला.

पऱ्या सावध झाला. त्याला वाटलं उदय खोटं बोलतोय, संधी शोधतोय. पण पलीकडून एक साप मातीवरून सळसळत झाडीमध्ये शिरत होता. सगळेच घाबरले. तो साप सरसर आत चालला होता. काळसर रंगाचा, अंगावर तपकिरी चकचकीत खवले असलेला तो एक मोठा साप होता.

पण उदयने एका नजरेत साप ओळखला होता. साप आत शिरला होता. त्याची फक्त शेपटीच दिसत होती. त्याने झेप टाकली व एका फटक्यात सापाची शेपटी धरली. त्याला बाहेर ओढलं. सगळे अवाक होऊन पाहात होते. क्षणार्धात त्याने तो साप बाळीवाल्या धटिंगणाच्या अंगावर फेकला. या आक्रमणाने साप चिडला, तो जोरात फूत्कारला व बाळीवाल्याला कडकडून डसला. त्याच्या हातातलं पिस्तूल उडालं. तो 'मेलो मेलो' म्हणून किंचाळला. साप खाली पडला व लगेच सरपटत दिसेनासा झाला.

उदयने क्षणाचाही वेळ न घालवता पलीकडे पडलेलं पिस्तूल उचललं व तो पळाला. पऱ्याला सांगायची गरज पडली नाही. दोघे पळाले. त्याच वेळी पावसाची एक सर आली.

बाळीवाला धटिंगण हात धरून खाली पडला होता. त्याने जगण्याची आशा सोडली होती. उरलेले तिघं आधी त्याच्या जवळ बसले. मग ते रागाने पोरांच्या मागे सुटले. पण पोरांचा वेग भारी होता.

पोरं कमानीपाशी आली. पण त्यांना काय करावं कळेना. तिथला पेरूवालाही दिसत नव्हता. आणि त्या क्षणाला त्या आजोबांचा काही उपयोग नव्हता. साहजिकच त्यांची पावलं आल्या दिशेला वळली- स्टेशनकडे. गाड्यांची रांग कमी होताच हमरस्ता ओलांडून ते पलीकडे गेले.

मागनं ते तिघे येतच होते. तो परिसर त्यांच्या परिचयाचा होताच.

आणि?...

पऱ्या व उदय पळतच त्या गेटच्या आतल्या सैनिकापाशी पोचले. सैनिकाने बंदूक सावरली. तरी पोरं- 'बचाओ बचाओ,' ओरडत सरळ आत शिरली.

तो त्यांना ओरडणार तोच मागून ते तिघे आले. त्यांचा आविर्भाव पाहताच सैनिक कडाडला,

''ए, ठहर!''

तिघे थबकले. त्या उग्र वाटणाऱ्या सैनिकाने डोळे वटारले व निशाणा धरला. कुठल्याही क्षणी त्याने गोळ्यांची फैर झाडली असती.

त्याबरोबर तिघे पाय लावून उलट्या दिशेने पळत सुटले. अर्थातच भित्रा भावड्या त्या शर्यतीत पहिला येणार होता.

त्या सैनिकाने पोरांना थांबवून ठेवलं व आत खबर दिली. आतून मोठे साहेब आले. पोरांनी सगळं सांगितलं. त्यांनी पोलिसांना फोन केला. पोलिसांनी नाकाबंदी केली, अचूक सापळा रचला.थोड्याच वेळात चौघे दरोडेखोर पोलिसांच्या जाळ्यात सापडले. बाळीवाला जिवंत होता. त्याला दवाखान्यात पाठवण्यात आलं.


वाचा-'असे घटते सुंदर अक्षर' (छात्र प्रबोधन प्रकाशन)

त्या मोठ्या साहेबांनी व इन्स्पेक्टर साहेबांनी पोरांचं कौतुक केलं. इन्स्पेक्टर पुण्याला जाणार होते. त्यांनी उदयच्या वडलांना फोन केला व त्यांना घरी सोडायची जबाबदारी स्वीकारली.

हवा पावसाळी होती. पण पाऊस थांबला होता.

जीपमध्ये इन्स्पेक्टर विचारत होते, ''तू सापाला धरायला घाबरला नाहीस?''

''नाही, माझे बाबा सर्पमित्र आहेत ना! त्यामुळे मला सापांची माहिती आहे. मी ते हाताळतो. तो साप म्हणजे साधी धामण होती. ती विषारी नाही. ती चावली तर वेदना होतात; पण माणूस मरत नाही. म्हणून तर मी डेअरिंग केलं. त्या चोराला काही होणार नाही, हे मला माहिती होतं. आपण मरणार म्हणून त्या चोराची तर बोबडीच वळली असेल. पण त्यामुळेच आम्हाला पळायला चान्स मिळाला.''

''आणि तो साप विषारी असता तर?'' साहेबांनी फिरकी घेतली.

''तर कदाचित मी घाबरलो असतो... किंवा त्या क्षणाला मी तेही धाडस केलं असतं, पण त्या चोराला मात्र वाचवावं लागलं असतं,'' उदय म्हणाला.

मग पोरं शांत बसली. जीपच्या काचेचा जणू पडदा झाला होता. त्यावर सकाळपासूनच्या घटना जणू चित्रपटासारख्या पुढे सरकत होत्या. दोघे तिकडे नजर लावून बसले होते...


एका कार्यक्रमात त्या दोघांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी परिमल म्हणाला,

''साप माणसांचे मित्र असतात. हे मला त्या दिवशी खरं कळालं. आता मी त्यांची माहिती करून घेतोय. तुम्हीही ती नक्की करून घ्या.''

***

- ईशान पुणेकर
१५५, रास्ता पेठ,
पुणे ४११०११

# हसरे चित्र




व्यंगचित्रकार : **आशिष जोशी,**
सी ३६/१२ शाश्वत सोसा., प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे 411033
अवश्य भेट द्या – www.usemylenses.blogspot.com



वाचा- 'कल्पक बनूया' ₹६० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

# आगीशी दोन हात

प्रशांत रणपिसे




काही आवाज आणि घटना यांचं घट्ट नातं असतं हो ना? जसं आगीच्या बंबाची धोक्याची घंटा ऐकली की उगाच काळजात धस्स होतं. 'कुठेतरी आग लागलीय' एवढंच आपल्याला कळतं. पण आपल्या मदतीसाठी धावून येणारे हे जवान नक्की कुठून येतात? अग्निशामक दल म्हणजे काय? त्याची स्थापना कधी झाली?... १४ ते २० एप्रिल हा 'अग्निशामक दलाचा राष्ट्रीय सेवा सप्ताह' त्या निमित्ताने या अग्निशामक दलाविषयी जाणून घेऊया...

पृथ्वी, आकाश, जल, वायू व अग्नी ही पंच महाभूते अखिल मानवजातीला लाभलेले एक ईश्वरी वरदानच होत. मात्र त्यांनी रौद्र रूप धारण केल्यास मानवाचा विनाश ठरलेलाच आहे. अशा पंच महाभूतांपैकीच एक असलेल्या अग्नीचा मानवाला आपल्या दैनंदिन जीवनात फारच उपयोग होत असतो. अग्नीचा वापरही मानवाने कौशल्याने आपल्या दैनंदिन जीवनात करायला सुरुवात केली खरी; पण योग्य प्रकारे खबरदारी न घेतल्यामुळे त्याला अग्निकोपास तोंड द्यावे लागते आहे. मानवी स्वभाव म्हटला की, इतर सद्गुणांबरोबरच हलगर्जीपणा, बेफिकीरवृत्ती, अतिविश्वास हे अवगुणही आलेच. ज्यावेळी मानवाकडून अशा चुका घडतात, अशावेळी अग्नी रौद्र रूप धारण करतो.

**अग्निशामक दलाचा इतिहास -** भारतामध्येही आगीपासून होणाऱ्या संहाराची जाणीव होऊन, याबाबत

**घरातील सुरक्षितता – काही अपघात झाला/आपत्ती आली तर अग्निशमन दल तुमच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहेच. प्रसंगी जिवावर उदार होऊन, जोखीम पत्करून मदतीसाठी आहेच आहे. पण असे अपघात टाळण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. अगदी साध्या साध्या गोष्टी आहेत या. पण या जर आपण पाळल्या तर मोठी हानी टळू शकते. म्हणतात ना,** precaution is always better than cure !

- **घरातील इलेक्ट्रिकल वायरिंग सुयोग्य असल्याची खात्री करावी.**
- **इलेक्ट्रिकल वायरिंग, सतरंजी, बैठक, मॅट, दाराच्या फटीतून जाऊन चिमटणार नाही, याची दक्षता घ्यावी.**
- **विद्युत उपकरणांसंबंधीची दुरुस्ती परवानाधारक व्यक्तींकडूनच करून घ्यावी.**
- **तात्पुरती वारयरिंग शक्यतो करू नये. विजेच्या उपकरणांना अर्थिंग करावी.**
- **एक प्लगपासून अनेक पॉइंट घेऊ नयेत.**
- **विजेची जोडणी लहान मुलांच्या हाती न येईल याची खबरदारी म्हणून ती योग्य उंचीवर ठेवावी.**
- **विजेची इस्त्री ठेवण्याकरता योग्य मांडणी व टेबल असल्याची खात्री करावी.**
- **घरातील रेडिओ, टी. व्ही, रेफ्रिजरेटर यांच्या मागे हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.**
- **आपण बरेच दिवस घर बंद करून जाणार असल्यास मेन स्वीच बंद असल्याची खात्री करावी.**
- **स्वयंपाक करताना स्टोव्ह/गॅस शेगडी उंचवट्यावर व शक्यतो भिंतीजवळ ठेवावी.**



वाचा-'दरवळ' ₹ ४० (कथासंग्रह, छात्र प्रबोधन प्रकाशन)

संबंधितांना जरूर ती दक्षता घेण्यासाठी प्राचीन काळी राजे-महाराजांनी केलेल्या उपयुक्त सूचनांचे दाखले सापडतात. यात छत्रपती शिवाजी महाराजांनी आग लागू नये म्हणून घ्यावयाच्या खबरदारीबाबत किल्लेदारास पत्राद्वारे केलेल्या विविध सूचना व प्रत्यक्षात स्वराज्यात केलेल्या प्रतिबंधक उपाययोजना यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

सन १६६६ मध्ये लंडन शहरात मोठा अग्निप्रलय झाल्यानंतर आग विझवण्यासाठी स्वतंत्र दलाची स्थापना करण्याची प्रकर्षाने निकड भासू लागली. त्यानंतर काही कालावधीतच लंडन शहरात प्रथमत: अग्निशामक दलाची स्थापना करण्यात आली.

भारतात अग्निशामक दलाची स्थापना सर्वप्रथम मुंबईमध्ये झाली. परंतु मुंबई अग्निशामक दलाचा आरंभ केव्हा झाला तो शुभदिन दुर्दैवाने योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्याअभावी निश्चितपणे सिद्ध करता येत नाही. एवढे मात्र निश्चित की, सन १९०३ च्या प्रचंड आगीत तेव्हाच्या मुंबईचा बराच मोठा भाग जळून खाक झाला, तोपर्यंत असे अग्निशामक दल अस्तित्वात नव्हते. परंतु त्यापूर्वी सन १८७७ मध्ये कर्नल ली यांना हाताने चालणाऱ्या बंबाने पर्यवेक्षण करण्याबद्दल दररोज रुपये ४/- भत्ता देण्यात येत होता, अशी माहिती मिळते. सुरुवातीला सरकारी नियंत्रणाखाली पोलीस खातेच आपल्या कामकाजाच्या जोडीने आगी विझवण्याचे कार्य करीत होते. पण १ एप्रिल १८८७ रोजी मुंबई महानगरपालिकेने या जबाबदारीचा संपूर्णत: स्वीकार केला. सन १९४८ पर्यंत फक्त लंडन फायर ब्रिगेडमधून आलेल्या अधिकाऱ्यांनीच या दलाचे धुरिणत्व सांभाळले. त्यानंतर मात्र दलाचे संपूर्ण भारतीयीकरण होऊन अनेक भारतीयांनी या दलाचे प्रमुखपद समर्थपणे भूषविले आहे.

जनतेच्या जीविताचे व संपत्तीचे रक्षण करण्यासाठी आग विझविणारी एखादी संस्था असावी, या सूज्ञ भावनेतूनच या अग्निशामक सेवेची प्रथम सन१८७७ मध्ये स्थापना झाली असल्याचे लक्षात येते. या स्थापनेनंतर मुंबई नगरीचा होणारा विकास, वाढणारी लोकसंख्या, आधुनिकतेच्या व विकासाच्या अनुषंगाने अस्तित्वात येणारे मोठमोठे कारखाने व विसाव्या शतकात अस्तित्वात येणाऱ्या उत्तुंग इमारती- यांमधील धोक्यांना सामोरे जाण्यासाठी गरजेनुसार या दलाची स्थित्यंतरे झाली. १९२० पर्यंत घोडा आणि बैलांमार्फत हाताने चालविता

- **काडेपेटी लहान मुलांच्या हाताला लागेल अशी ठेवू नये.**
- **कोणत्याही परिस्थितीत ज्वालाग्राही पदार्थांचा (स्पिरीट, पेट्रोल इत्यादी) वस्तूंचा साठा करू नये.**
- **सजावट करताना रंगीबेरंगी कागद विजेचा बल्ब, प्लग अथवा वायरवरती चिकटवू नका.**
- **रात्री झोपताना निरंजन, उदबत्ती शांत करूनच झोपावे.**
- **स्वयंपाक करताना घरात नायलॉन, रेशमी साड्यांचा वापर करू नये व शक्यतो सुती कपडा वापरावा.**
- **ओव्हर साईज फ्यूजचा वापर करू नये.**

**...स्वयंपाकघरात गॅसचा उपयोग करण्यापूर्वी खालील गोष्टींची माहिती करून घ्या...**

- **गॅसचा वास येऊ लागला तर घाबरून जाऊ नका. प्रथम सिलेंडरचा व्हॉल्व, प्रेशर रेग्युलेटर आणि गॅसच्या शेगडीच्या तोट्या बंद करा.**
- **घरातील सर्व विस्तव विझवा. सर्व दारे खिडक्या उघडून टाका. ताबडतोब तुमच्या वितरकाला बोलवा.**
- **कोणत्याही परिस्थितीत तुमच्या सिलिंडरची फिरवा फिरव, दुरुस्ती वगैरे करू नका. शक्य असेल तर तुमचा सिलिंडर खुल्या जागेत हलविण्याचा प्रयत्न करा.**
- **तुमच्या शेगडीचा बर्नर पेटत नसला किंवा शेगडीत काही बिघाड झाला असला तर लागलीच तुमच्या वितरकाला कळवा.**


वाचा-'Be Creative' ₹ १०० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

येणारी ही फायर इंजिन्स ओढावी लागत. यानंतर मात्र यांत्रिक फायर इंजिन्स्चा वापर सुरू झाला.

अशाप्रकारे संपूर्ण भारतामध्ये प्रथमत: मुंबई व तद्नंतर मद्रास, दिल्ली, कलकत्ता या महानगरांत आणि त्यानंतर अन्य शहरांमध्ये दलाची स्थापना करण्यात आली. पुण्यात १९४५ पर्यंत आग बंबवाल्यांच्या सहकारी संघामार्फत स्थानिक पातळीवर आग विझवण्याचे सामूहिक प्रयत्न होत होते. १९५० मध्ये पुणे महानगरपालिका स्थापन झाल्यावर अग्निशामक दलाचे कार्य पालिकेतर्फे चालते.

**अग्निशामक दलाची कार्यपद्धती -** अग्निशामक दलास आग, अपघात, वायूगळती, नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्तीच्या प्रसंगात मदत/बचावकार्य करावे लागते. अग्निशामक दलाकडे दरवर्षी आगीच्या साधारणत: १४०० व अपघाती स्वरूपाच्या साधारणत: १५०० वर्द्या येतात. सध्या पुण्याच्या अग्निशमन दलाकडे १० अग्निशमन केंद्रे कार्यरत असून, एकूण ४५१ अधिकारी/जवान सध्या दलाकडे कार्यरत आहेत. अग्निशमन दलाकडे ३० अग्निशमन वाहने आहेत. वाढती लोकसंख्या, उंच इमारती, अरुंद रस्ते व त्यावरील वाढती वाहतुक आदी समस्यांना समर्थपणे तोंड देत अग्निशमन दल अविरतपणे आपले काम करत आहे. उंच इमारतीमधील आगी व अपघाताच्या प्रसंगी अग्निशमन/बचावकार्य करणेसाठी हायड्रोलिक प्लॅटफॉर्म, रसायन वा वायूगळतीच्याप्रसंगी मदतकार्यासाठी केमिकल सुट, ब्रिदिंग ॲपरेटस सेट, एन. बी. सी. मास्क तर भूकंपाच्यावेळी सर्च कॅमेरा, कॉंक्रीट कटर, लिफ्टींग बॅग इत्यादी साधने तसेच प्रकाश व्यवस्थेसाठी इनफ्लॅटेबल लाईटमास्ट, मूव्हेबल लाईटमास्ट आदी साधनांचा वापर विविध वर्द्यांवर केला जात आहे. नागरिकांच्या जीविताच्या व वित्ताचे रक्षण करण्यास अग्निशमन दल सदैव तत्पर आहे. अग्निशमन दलाचा दूरध्वनी क्रमांक १०१ असा आहे. कोणत्याही प्रकारच्या आग अथवा आपत्ती, अपघात इत्यादी वर्द्या आल्यावर, सदर वर्दीची शहानिशा करून, घटनास्थळावरून जवळ असलेल्या अग्निशमन उपकेंद्रातून फायर गाडी सेवक वर्गासह त्वरीत पाठविता येते. घटनास्थळी पोहचल्यानंतर घडलेल्या घटनेचा रीतसर पंचनामा केला जातो व कामगिरी पूर्ण करून फायरगाडी जवानांसह गेटमध्ये परत येते.

**पात्रता -** राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई येथे 'फायरमन कोर्स' व नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर

### ...सिलिंडर बदली करताना खालील काळजी घ्या...

*** घरातील सर्व विस्तव विझवा. * विजेची सर्व उपकरणे व साधने बंद करा.**

*** नवीन सिलिंडरचा व्हॉल्व बंद स्थितीत व त्याला सील असल्याची खात्री करा.**

*** रेग्युलेटरचा रबर वॉशर बदली करून घ्या, रबर नळी व अन्य सर्व जोडण्या गळत नाहीत हे साबणाचा द्राव लावून बदली करणाऱ्या माणसाकडूनच तपासून घ्या.**

### वरील काळजी घेऊनही आग लागली तर काय उपाय करावेत?

*** घाबरू नका, घाबरवू नका.**

*** घरातील लोकांना सावध करून शक्य तितक्या लवकर घराबाहेर पडा.**

*** जवळच्या फायर स्टेशनला अथवा १०१ ला फोन करा किंवा जवळच्या पोलीस स्टेशनला फोन करा.**

*** आगीजवळील जळाऊ पदार्थ दूर करण्याचा प्रयत्न करा.**

*** आगीला हवा मिळण्याचे मार्ग बंद करा.**

*** फायर ब्रिगेड आल्यावर माणसे अडकली असतील तर प्रथम ते कळवा.**



वाचा - '3D Magic' ₹ ८० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

* या लेखात आलेल्या अर्थिंग, ओव्हर साईज फ्यूज इ. संकल्पना स्पष्ट करून घ्या. आपापल्या घरात या गोष्टी आहेत का? माहिती करून घ्या.
* आग लागू नये म्हणून घ्यावयाची काळजी आपण आपल्या घरात आवर्जून घेतो का? घेत नसल्यास या लेखातील सूचना तंतोतंत पाळण्याचा आग्रह धरा.
* सुट्टीमध्ये शेजारी-पाजारी, घराजवळच्या वस्त्यांमध्ये जाऊन 'आगीपासून दूर राहण्यासाठी' काय काय करता येईल याची माहिती द्या. तिथे तुम्हाला काय काय अनुभव आले हे आम्हाला कळवायला विसरू नका.
* आगीच्या बंबात पाणी किती असतं? बंबावरची शिडी किती मोठी असते? केमिकल सूट म्हणजे काय? असे एकसे एक प्रश्न तुमच्या मनात असणार हो ना? या विषयाला अनुसरून तुमच्या मनात जे जे छोटे-मोठे प्रश्न असतील, जी काही छोटी - मोठी माहिती हवी असेल ती अवश्य पोस्टकार्डद्वारे विचारा. ही माहिती तुम्हाला सांगायला आम्हाला जरूर आवडेल.

येथे 'फायर ऑफिसर कोर्स' चालविले जातात. भारतामध्ये 'फायर ऑफिसर कोर्स' फक्त नागपूर येथे चालविले जातात. फायरमनकरिता शैक्षणिक पात्रता इयत्ता दहावी उत्तीर्ण, वयोमर्यादा १८ ते २७ वर्ष आहे. हा अभ्यासक्रम ६ महिने कालावधीचा असतो. नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथे सब ऑफिसर कोर्स, स्टेशन ड्युटी स्टेशन ऑफिसर्स ॲन्ड इस्ट्रक्टर कोर्स, डिव्हिजनल ऑफिसर कोर्स इत्यादी कोर्सेस चालविले जातात.

कार्यालयात जेव्हा एखादा अपघात झाल्याची वार्ता कळवणारा दूरध्वनी खणखणतो तेव्हा अद्ययावत साधनसामग्रीनिशी आगीचा बंब घेऊन आम्ही बाहेर पडतो. परिस्थितीचा योग्य तो अंदाज घेऊन, सकारात्मक मानसिकता ठेवून पटापट निर्णय घ्यावे लागतात. पण जेव्हा तुम्ही कार्यायलयात नसता/तुमच्याकडे गरजेपुरतीसुद्धा साधनसामग्री नसते तेव्हा मात्र तुमच्यातल्या कौशल्यांचा, निर्णयक्षमतेचा कस लागतो.

मला आठवतं ८-१० वर्षांपूर्वी अग्निशामक दलाचे तेव्हाचे प्रमुख राऊत सर यांच्याबरोबर मुंबईतली एक बैठक आटोपून आम्ही परतत होतो. मुंबई-पुणे महामार्गावर रॉकेल भरेलेला टँकर आणि ट्रक यांची जोरदार टक्कर झाली होती. ट्रक उलटून ट्रकमधली माणसं आत अडकली गेली होती. नक्की किती माणसं आत आहेत, हे समजत नव्हते. फक्त आतून अडकलेल्या लोकांच्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. शिवाय या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूकही ठप्प झाली होती. टँकरमधील रॉकेल रस्त्यावर सांडले होते. घटनास्थळी पोहोचल्यावर तिथली परिस्थिति आमच्या लक्षात आली. लोकांना शांत करून, त्यांना आधार देऊन शिवाय काही उपकरणं नसताना टँकरखाली अडकलेल्यांची सुटका करणे आवश्यक होते. शेवटी हाताशी आलेले लाकडी ओंडके घेऊन अर्ध्या तासाच्या अथक परिश्रमानंतर आतल्या माणसांना बाहेर काढण्यात आम्हाला यश आले.

दोस्तांनो, अशा खूप साऱ्या आठवणी मला तुम्हाला सांगायला आवडेल. पण या सगळ्यातून एक मात्र नक्की- लोकांचा आमच्यावरचा विश्वास, आमच्या कामातून त्यांना मिळणारा दिलासा, 'वाचलो' या भावनेतून आम्हाला पाहिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर 'देव पावला/पाहिला' असे दिसणारे समाधान यातूनच आम्हाला आमच्या कामासाठी हुरूप मिळत असतो... कितीही कठीण प्रसंग आला तरी त्यावर मात करण्यासाठी आत्मविश्वास मिळत असतो.

***

**प्रशांत रणपिसे**
मुख्य अग्निशामक अधिकारी, म.न.पा. पुणे


वाचा-'**Green Messages**' ₹ २० (छात्र प्रबोधन प्रकाशन)

# ‘तुम्हीच संपादक व्हा !’ हस्तलिखित स्पर्धा निर्णय

‘तुम्हीच संपादक व्हा !’ ही हस्तलिखित स्पर्धा खास तुम्हा मुलांच्या आग्रहावरून यावर्षी पुन्हा आयोजित करण्यात आली. ‘हल्लीची मुलं लिहीत नाहीत,’ या म्हणण्याला छेद देणारा असाच तुमचा लेखनाचा प्रयत्न होता. हस्तलिखित स्पर्धेच्या निमित्ताने तुम्ही ‘लिहिते’ झालात याचा आनंद खरंच खूप मोठा आहे.

किशोरगट (इ. ५ वी ते ८ वी) आणि कुमारगट (९वी ते १२वी) अशा दोन वयोगटासाठी ही स्पर्धा झाली. सर्वप्रथम दोन्ही गटातील सहभागी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक! या दोन्ही गटातील विद्यार्थ्यांची हस्तलिखिते चांगली आहेत. त्यातील काही हस्तलिखिते अगदी नेमकी-नेटकी आणि देखणी झाली आहेत.

मित्रांनो, आपली ही हस्तलिखित स्पर्धा म्हणजे केवळ विद्यार्थ्यांच्या साहित्याचे संकलन करणे, असे एकमेव उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवणारी स्पर्धा नव्हे बरं का ! ही हस्तलिखित स्पर्धा संपादनाच्या अंगाने (स्पर्धेच्या नावाप्रमाणेच) जाणारी अधिक असायला हवी.

त्याकरता हस्तलिखिताच्या पानांची संख्या किती असावी? त्यात साहित्य प्रकार कोणते असावेत? प्रत्येक साहित्यप्रकार किती पानांमध्ये बसवावा? एखादा लेख मोठा झाला तर तो अपेक्षित पानांमध्ये कसा बसवावा? त्यावर संपादकीय संस्कार कसे करावेत? एकंदर अंकाची मांडणी, सजावट, मुखपृष्ठ कसे असावे? हस्तलिखित तयार करताना संपादनाची कोणी कोणती कामे करावीत, त्याचा अग्रक्रम कसा ठरवावा? इतक्या सगळ्या गोष्टींचा विचार या स्पर्धेसाठी हस्तलिखित पाठवताना व्हायला हवा. म्हणजे तयार होणारे हस्तलिखित अधिक परिणामकारक होईल.

ज्या हस्तलिखितामध्ये वरील संपादकीय कामांचा जाणीवपूर्वक विचार झाला त्या हस्तलिखितांचा आशय-दर्जा, वाङ्मयीन वैविध्य, सजावट, मांडणी ही विशेष उल्लेखनीय होती, हे परीक्षण करताना परीक्षकांना प्रकर्षाने जाणवले. ज्या विद्यार्थ्यांनी फक्त संकलनाच्या अंगानी हस्तलिखित तयार केले त्यामध्ये थोडा विस्कळीतपणा, नेमकेपणाचा अभाव जाणवला.

शिवाय सातत्याने या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी अधिक आव्हानात्मक उद्दिष्ट समोर ठेवून एखादा विशेषांक करायला काय हरकत आहे? जसे आपटे प्रशालेने ‘महाराष्ट्र माझा’ हे हस्तलिखित विशिष्ट विषय घेऊन सादर केले आहे. विशिष्ट विषय घेऊन हस्तलिखित असले तरी या हस्तलिखितात वेगवेगळे साहित्य प्रकार जपण्याचाही चांगला प्रयत्न केलेला दिसून येतो. तर किशोर गटातील ‘फिरुया आनंदाने’, ‘स्वरलता’इ. हस्तलिखितांमध्ये अनुक्रमे प्रवासवर्णने , व्यक्तिपरिचय यावरच आधारित लेख होते. वाङ्मयीन वैविध्याचा अभाव यामध्ये जाणवला.

आपल्या या स्पर्धेत विविध गावांमधून स्पर्धक सहभागी झाले होते. डोंबिवली, कराड, कारंजा, चोपडा, नागपूर, लातूर, औरंगाबाद, संगमनेर, भंडारा, भुसावळ इ. त्या त्या प्रदेशातील भाषेचा लहेजा (नागपूर-चोपडा) त्या विद्यार्थ्यांच्या लिखाणातून जाणवला, हा या वेळेच्या स्पर्धेचा विशेष म्हणता येईल.

सर्वच हस्तलिखितांचे संपादकीय हे उल्लेखनीय होते. त्यामध्ये हस्तलिखित करण्यामागची भूमिका विद्यार्थ्यांनी स्पष्ट

### हस्तलिखितांची पारितोषिके देणाऱ्यांची नावे

**१. श्री. दिवाकर बाळकृष्ण बापट - यांनी कै. बाळकृष्ण दत्तात्रय बापट यांचे स्मरणार्थ.**
**२. सौ. ललिता लिखिते - यांनी कै. शं. रा. देवळे यांचे स्मरणार्थ.**
**३. श्रीमती निर्मला गोपाळ किराणे - यांनी कै. गो. म. किराणे यांचे स्मरणार्थ**

वरील देणगीदारांनी दिलेल्या देणगीच्या ठेवींवरील व्याजातून हस्तलिखित स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देण्यात आली आहेत. अन्य सर्व पारितोषिके ‘छात्र प्रबोधन’ तर्फे देण्यात आली आहेत. सर्व यशस्वी स्पर्धकांना पुस्तकरूपाने ही पारितोषिके पाठवली आहेत. त्यांनी त्याची पोच पाठवावी.


वाचा- ‘विवेकानंदांचा राष्ट्रधर्म’ ₹ ६० (ज्ञान प्रबोधिनी)

## ❊ मनःपूर्वक अभिनंदन ! ❊

### किशोर गट (५ वी ते ८ वी)

**प्रथम : फुलोरा -** शिवाजी विद्यालय - अकोला

**द्वितीय : प्रकाशाची अत्तरफुले -** ध्रुव ॲकेडमी - संगमनेर

**तृतीय : महाराष्ट्र माझा -** आपटे प्रशाला - पुणे

**उत्तेजनार्थ : कवडसा -** ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला - पुणे

**अंतरंगातील उत्कृष्ट**

**कथा** : नेहा कुलकर्णी (शब्दश्री) **कविता** : सई भालेराव (स्पंदन), मुक्ता हळबे (कवडसा), सुमित राऊत -(तेज:पुंज)

**ललित** :आर्या बर्वे (कवडसा)

**मुखपृष्ठ चित्र** : पूजा कहाळेकर (ऋतू)

**आतील चित्रे** : अनुश्री वझे, प्रांजली सरप, गायत्री डव्हळे, प्राची रणदिवे, तन्मय महाले **सजावट** : फुलोरा - अकोला

**अन्य सहभागी गट**

- पंख स्वप्नांचे - भंडारा
- शब्दश्री - कराड
- निर्मिती - चोपडा
- तेज:पुंज - कारंजालाड
- छंद - सातारा
- स्पंदन, ऋतू - पुणे
- अस्मिता - भुसावळ
- वात्सल्य - चाळिसगाव
- फिरुया आनंदाने, बंध मैत्रीचे, स्वरलता- डोंबिवली

### कुमार गट (९ वी ते १२ वी)

**प्रथम : आविष्कार -** रा. कि. लाहोटी कन्याशाळा, कराड

**द्वितीय : झेप -** शिवाजी विद्यालय, अकोला

**तृतीय : वैखरी -** भिडे गर्ल्सस्कूल, नागपूर

**उत्तेजनार्थ : वास्तव -** एल. ए. डी. कॉलेज नागपूर

**अंतरंगातील उत्कृष्ट**

**कथा** : कोमल देशपांडे (ज्ञानतरंग)

**कविता** : अक्षय पाटील (सुगंध)
मनाली कुलकर्णी (वास्तव)

**मुखपृष्ठ चित्र -** गौरव थोरात (ज्ञानतरंग)

**आतील चित्रे -** छात्रायण, ज्ञानतरंग, अश्विनी चंद्र, अक्षय चिंचन सूरे, आकांक्षा उकडे, समर्थ माळवदे.

**अन्य सहभागी गट**

- प्रतिबिंब - पुणे
- जनहित प्रतिष्ठान -बारामती
- ज्ञानतरंग - औरंगाबाद
- छात्रायण - लातूर
- सुगंध - चोपडा
- हितगुज मनीचे - चिखली, पुणे
- अमृतवेल - कारंजालाड

केली. किशोर गटातील 'कवडसा', 'स्पंदन' तर कुमार गटातील 'छात्रायण', 'अमृतवेल' यांचा आशय-दर्जा खूपच चांगला होता. 'ऋतू', ज्ञान प्रबोधिनी, पुणे चे मुखपृष्ठ उत्तम होते.

काही हस्तलिखितांना मुखपृष्ठ नव्हते तर काहींमध्ये कथा - कविता लिहिताना आशयाकडे अधिक लक्ष देणे आवश्यक वाटले. तसेच शुद्धलेखन व हस्ताक्षर सुधारण्याला वाव आहे हे बऱ्याच हस्तलिखितांबद्दल परीक्षकांना जाणवले.

मित्रांनो, ही स्पर्धा म्हणजे गटकार्य आहे. तुमच्या गटात चित्रकार, लेखक, मुलाखती घेणारे, कल्पक, धडपडे, उत्साही विद्यार्थी जरूर हवेत. असा कल्पक मुलांचा गट तयार झाल्यावर तुमचे हस्तलिखित 'लई भारी' होईल यात शंका नाही.

सर्व पारितोषिक विजेत्या गटांचे मनापासून अभिनंदन! सर्व सहभागी विद्यार्थ्यांच्या पाठीवर थाप - कौतुकाची - स्नेहाची !


मग सुट्टीत लागणार नं तयारीला पुढच्या वर्षीच्या हस्तलिखित स्पर्धेसाठी ! त्यासाठी तुम्हा सर्वांना खूप साऱ्या शुभेच्छा !

**परीक्षक - अपर्णा मोडक, शिल्पा कुलकर्णी** (किशोरगट)
**अंजली नानल, नीलिमा करमरकर** (कुमारगट)

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र, शके १९३३, १ एप्रिल २०११ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.

 कै. दिनेश बळवंत बापट स्मरणार्थ। **प्रायोजक - श्री. बळवंत गंगाधर बापट, अंधेरी**






# 'रेडी ? स्माईल प्लीज ऽ ऽ'

आता सुट्यांमध्ये तुम्ही निसर्गात भटकंतीला जाल, तेव्हा तुमचा कॅमेरा रेडी ठेवायला
आणि नैसर्गिक दृश्ये टिपायला विसरू नका हं !
तुमच्या एक से एक प्रकाशचित्रांची आम्ही वाट पाहात आहोत.

प्रकाशचित्रकार - भरत केतकर

**सौर चैत्र, शके १९३३/ एप्रिल २०११, पंजीकृत नियतकालिक** (Registered Newspaper)
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2/RNP/PNW/M/94/2009-2011, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक License to post without prepayment of postage LWP No. L-172



## खळखळ धावत...

खळखळ धावत फेसाळत हा सागर उसळत येतो
मर्यादांना उल्लंघुनि नव आव्हाना घेतो ।। धृ. ।।

धवलगिरीच्या उंच उंच शिखरांचा बांध न ज्याला
प्रलयंकर मरुताची आहे साद जवाना तुजला ।। १ ।।

विक्रमगाथा इतिहासाच्या पानोपानि जयांची
त्या रणवीरा नमन करोनी धाव पुढे घ्यायची ।। २ ।।

आकर्षण गुरुतम धरतीचे सहज लीलया भेदी
विज्ञानाची गरुड भरारी तिच्यावरी तव कडी ।। ३ ।।

मर्यादांनी मर्यादुन ? छे !! त्यांना उल्लंघुनी
पुढे पुढे चालणे असू दे हेच ध्येय तव मनी ।। ४ ।।

**सौर दिनदर्शिका**
शके १९३३

| | एप्रिल २०११ | चैत्र /वैशाख |
|---|---|---|
| शु. | 1 | ११ |
| श. | 2 | १२ |
| र. | 3 | १३ |
| सो. | 4 | १४ |
| मं. | 5 | १५ |
| बु. | 6 | १६ |
| गु. | 7 | १७ |
| शु. | 8 | १८ |
| श. | 9 | १९ |
| र. | 10 | २० |
| सो. | 11 | २१ |
| मं. | 12 | २२ |
| बु. | 13 | २३ |
| गु. | 14 | २४ |
| शु. | 15 | २५ |
| श. | 16 | २६ |
| र. | 17 | २७ |
| सो. | 18 | २८ |
| मं. | 19 | २९ |
| बु. | 20 | ३० |
| गु. | 21 | वै. १ |
| शु. | 22 | २ |
| श. | 23 | ३ |
| र. | 24 | ४ |
| सो. | 25 | ५ |
| मं. | 26 | ६ |
| बु. | 27 | ७ |
| गु. | 28 | ८ |
| शु. | 29 | ९ |
| श. | 30 | १० |

वरील गीत 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर जरूर ऐका.

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 11-7 / April 11 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे. ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये काही चुका असल्यास त्या तातडीने मुख्यकेंद्रावर कळवा.

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
ई-मेल : jpchhatra@rediffmail.com
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

**या अंकाची किंमत : ₹ २०/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**

**प्रकाशन दिनांक :**
सौर ११ चैत्र, शके १९३३
१ एप्रिल २०११

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -